CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
लातूर | बुधवार, १८ मार्च २०२६ । वर्ष ४ थे अंक १० । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# १० वी भूगोल विषयाच्या ५० प्रश्नपत्रिका चोरीला; केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकाऱ्यांसह चार जण निलंबित

## सांगोला येथील घटना; शिक्षण क्षेत्रात खळबळ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला।सोलापूर, दि. १७ मार्च-**

दहावी बोर्डाच्या बुधवार, दि.१८ मार्च रोजी होणाऱ्या १० वीच्या भूगोल विषयाच्या ५० प्रश्नपत्रिका सांगोल्यातील कस्टडी रुममधून चोरीला गेल्याची घटना मंगळवार, दि.१७ मार्च २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने सुरु असलेल्या १० वीच्या परीक्षेची सांगोल्यातील कस्टडी रुम सांगोला विद्यामंदिर येथे



संग्रहित छायाचित्र

आहे. मंगळवार, दि.१७ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास कामकाजानिमित्त आलेल्या शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना कस्टडी रुमला लावलेले कुलुप कशाच्या तरी सहाय्याने तोडलेले निदर्शनास आले. दरम्यान, या चोरीप्रकरणी शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेत चार जणांना निलंबित केले आहे. यामध्ये केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी आणि दोन पोलिस कॉन्स्टेबलचा समावेश आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत एका माथेफिरु व्यक्तीकडून हे प्रकार घडल्याचे समोर येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### नियोजित वेळापत्रकानुसार आज परीक्षा होणार

नियोजित वेळापत्रकानुसार दहावी भूगोलचा पेपर आजरोजी होणार आहे. विद्यार्थी व पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे मुंबई विभागाचे अध्यक्ष राजेंद्र अहिरे यांनी सांगितले. आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व परीक्षा केंद्र संचालकांना ही माहिती तात्काळ कळवावी, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

कस्टडी रुममध्ये ठेवण्यात आलेले इयत्ता १० वी सामाजिक शास्त्र पेपर क्रमांक २ भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिका त्यामध्ये २५-२५ चे दोन पॅकेट अशा ५० प्रश्नपत्रिका चोरीला गेल्याच्या दिसल्या. याबाबत सांगोला पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले यांनी दि.१६ मार्च रोजी दुपारी ४.२० ते दि.१७ मार्च रोजी सकाळी ८.३० यादरम्यान अज्ञात इसमाने येथील कस्टडी रुमला लावलेले कुलुप कशाच्या तरी सहाय्याने तोडुन आतमध्ये ठेवलेल्या पेटी क्रमांक ५४४९ मधील ५० प्रश्नपत्रिका स्वतःच्या फायद्यासाठी अथवा वितरित करण्यासाठी मुद्दाम लबाडीने चोरुन नेलेल्या आहेत, अशी फिर्याद सांगोला पोलिस ठाण्यात देण्यात आली.

विशेष म्हणजे, स्ट्राँग रुम परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे या चोरीचे कोणतेही दृश्य पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या प्रकरणातील संशय अधिकच गडद झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरु केला. दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी शिक्षणाधिकारी कादर शेख व सचिन जगताप यांच्याशी चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याशी संपर्क साधून पुढील कार्यवाहीबाबत प्रक्रिया सुरु केली आहे. दरम्यान, सदर घटनेची माहिती मिळताच सोलापूरचे अपर पोलिस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे आणि सांगोला पोलिस निरीक्षक विनोद घुगे यांनी फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेत तातडीने पंचनामा केला.

## विचारपुष्प




नि आम्ही निसर्गाला, गाईला, तुळशीला, गंगेला माता म्हणतो. आम्ही पिंपळाच्या वृक्षाची पूजा करतो, सापाला दूध पाजतो आणि मुंग्यांना साखर देतो. निसर्गाच्या प्रत्येक वस्तूची आम्ही पूजा करतो. आणि हाच श्रद्धाभाव आम्हाला निसर्गाचे शोषण करण्यापासून परावृत्त करतो. ज्याच्याप्रति आमच्या मनात आदर आणि स्नेह आहे त्याचे आम्ही शोषण करत नाही.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# जिल्हा परिषद-पंचायत समित्यांमध्येही आता स्वीकृत सदस्य

## विधानसभेत सुधारणा विधेयक मंजूर

**अर्थसंकल्पीय अधिवेशन**



**◆ मुंबई, १७ मार्च**

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या रचनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करणारे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक २०२६ विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय पक्ष व नोंदणीकृत गटांना त्यांच्या संख्याबळानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीत स्वीकृत सदस्य नेमण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महानगरपालिका प्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मध्ये स्वीकृत सदस्य नियुक्त करण्यासाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सदर विधेयक सभागृहात मांडले. चर्चेला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, नगरपालिकांप्रमाणेच आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्येही संख्याबळाच्या आधारे सदस्यांची नियुक्ती केली जाईल. या प्रक्रियेत संबंधित जिल्हाधिकारी मान्यताप्राप्त व नोंदणीकृत पक्षांच्या संख्याबळाचा विचार करून गटनेत्यांशी सल्लामसलत करतील.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत बोलताना गोरे यांनी सांगितले की, ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून २१ जुलै २०२६ रोजी पुढील सुनावणी होणार आहे. न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर तातडीने निवडणुका घेण्याची सरकारची तयारी असल्याचे त्यांनी नमूद केले. आदिवासी व इतर प्रलंबित भागांतील निवडणुकाही त्यानंतर लवकरच घेण्यात येतील.

याशिवाय, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या जीर्ण इमारतींच्या दुरुस्ती व नव्या इमारती उभारण्याबाबतही सरकार सकारात्मक आहे. चर्चेत विविध पक्षांच्या आमदारांनी सहभागी होत स्वागतासह काही सूचना मांडल्या. त्यावर समाधानकारक स्पष्टीकरण दिल्यानंतर हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले.

◀(तभा वृत्तसेवा)

### मतदानाचा अधिकार नसेल

**नामनिर्देशित सदस्यांना कार्यकाळ व अधिकारांच्या बाबतीत निवडून आलेल्या सदस्यांप्रमाणेच स्थान मिळणार असले तरी त्यांना मतदानाचा अधिकार नसणार आहे. मात्र निधी वाटपात त्यांना समान सहभाग दिला जाईल, असे गोरे यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करण्याची संधी मिळेल, असा सरकारचा विश्वास आहे.** ■

# राज्यसभा निवडणुकीत विरोधकांना 'दे धक्का'

## ११ पैकी ९ जागांवर रालोआचा विजय

**नवी दिल्ली, १७ मार्च**

राज्यसभा निवडणुकीत विरोधी पक्षांना मोठा धक्का बसला आहे. सो वारी बिहारमधील पाच, ओडिशामधील चार आणि हरियाणातील दोन, अशा ११ जागांसाठी मतदान झाले. या ११ जागांपैकी नऊ ठिकाणी रालोआला मोठा विजय मिळाला. गत महिन्यात, निवडणूक आयोगाने १० राज्यां धील ३७ राज्यसभा जागांसाठी निवडणुका जाहीर केल्या होत्या.

यापैकी, सात राज्यांधील २६ जागांवर उम `दवार बिनविरोध निवडून आले. बिहार आणि ओडिशामध्ये विरोधी पक्ष आपल्या आमदारांना एकत्र ठेवण्यात अपयशी ठरल्यामुळे रालोआला फायदा झाला. बिहारमध्ये पाच जागांसाठी सहा उमेदवार निवडणूक लढवत होते. त्यापैकी पाच रालोआचे तर एक विरोधी महाआघाडीचा होता. यात रालोआने सर्व पाच जागा जिंकल्या. विजयी उमेदवारां ध्ये बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, रामनाथ



ठाकूर, उपेंद्र कुशवाह आणि शिवेश राम यांचा समावेश आहे.

बिहारमध्ये राज्यसभा निवडणूक जिंकण्यासाठी ४१ मतांची आवश्यकता होती. पाचव्या जागेसाठी त्यांना तीन मतांची गरज होती. महाआघाडीकडे ३५ आमदार होते. विजयासाठी त्यांना अतिरिक्त सहा मतांची गरज होती. एमआयएमचे पाच आमदार आणि बहुजन समाज पक्षाच्या एका आमदाराच्या पाठिंब्याने विरोधी उमेदवार ए. डी. सिंह यांचा विजय अपेक्षित होता. परंतु, शेवटच्या क्षणी काँग्रेसचे तीन आणि राजदच्या एका आमदारासह चार विरोधी आमदारांनी मतदानच केले नाही. पहिल्या पसंतीची मते अनिर्णित राहिल्यानंतर दुसऱ्या पसंतीची मते मोजण्यात आली.

## महत्त्वाचे

### नव्या एसटी बसेससाठी कंत्राटी कर्मचारी

**मुंबई :** पुढील वर्षात एसटी महामंडळाच्या ताफ्यात जवळापास आठ हजार बसेस येणार आहेत. यासाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली आहे. सध्या एसटी कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्या कारणाने राज्य शासनाकडे १७,७४२ कर्मचाऱ्यांची भरती एसटी महामंडळाच्या माध्यमातून करण्यात यावी असा प्रस्ताव मांडलेला आहे. परंतु ही भरती प्रक्रिया राबवण्यासाठी लागणारा कालावधी आणि आर्थिक भार लक्षात घेता सध्या तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती केली जाणार आहे. ■

# धर्म स्वातंत्र्य विधेयक विधानसभेत बहुमताने मंजूर

**◆ मुंबई , १७ मार्च**

बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभन देऊन होणारे धर्मांतर रोखण्यासाठी राज्य सरकारने आणलेले धर्म स्वातंत्र्य विधेयक महाराष्ट्र विधानसभेत सोमवारी रात्री बहुमताने मंजूर झाले. पुढील प्रक्रियेसाठी हे विधेयक आता विधानपरिषदेत सादर करण्यात येणार आहे.

विधानसभेत या विधेयकावर सोमवारी सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक सभागृहात मांडले. विविध पक्षांच्या सदस्यांनी यावर आपापली मते व्यक्त केली. त्यानंतर उशिरापर्यंत चाललेल्या चर्चेनंतर मतदान घेण्यात आले आणि विधेयक बहुमताने मंजूर करण्यात आले.

या विधेयकाला सत्ताधारी पक्षांसह काही विरोधी पक्षांकडूनही पाठिंबा मिळाला. विशेष म्हणजे शिवसेना (उबाठा गट) यांनी या विधेयकाला समर्थन दिले. ◀(तभा वृत्तसेवा)

### ओम हिंगुले, परम हिंगुले, अमृतरुपिणी तनशक्ती...





भावसार समाज कुलस्वामिनी हिंगुलाबिकादेवी प्रकट दिनानिमित्त मंगळवारी सायंकाळी सोलापूर शहरातील प्रमुख मार्गांवरून शोभायात्रा काढण्यात आली.

# गॅस सिलेंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी नियंत्रण कक्ष

**मुंबई, १७ मार्च**

राज्यात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्य शासनाने कडक पावले उचलली आहे. नागरिकांच्या तक्रारींसाठी राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला असून त्वरित मदत मिळावी यासाठी ९७६९९१९२२१ हा व्हॉट्सॲप क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला असल्याची माहिती अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत दिली. गॅस तुटवडा टाळण्यासाठी रिफायनऱ्यांचे उत्पादन वाढवण्यात आले असून एलपीजी उत्पादन ९ हजार मेट्रिक टनांवरून ११ हजार मेट्रिक टनांपर्यंत नेण्यात आले आहे. रुग्णालये, शाळा व म हाविद्यालयांना प्राधान्याने १०० टक्के पुरवठा करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले.



# खामेनेईचे निकटवर्तीय अली लारीजानी ठार

## इस्रायलच्या आयडीएफचा दावा

## कमांडर सोलेमानी यांचाही खात्मा

## अनेक संरक्षण अधिकारी ढिगाऱ्यात गाडले

**तेल अवीव, १७ मार्च**

इराणची राजधानी तेहरानवर सोवारी रात्री केलेल्या हवाई हल्ल्यात राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव आणि माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचे निकटवर्तीय अली लारीजानी, बसिज कमांडर गुलामरेझा सोलेनी यांच्यासह सुरक्षा विभागाचे अनेक अधिकारी मारल्याचा दावा इस्रायली संरक्षण दल अर्थात् 'आयडीएफ'ने केला आहे.

संरक्षण विभागाच्या अनेक कार्यालयावर बॉम्बवर्षाव करण्यात आला. यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली आणि ढिगाऱ्यात अनेक अधिकारी गाडले गेल्याचे आयडीएफने म्हटले आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, दहापेक्षा अधिक लढाऊ विमानांनी संरक्षण विभागाच्या इमारतींना लक्ष्य करून तेहरानमध्ये हल्ला केला. राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या कार्यालयावर झालेल्या हल्ल्यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. हल्ल्यावेळी कार्यालयात असलेल्या अधिकारी ढिगाऱ्यात गाडले गेले. यात राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी, बसिज कमांडर गुलामरेझा सोले ानी यांचा समावेश आहे. लारीजानी यांचा खात्मा करण्याच्या उद्देशाने एका इम ारतीवर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. इराणच्या वतीने लारीजानी आणि इतर



अधिकाऱ्यांच्या मृत्यूची पुष्टी केलेली नाही. लारीजानी यांच्या कार्यालयाने स्पष्ट केले की, ते लवकरच पत्रकार परिषद घेऊन घटनेसंदर्भातील तपशील साम ाईक करेल. दरम्यान लारीजानी हे इराणचे माजी सर्वोच्च नेते अली खामेनेई यांच्या अत्यंत जवळचे मानले जात होते. त्यांच्या मृत्यूनंतर, ते इराणच्या राजवटीतील एक प्रमुख व्यक्ती बनले होते.

### इस्लामिक जिहादच्या नेत्यावर कारवाई

इस्रायलने केवळ इराणी नेत्यांनाच नव्हे, तर पॅलेस्टिनी दहशतवादी गटांच्या नेत्यांनाही लक्ष्य केले आहे. त्यांनी पॅलेस्टिनी इस्लामिक जिहादचे प्रमुख नेते अक्रम अल अजौरी यांच्यावरही हल्ला केला. इस्रायलने दावा केला की, या हल्ल्यात अक्रम अल अजौरी ठार झाले, परंतु याची अद्याप पुष्टी झालेली नाही. इस्रायली लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल आयल झमीर यांनी या कारवाईचे वर्णन एक मोठे यश असे केले.

# पाकिस्तानने अफगाणमध्ये घडवला नरसंहार; ४३४ ठार

**काबुल, १७ मार्च**

पाकिस्तानी वायुदलाने सोवारी रात्री अमानुषतेचा कळस गाठत काबुलमधील व्यसनमुक्ती रुग्णालयावर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यामध्ये रुग्णालयाची इमारत उद्ध्वस्त होऊन ४३४ रुग्णांचा मृत्यू झाला. तसेच २५० पेक्षा जास्त जखमी झाले. या घटनेचा जगभरातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

पाकिस्तानी लढाऊ विम ानांनी काबुलमधील दारुलअम ान, अरजान किंमत, खैरखाना आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात हल्ले केले. तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी आरोप केला आहे की, पाकिस्तानी सैन्याने काबुलम धील खैरखाना भागातील ओमिद व्यसन मुक्ती रुग्णालयावर क्षेपणास्त्र डागले. हल्ल्यावेळी रुग्णालयात दोन हजारपेक्षा अधिक रुग्ण होते. या हल्ल्यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. बचाव पथकाने इमारतीच्या ढिगाऱ्यातून ४३४ मृतदेह बाहेर काढले, तर अडीचशे पेक्षा अधिक जखमी रुग्णांना घटनास्थळापासून काही किमी अंतरावर असलेल्या दुसऱ्या रुग्णालयात पोहोचविले. हा हल्ला मानवतेला काळीमा फासणारा आहे आणि नरसंहार करणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्याची वेळ आली आहे. निष्पाप नागरिकांचा जीव घेणाऱ्यांना ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल. भारत, ब्रिटन, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, ब्राझील, ऑस्ट्रेलियासह अनेक देशांच्या परराष्ट्र मंत्रालयाने हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मंत्री आशिष शेलार यांचा सोलापुरात दोन दिवसीय दौरा

**सोलापूर दि. १७ मार्च-**
माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार हे दि. २० व २१ मार्च २०२६ रोजी सोलापूर दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. दि. २० मार्च २०२६ रोजी दुपारी २.२० वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व मोटारीने अक्कलकोटकडे प्रयाण. दुपारी ३.१५ वाजता श्री स्वामी समर्थ मंदिर येथे दर्शन व राखीव. सायंकाळी ५.०० वाजता शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे आगमन व राखीव. सायंकाळी ७.०० वाजता श्री सरस्वती मंदिर प्रशाला, दत्त चौक गणपती घाट, सोलापूर येथे आगमन व भजनी महोत्सव या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थिती सांयकाळी ८.१५ वाजता शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे आगमन व मुक्काम. दि. २१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालय, किर्लोस्कर सभागृह, पार्क चौक, सोलापूर येथे आगमन व लोकमंगल राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी ११ .१५ वाजता शासकीय विश्रामगृह आगमन व राखीव. दुपारी २ वाजता मोटारीने सोलापूर विमानतळ येथे आगमन. दुपारी २.५० वाजता विमानाने मुंबईकडे प्रयाण.





### भारतीय योग संस्थानतर्फे महिला दिन साजरा

**सोलापूर, दि. १७ मार्च-**
भारतीय योग संस्थान दिल्ली रोहिणी शहर जिल्हा अंतर्गत जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम मार्कंडेय उद्यान केंद्र येथे साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय योग संस्थांचे जिल्हा प्रधान शेखर लक्ष्मणेश्वर, जिल्हा मंत्री लक्ष्मी दोरनाल, संघटन मंत्री कांचना श्रीराम, तसेच सहा केंद्राचे केंद्रप्रमुख, उपकेंद्र प्रमुख व साधक उपस्थित होते. यावेळी नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, विजय चीप्पा, हास्य कलाकार चार्ली अंबादास कनकट्टी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत त्यांचे सत्कार सरस्वती पूजा त्रिवार ओंकार गायत्री मंत्र व भक्ती गीत सादर आणि डेमो सादरीकरण करण्यात आले.



### मेहता शाळेत कला-इतिहास प्रदर्शनाचे आयोजन

**सोलापूर, दि. १७ मार्च-**
कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना भारतीय कला आणि इतिहास समजावा या उद्देशाने कला-इतिहास प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या प्रदर्शनात प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या विविध कला प्रकारांची माहिती, वस्तूरूप आणि चित्ररूप मांडणी करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी अजिंठा-वेरूळ लेण्यातील चित्रकला, प्राचीन शिल्पकला, लोककला, किल्ले तसेच विविध कालखंडातील प्रसिद्ध चित्रकार व त्यांच्या कलाकृतींचे आकर्षक सादरीकरण केले. सोलापूर मधील चार हुतात्मे, ऐतिहासिक वास्तू यांचे चार्ट, मॉडेल्स, कोलाज आणि चित्रांच्या माध्यमातून कला व इतिहास विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर पद्धतीने मांडला तसेच या प्रदर्शनाबरोबरच प्रमुख अतिथी नितीन अणवेकर यांच्या संग्रहातील विविध नोटा, तिकीटे, काडीपेटीच्या काड्यांचे कव्हर्स, पोस्टकार्ड, शिवकालीन पत्रे यांचेही प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन सहशिक्षिका प्रतिमा स्वामी यांनी केले. प्रास्ताविक, पाहुण्यांची ओळख श्रुती बागेवाडी यांनी करून दिली. नियामक मंडळ सदस्य सुरेश मंकणी यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. कला शिक्षिका मधुरा देशपांडे यांनी उपस्थित आभार मानले. यावेळी पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर उपस्थित होते.

### ऑर्केस्ट्रा बार येथे कड्याने मारहाण

**सोलापूर, दि. १७ मार्च-**
नागेश आर्केस्ट्रा बार याठिकाणी दि. १५ मार्च रोजी बारच्या तिसऱ्या मजल्यावर मॅनेजर गणेश याच्याशी बोलत असताना बारच्या खाली बोलावून आकाश जाधव, अमोल यांनी युवराज मारुती लोंढे (रा.वसंत विहार, पुणे नाका, सोलापूर) याला मारहाण केली. आकाश जाधव याने त्याच्याकडील कड्याने युवराजच्या उजव्या डोळ्यावर मारहाण करून जखमी केले. याबाबत दि. १६ मार्च रोजी दोघांवर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास गायकवाड हे करत आहेत.

### मंद्रूप ग्रामपंचायतचा हलगर्जीपणा; हजारो लिटर पाणी वाया

**दक्षिण सोलापूर, दि.१७ मार्च-**
नदीमध्ये पाणी नसल्यामुळे व मोटार जळाल्याने महिनाभर पाणी न सोडणाऱ्या मंद्रूप ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभार समोर आली आहे. एकीकडे गावात पाणीटंचाई असल्यामुळे आठवड्याला एकवेळेस पाणी सोडण्यात येत आहे, तर दुसरीकडे वालमधुन हजारो लिटर पाणी वाया जात असताना त्याकडे दुर्लक्ष करून नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू आहे. त्यामुळे मंद्रूप ग्रामपंचायतीच्या कामकाजाबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे. मंद्रूप निंबर्गी रस्त्यावरील नटराज हॉटेलसमोर असणाऱ्या वालमधून हजारो लिटर पाणी वाया जात असताना मंद्रूप ग्रामपंचायतीचे त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. याबाबत ग्रामपंचायत सदस्य व कर्मचाऱ्यांनो विचारणा करण्यासाठी संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क झाला नाही. मंगळवारी संध्याकाळी या वालमधून पाच वाजल्यापासून हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहत होते. याबाबत येथील व्यावसायिकांनी ग्रामपंचायत कार्यालयाला अनेक वेळा कळविल्यानंतरही कर्मचारी व पदाधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. रस्त्यावर पाणी वाहत असल्यामुळे वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. याबाबत मंद्रूप ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांच्याकडे विचारण्यास करण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी मोबाईल उचलला नाही. त्यामुळे पाणी वाहून जाण्याचे नेमके कारण काय? याबाबत कळू शकले नाही.

# सोलापुरात उन्हाळ्यात पाऊस बरसणार!

## राज्यातील १२ जिल्ह्यांना हवामान विभागाचा ‘यलो अलर्ट’

## शेतकरी बांधवांमध्ये धास्तीचे वातावरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
धाराशीव, कोल्हापूर, लातूर, नांदेड, सांगली, सातारा, सोलापूर यासह इतर ५ जिल्ह्याला मंगळवारी यलो अलर्ट दिल्याने विजांच्या कडकडाटासह वादळे व ३०-४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविल्याने सुगी सुरू असलेल्या शेतकरी बांधवांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, सोलापुरातही ऐन उन्हाळ्यात आभाळी वातावरण निर्माण होत असून, पाऊस बरसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील हवामानात मोठे बदल जाणवत आहेत. १७ मार्च रोजी उष्ण आणि दमट हवामान होते. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाला अवकाळी पावसाचा तीन तासांचा यलो अलर्ट हवामान विभागाचा असल्याने या काळात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, असा अंदाज वर्तविण्यात आला होता. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाला अवकाळी पावसाचा यलो अलर्ट हवामान विभागाचा होता. यामुळे सुगी सुरू असलेल्या शेतकऱ्यांना हातातोंडाशी आलेला घास पावसामुळे जातो की काय? अशी भीती निर्माण झाली आहे.

सोलापूर जिल्ह्याला वादळी वाऱ्यासह पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असल्याने या भागातील शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. यामुळे शेतकरी बांधवांनी काढून पडलेल्या पिकांवर काहीतरी झाकावे, अशाही सुचना आपत्ती विभागाकडून करण्यात आल्या आहेत.

विदर्भातील अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणामध्ये उष्ण हवामान कायम असेल. नागपूर, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांनाही अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. यावेळी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस होईल, असे सांगण्यात आले आहे.

हा अंदाज महाराष्ट्रात पुढील ४ दिवस राहण्याची शक्यताही वर्तविण्यात आली आहे. यामुळे पूर्वमोसमी पावसाचा इशारा देण्यात आला असून, अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळेच पिवळा अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून हवामानात काहीसा बदल जाणवत आहे. वातावरणातील गारवा नाहीसा होऊन आता तापमानात वाढ होताना दिसत आहे. वातावरणात गरमी जाणवत असताना आता पुन्हा एकदा तापमानात घट होताना दिसत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी मेघगर्जनेसह मध्यम ते हलक्या स्वरुपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. ही शक्यता वर्तवत असताना महाराष्ट्रातील एकूण ११ जिल्ह्यांत अलर्ट जारी करण्यात आला आहे. रविवारी रात्रीपासून वातावरणात बदल झालेला पाहायला मिळत आहेत. यामुळे आगामी चार दिवस शेती पिकांवर अवकाळी पावसाची टांगती तलवार आहे.

### अक्कलकोट परिसरात गारपीटसह पावसाची हजेरी

मंगळवारी रात्री अक्कलकोट शहरासह तालुक्यात जोरदार गारपीटासह पावसाने हजेरी लावली. या परिसरात सुगी सुरू असलेल्या शेतकऱ्यांना हातातोंडाशी आलेला घास या पावसामुळे जाण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. अचानक आलेल्या या पावसामुळे आणि गारांमुळे फळबागा तसेच रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोलापूर शहरासह संपूर्ण जिल्ह्यातच वादळी वाऱ्याचा जोर असल्याने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पावसामुळे रब्बी हंगामातील पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे अक्कलकोट परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले.



## नाला रुंदीकरण व खोलीकरण कामात कोणतीही ढिलाई नको

### महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**
अवंती नगर ते गणेशनगरपर्यंतच्या नाला रुंदीकरण व खोलीकरण कामात कोणतीही ढिलाई नको, असे निर्देश महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंगळवारी दिले.

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंगळवारी अवंतीनगर, गणेशनगर परिसरास भेट देऊन तिथे सुरू असलेल्या नाल्याच्या कामाची पाहणी केली. अवंती नगर ते गणेशनगर या दरम्यान नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरु असून या कामाची आयुक्तांनी सविस्तर आढावा घेतला.यावेळी आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना काम नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देत नागरिकांना पावसाळ्यात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कामात कोणतीही ढिलाई न ठेवण्याचे निर्देश दिले. तसेच नाल्याची क्षमता वाढवून पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने काम प्रभावीपणे राबविण्याचेही त्यांनी सांगितले. या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकूलवार, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, श्याम कन्ना आदी उपस्थित होते.

## कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या सहा गाईंची सुटका, दोघा जणांवर गुन्हा



### मंद्रूप पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १७ मार्च-**
कत्तलीसाठी अमानुष पद्धतीने बांधून ठेवलेल्या ६ गाईंची मंद्रूप पोलीसांनी सुटका केली आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून एक लाख ४० रूपये किमतीच्या गायींची सुटका करण्यात आली आहे.

मंद्रूप पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांना मिळालेल्या माहीतीनुसार कुरघोट येथे मोहम्मद अली कुरेशी याचे शेतातील गोठ्यात कत्तलीसाठी गायी बांधून ठेवल्याचे समजले. पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे पीएसआय कदम, बापू शिंदे, संदीप काळे, ज्ञानेश्वर भोसले व शिवणे मेजर, सागर चव्हाण यांचे पथकाने छापा टाकून गायींची सुटका करून त्यांना देखभाल व सुरक्षिततेसाठी अहिंसा गोशाळा येथे वैद्यकीय तपासणी करून जमा केले.

बादशहा इमान सुतार (वय ५५, रा. कुरघोट, ता. द. सोलापूर) मोहम्मद अली कुरेशी (वय १९, रा. लष्कर, सोलापूर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### प्राण्यांवरील अत्याचार खपवून घेतला जाणार नाही

या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, प्राण्यांवरील क्रूरतेविरुद्ध पोलिसांनी कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक राजु डांगे यांच्या पथकाने कारवाई केली.

## घरगुती गॅस वापरणाऱ्या व्यावसायिकांची आजपासून गय नाही

### शहर-जिल्हा पुरवठा अधिकारी, दक्षता पथके अलर्ट मोडवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
जिल्ह्यातील एचपीसीएल, बीपीसीएल, आयबीसीएल या गॅस कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी, प्रतिनिधींची बैठक घेवून गॅसची स्थिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जाणून घेतली आहे. युध्द सुरू होण्यापूर्वी आपल्याला जितका गॅस लागत होता; तितका गॅस आपण आजही रोज पुरवठा करू शकतो. मात्र घरगुती गॅसचा वापर व्यावसायिकांनी केल्यास त्यांच्यावर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली आजपासून अत्यंत कडक कारवाई करणार असल्याचा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, शहरचे धान्य वितरण अधिकारी ओंकार पाडोळे यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि. १७) दिला. दरम्यान, यामुळे शहर-जिल्हा पुरवठा अधिकारी, दक्षता पथके अलर्ट मोडवर येणार असल्याचे दिसते.

जिल्ह्यातील सर्व गॅस ग्राहकांना जवळपास दीड महिना पुरेल इतका घरगुती गॅस तर अती महत्वाच्या सेवा व्यवसायासाठी व्यावसायिक गॅस शिल्लक आहे. कमी पडेल अथवा लवकर मिळणार नाही, या भीतीपोटी शहर-जिल्ह्यातील ग्राहकांनी विनाकारण गॅस ॲडव्हान्स बुकिंग करू नये, एजन्सीसमोर गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नुकतेच केले आहे. गेल्या १५ दिवसापासून आखाती देशात युद्ध सुरु असल्याने विविध प्रकारचे घरगुती, व्यावसायिक गॅस मिळणार नाही, असे समजून शहर-जिल्ह्यातील ग्राहक भावनिक होऊन ॲडव्हान्स बुकिंग विनाकारण करत आहेत. यामुळे गॅस वितरकांच्या एजन्सीसमोर मोठी गर्दी करत असल्याने ग्राहकांत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच अनेक लहान-मोठे व्यावसायिक, हॉटेल्सधारक घरगुती गॅसचा वापर करताना आढळून येत आहे. यासाठी दक्षता पथकाने मंगळवारी पकडलेल्या बार्शी तालुक्यातील एकावर आज गुन्हाही दाखल झाला आहे. ही दक्षता पथकाची मोहीम आता कडक करण्यात येणार असून, सोलापूर शहर आणि जिल्ह्यात आता घरगुती गॅस वापर करणाऱ्या व्यावसायिकांवर या पथकाची करडी नजर राहणार आहे.



गॅस पुढील महिन्यात मिळेल की नाही? अशी भीती ग्राहकांनी घेवू नये. सध्या दररोज २० हजार गॅस पुरवठा होत आहे. घरगुती गॅस संपल्यास २५ दिवसाला एक तर ग्रामीण भागात ४५ दिवसाला एक या प्रमाणे घरगुती गॅस मिळणार आहे. व्यावसायिकांचा गॅस पुरवठा व बिलिंग पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. यामुळे सध्या खाजगी व्यावसायिकांना गॅस मिळणार नाही. अत्यावश्यक सेवेत येणाऱ्या सर्व व्यावसायिकांना मात्र गॅस पुरवठा होणार आहे, असेही जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी सांगितले.

### प्रत्येक तालुक्याच्या पथकांनाही केले सतर्क

गेल्या १७ दिवसांपासून जागतिक युद्धजनक परिस्थिती असल्याने राज्यात कोठेही पेट्रोल, डिझेल व गॅसचा तुटवडा होणार नाही या संदर्भात सध्या शासन कार्यरत झालेले आहे. याच धर्तीवर आपल्या जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद हेही यावर मात करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ही परिस्थिती भविष्यात अशीच राहिली तर इंधनाचा तुटवडा पडण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही म्हणून शासनाने व सोलापूर जिल्हा प्रशासनाने घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध वापर टाळण्याकरिता प्रत्येक तालुक्यात एक पथक स्थापन केले आहे. ही पथके बुधवारपासून घरगुती गॅस वापरणाऱ्या व्यावसायिकांवर कडक कारवाई करणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली आहे.

## ग्राहक हक्क कायद्याविषयी सर्वांनी जागरूक राहावे

### अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
देशभरात १५ मार्च हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. ग्राहक हा कोणत्याही अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. ग्राहकांचे हक्क सुरक्षित राहिले तरच समाजात न्याय, पारदर्शकता आणि विश्वास टिकून राहील. आजच्या डिजिटल युगात ग्राहकांना माहिती मिळविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध झाले आहेत, परंतु त्याचबरोबर फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. त्यामुळे ग्राहकांनी आपले हक्क व ग्राहक कायद्याविषयी जागरूक रहावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले.



#### विविध विभागांनी लावले माहितीपर स्टॉल

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर, वैद्यमापनशास्त्र यंत्रणा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सोलापूर, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, परिवहन विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग विक्रीकर विभाग आदींचे स्टॉल लावले होते.

जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी निलेश देठे, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासकीय व अशासकीय सदस्य राजेंद्र घाडगे, नंदकुमार देशपांडे, शशिकांत हरिदास, किरण भांगे, स्वप्निल वाघमारे, यशवंत फडतरे, तानाजी गुंड उपस्थित होते.

ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा भारती सोलवंडे यांनी ग्राहक हक्क कायद्याविषयी माहिती दिली. तसेच वस्तुची गुणवत्ता व दर्जा याकडे ग्राहकांनी लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य राजन घाडगे यांनी केले. यावेळी रमेश खाडे यांनी महाराष्ट्र गीत सादर करुन ग्राहक प्रबोधनपर पोवाडा सादर केला.

### लोकसेवा विद्यामंदिरच्या रोहिणी कुंभारची नवोदय विद्यालयासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १७ मार्च-**
मंद्रूप येथील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता पाचवी मधील विद्यार्थीनी रोहिणी शिवानंद कुंभार हिचा जवाहर नवोदय विद्यालय (प्रवेश परीक्षा) पोखरापूर येथे निवड झाली आहे.



यशस्वी विद्यार्थिनीचा व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार शिवशरण अण्णा पाटील, सचिव व माजी सभापती गुरूसिद्ध म्हेत्रे, सहसचिव व माजी सरपंच पिरप्पा म्हेत्रे, प्राचार्य बसप्पा घाटे, उपप्राचार्य बसवराज कुमठेकर, पर्यवेक्षक एम. बी. मलकारी यांनी अभिनंदन केले.

## जिल्ह्यातील ६५५ ग्रा.पं.च्या प्रभाग रचनेचे काम अंतिम टप्प्यात

### उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर

### जिल्ह्यातील प्रभागरचनेत विशेष बदल नसल्याचा निर्वाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्रातील हजारो ग्रामपंचायतींसाठी राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेत प्रभागांची सीमा निश्चिती, सदस्य संख्या आणि अनुसूचित जाती-जमाती व महिला आरक्षणाचे नियोजन केले जात आहे. याच धर्तीवर सोलापुरातील ६५५ ग्रामपंचायतींचे प्रभाग रचनेचे काम अंतिम टप्प्यात आल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. १७) दिली.

सध्या २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची प्रभाग रचना आणि आरक्षण निश्चित केले जात आहे. यासाठी संबंधित तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्या देखरेखीखाली प्रभाग रचना, सीमांकन आणि आरक्षण सोडत काढली जात आहे. ग्राम पंचायत निवडणुकांमध्ये महिलांसाठी ५०% आरक्षण आणि लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण निश्चित केले असून, नवीन ग्रामपंचायतींमध्ये लोकसंख्येनुसार वॉर्डांची (प्रभाग) विभागणी केली जात आहे. अशा प्रभाग रचनेचे बदल सोलापूर जिल्ह्यात किरकोळ असल्याचाही निर्वाळा कसेकर यांनी दिला.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने मुदत संपलेल्या आणि नजीकच्या काळात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीचा आदेश काढला असून, विद्यमान सरपंच, उपसरपंच, सदस्य यांना प्रशासक म्हणून काम करण्याची लॉटरी लागली आहे. यामुळे सध्या जिल्ह्यातील ६५५ ग्रामपंचायतींवर प्रशासक राज्य चालू आहे.

जिल्ह्यातील फेब्रुवारी २०२६ अखेर मुदत संपलेल्या ६५५ ग्रामपंचायतीच्या सरपंच, सदस्यांना राज्य शासनाने सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. यामुळे या पदाधिकाऱ्यांत फिलगुड वातावरण आहे. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर प्रशासकांची निवड करण्याचे अधिकार राज्य शासनाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले होते. त्या अधिकारानुसारच राज्य शासनाने आता मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मुदत संपलेल्या ग्राम पंचायतीवर प्रशासक म्हणून सरपंच, सदस्यांची निवड केली आहे. आता राज्य निवडणूक आयोगाकडून ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची घोषणा झाल्यावरच या निवडणुका लागणार आहेत. दरम्यान, या प्रभाग रचनेमध्ये सोलापूर जिल्ह्यात विशेष बदल झाले नसल्याचेही कसेकर यांनी स्पष्ट केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# 'पोषण आहार' खाणाऱ्यांवर कठोर कारवाई : दादा भुसे

### तक्रारींची सचिवस्तरावर चौकशी करणार

◆ **मुंबई, १७ मार्च**

राज्यातील शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पुरवठ्यात अनियमितता झाल्याच्या तक्रारी गंभीरतेने घेत सचिवस्तरावरील अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी केली जाणार असून, अहवाल प्राप्त होताच दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.



विधानसभेत आमदार कैलास पाटील घाडगे यांनी उपस्थित लक्षवेधी सूचना उपस्थित करून शालेय पोषण आहार योजनेत हिरवा वाटाणा देण्याऐवजी पांढरा वाटाणा पुरवला जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्याने हा मुद्दा चर्चेत आला. यावर उत्तर देतांना मंत्री भुसे यांनी सांगितले की, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत विद्यार्थ्यांना सकस व गुणवत्तापूर्ण आहार मिळावा यासाठी शासनाने निश्चित दर ठरवले आहेत. प्राथमिक शाळांसाठी धान्य पुरवठ्यासाठी प्रति विद्यार्थी ४.१९ रुपये, तर इंधन व भाजीपाल्यासाठी २.५९ रुपये दिले जातात. उच्च प्राथमिक स्तरावर इंधन व भाजीपाला खर्चासाठी प्रति विद्यार्थी ६.२९ रुपये दिले जातात. याशिवाय स्थानिक स्तरावरून ३.८८ रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचे यावेळी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

**मानवअधिकार आयोगाच्या शिफारशींना गती**

राज्य मानवअधिकार आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी वेळेत व्हावी. यासाठी राज्य शासनाने प्रशासकीय पातळीवर महत्त्वाचे पाऊल उचलले असून, यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. यासोबतच प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठी स्वतंत्र विभाग आणि ऑनलाईन पोर्टल सुरू करण्याबाबत शासन सकारात्मक असल्याची माहिती यावेळी सभागृहात दिली. प्रश्नोत्तराच्या तासात आमदार अतुल भातखळकर यांनी प्रश्न उपस्थित




केला होता. यावर उत्तर देतांना राज्यमंत्री योगेश देसाई म्हणाले की, या संदर्भात उपसचिव स्तरावर नोडल अधिकारी नेमण्यात आला असून आयोगाकडे प्रलंबित असलेल्या सुमारे ३० प्रकरणांवर तातडीने कार्यवाही केली जाणार आहे. तसेच, शिफारशींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र 'हेड' निर्माण करण्याबाबतही मुख्यमंत्री स्तरावर मार्गदर्शनाखाली निर्णय घेता येईल असे सांगितले. (तभा वृत्तसेवा)

# पुढील पाच वर्षांत वीजदर घटण्याचा विश्वास : मुख्यमंत्री



◆ **मुंबई, १७ मार्च**

राज्यात सौर ऊर्जेचा वाढता वापर, पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि वितरण व्यवस्थेतील सुधारणा यामुळे पुढील पाच वर्षांत वीजदर वाढण्याऐवजी टप्प्याटप्प्याने घटतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत व्यक्त केला. २०२९ पर्यंत वीजदरात स्थिरता येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात आमदार चेतन तुपे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) ने वार्षिक महसुलाचा १ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार करत देशातील अग्रगण्य वीज वितरण कंपनी म्हणून स्थान मिळवले आहे. सौर ऊर्जेच्या वाढत्या उपलब्धतेमुळे आता सकाळी ९ ते सायंकाळी ५ या 'सोलर अवर्स'मध्ये वीज वापरणाऱ्या उद्योगांना २५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.पूर्वी रात्रीच्या वेळेत वीज शिल्लक असल्याने त्या काळात सवलती देण्यात येत होत्या. मात्र, सौर ऊर्जेमुळे दिवसा वीज उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढल्याने धोरणात बदल करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

औद्योगिक वीजदरात कपात करण्यात आल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, सध्या हा दर ८.३२ रुपये प्रति युनिट असून २०२९-३० पर्यंत तो सुमारे ७.३८ रुपयांपर्यंत खाली येईल. तमिळनाडू आणि गुजरातच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीजदर अधिक स्पर्धात्मक असून येत्या काळात देशातील सर्वात कमी दरांपैकी एक असेल, असा दावा त्यांनी केला. याशिवाय, 'बॅटरी स्टोरेज सिस्टिम'चा वापर करणाऱ्या कॅप्टिव्ह सौर ऊर्जा उत्पादकांना २४ तास सवलतीच्या दरात वीज मिळू शकते. सध्या बॅटरी स्टोरेजचे दरही मोठ्या प्रमाणात कमी झाले असल्याने उद्योगांनी या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### भवानीपूर मतदारसंघातून लढणार ममता बॅनर्जी

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसने पहिल्याच यादीत सर्व २९१ उमेदवारांची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कोलकाता येथील त्यांच्या कालीघाट निवासस्थानी उमेदवारांची नावे जाहीर केली. ममता बॅनर्जी स्वत: भवानीपूर मतदारसंघातून लढणार आहेत. त्यांच्याविरोधात भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी मैदानात उतरणार आहे. तृणमूल २९४ पैकी २९१ विधानसभा जागांवर निवडणूक लढणार आहे. तर तीन जागा अनिल थापा यांच्या नेतृत्वातील बीजीपीएमला सोडण्यात आल्या आहे.



### राज्यात सायबर फसवणुकीचे २,१०० गुन्हे दाखल

**मुंबई** : गतवर्षी महाराष्ट्रात सायबर गुंतवणूक फसवणुकीशी संबंधित एकूण २,१६३ सायबर गुन्हे दाखल करण्यात आले. यात ४५५ आरोपींना अटक करण्यात आली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली. राज्यात सायबर फसवणुकीचा सामना करण्यासाठी उपाययोजना अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत. विशेषतः महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसारख्या असुरक्षित गटांना लक्ष्य करणाऱ्या फसवणुकीला आळा घालण्यावर यात भर देण्यात आला आहे, असे फडणवीस यांनी काँग्रेस आमदार अस्लम शेख यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले.महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प प्रगत तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळाच्या साहाय्याने राबविण्यात येत आहे. याचे मुख्यालय नवी मुंबईतील महापे येथे आहे. राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी एक नोडल सायबर पोलिस ठाणे स्थापन करण्यात आले आहे. तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी ५० जिल्हास्तरीय सायबर प्रयोगशाळा आणि पोलिस पथके कार्यरत आहेत. २६ तज्ज्ञ सल्लागारांनी सुमारे हजार पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सायबर तपासासाठी आवश्यक न्यायवैद्यक साधनांच्या वापराचे प्रशिक्षण दिले आहे, असेही त्यांनी सांगितले. मोठ्या प्रमाणात घडलेल्या गुंतवणूक फसवणुकीच्या काही घटनांचा संदर्भ देत फडणवीस म्हणाले, यामध्ये अशा प्रकरणांचा समावेश होता, जिथे पीडितांना बनावट ट्रेडिंग ॲप्लिकेशन्स आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सद्वारे आमिष दाखवण्यात आले आणि परिणामी त्यांना कोट्यवधींचे आर्थिक नुकसान सोसावे लागले.

# एकनाथ शिंदे यांनी घेतली पंतप्रधान मोदी यांची भेट

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी देशातील तसेच राज्यातील सद्य परिस्थितीवर दोन नेत्यांमध्ये चर्चा झाली.

पंतप्रधानांसोबतच्या भेटीच्या वेळी शिवसेना सांसदीय पक्षाचे नेते डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, मिलिंद देवरा, धैर्यशील माने, श्रीरंग बारणे आणि रवींद्र वायकर हे खासदार उपस्थित होते.



युध्दजन्य परिस्थितीत रालाओतील घटक पक्ष म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेला पाठिंबा देत संकटाच्या या परिस्थितीत आम्ही देशासोबत असल्याचा निर्वाळा शिंदे यांनी दिला. युध्दजन्य परिस्थितीत अपप्रचार करत राजकीय फायदा लाटण्याचा प्रयत्न करण्याच्या काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भूमिकेचा शिंदे यांनी तीव्र निषेध केला. पाकिस्तानी वृत्तपत्रात हेडलाईन येण्यासाठी काही नेते बोलतात, असा राहुल गांधींचे नाव न घेता आरोप करतांना शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे राजकारण देशहित डोळ्यासमोर ठेऊन असायचे. त्यांचाच कित्ता आम्ही गिरवत आहे. युध्दजन्य परिस्थितीमुळे कुवैत, दुबई आणि मस्कत येथे अडकलेल्या महाराष्ट्रातील लोकांना सुखरुप परत आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या प्रयत्नांची माहिती शिंदे यांनी यावेळी पंतप्रधान मोदी यांना दिली. एकनाथ शिंदे यांनी आज नवीन संसदभवनात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. यावेळी सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू तसेच उद्योग आणि वाणिज्य मंत्री पियुष गोयल उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

# शिखर बँक घोटाळ्याची फाईल बंद

### सुनेत्रा आणि रोहित पवारांची निर्दोष मुक्तता

◆ **मुंबई, १७ मार्च**

मुंबई सत्र न्यायालयातील एका विशेष न्यायालयाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील (शिखर बँक) कथित २५,००० कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार, त्यांच्या पत्नी आणि विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह ७५ व्यक्तींना आणि इतर ७३ जणांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने २७ फेब्रुवारीला न्यायालयात सी-सारांश अहवाल सादर केला होता. विशेष सत्र न्यायाधीश महेश जाधव यांनी हा अहवाल स्वीकारला. या आदेशाची प्रत सोमवारी रात्री उशिरा उपलब्ध करून देण्यात आली. सी-सारांश





अहवाल स्वीकारताना न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले की, या प्रकरणात आरोपीने कोणत्याही प्रकारे सरकारी निधीचा अपहार, फसवणूक किंवा गैरवापर केल्याचे सूचित करणारा कोणताही पुरावा तपास यंत्रणेला आढळला नाही. सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या ताब्यात सोपवलेल्या मालमत्तेचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर केल्याचा कोणताही ठोस पुरावा नाही. शिवाय, बनावट कागदपत्रे तयार केल्याचे कोणतेही संकेत तपासात आढळले नाहीत. तसेच बँकेच्या संचालकांनी बेकायदेशीर कृत्ये करण्यासाठी कोणताही पूर्वनियोजित किंवा गुन्हेगारी कट रचल्याचे सूचित करणारा कोणताही पुरावा आढळलेला नाही. केवळ प्रक्रियेतील चुका किंवा नियमांचे पालन न करणे हे थेट गुन्हेगारी कृत्य मानले जाऊ शकत नाही, असेही न्यायालयाने आदेशात सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### क्लोजर रिपोर्टला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळल्या

न्यायालयाने आदेशात पुढे म्हटले की, या प्रकरणात अंदाजे ८५० कोटी रुपये आधीच परत करण्यात आले आहेत आणि उर्वरित रक्कम परत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. शिवाय, न्यायालयाने क्लोजर रिपोर्टला आव्हान देणाऱ्या २० हून अधिक निषेध याचिका फेटाळून लावल्या. न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की, तपासात संचालक किंवा अधिकाऱ्यांकडून कोणताही अयोग्य आर्थिक लाभ झाल्याचे उघड झाले नाही. तसेच संबंधित कर्जे तारण ठेवून मंजूर करण्यात आली होती, असेही न्यायालयाने नमूद केले.

## सलीम खान यांना रुग्णालयातून सुटी


**मुंबई** : मस्तिष्काघातामुळे मागील महिन्यात मुंबईतील रुग्णालयात दाखल झालेले ज्येष्ठ पटकथा लेखक सलीम खान यांना मंगळवारी सोडण्यात आले. जावेद अख्तर यांच्यासोबत शोले, दीवार आणि डॉन यासारख्या चित्रपटांची पटकथा लिहिणाऱ्या प्रसिद्ध सलीम-जावेद जोडीपैकी एक असलेल्या ९० वर्षीय सलीम खान यांना १७ फेब्रुवारी रोजी वांद्रे येथील लीलावती रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी सांगितले की, खान यांना मस्तिष्काघात झाला होता. त्यावर नियंत्रण मिळवण्यात आले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. आता त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आले.

# शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी तेजी

### सेन्सेक्स ५६८ अंकांनी वधारला

◆ **मुंबई, १७ मार्च**

भारतीय शेअर बाजारात मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी तेजीचे वातावरण पाहायला मिळाले. निफ्टी ५० निर्देशांकाने २३,५५० ची पातळी ओलांडून वरच्या स्तरावर झेप घेतली. एफएमसीजी आणि आयटी क्षेत्र वगळता इतर सर्वच क्षेत्रांमध्ये खरेदीचा ओघ दिसून आला.



**निर्देशांकांची स्थिती**

मंगळवारी बाजार बंद होताना सेन्सेक्स ५६७.९९ अंकांनी (०.७५ टक्के) वधारून ७६,०७०.८४ वर पोहोचला. तर निफ्टी १७२.३५ अंकांनी (०.७४ टक्के) वाढून २३,५८१.१५ वर स्थिरावला. मिडकॅप १०० निर्देशांकात १ टक्क्यांची वाढ झाली आणि स्मॉलकॅप १०० निर्देशांक ०.६५ टक्क्यांनी वधारला.

**क्षेत्रनिहाय कामगिरी**

कॅपिटल गुड्स, टेलिकॉम, ऑटो, इन्फ्रा, मीडिया, मेटल, रिअल्टी आणि खासगी बँकांच्या समभागांत १ ते २ टक्क्यांची वाढ झाली. याउलट, एफएमसीजी निर्देशांक ०.७ टक्के आणि आयटी निर्देशांक १ टक्क्याने घसरला.

निफ्टीमध्ये एटरनल, टाटा स्टील, एम अँड एम, एचडीएफसी लाईफ आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स हे सर्वाधिक नफा मिळवणारे समभाग ठरले. दुसरीकडे विप्रो, टाटा कन्झ्युमर, इन्फोसिस, सिप्ला आणि आयटीसी या कंपन्यांच्या समभागांत घसरण झाली. विशेष म्हणजे, ३४० पेक्षा जास्त समभागांनी त्यांच्या ५२ आठवड्यांचा नीचांकी स्तर गाठला. यामध्ये टाटा एलक्सी, रिलॅक्सो फुटवेअर, टीसीएस आणि एसबीआय कार्ड यांसारख्या बड्या कंपन्यांचा समावेश आहे.

तासाभराच्या चार्टवर निफ्टीने 'फॉलिंग चॅनेल ब्रेकआऊट' दिला आहे, जे बाजारातील सकारात्मकतेचे संकेत आहेत. तज्ज्ञांच्या मते, ही तेजी २३,८०० ते २४,००० च्या दिशेने जाऊ शकते. मात्र, खालच्या स्तरावर २३,४०० हा अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. जर बाजार या पातळीच्या खाली घसरला, तर पुन्हा एकदा विक्रीचा दबाव वाढू शकतो आणि निफ्टी २२,९५० पर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. जोपर्यंत निफ्टी २३,६००-२३,७०० च्या वर टिकून राहत नाही, तोपर्यंत बाजारातील धोका पूर्णपणे टळला, असे म्हणता येणार नाही. (तभा वृत्तसेवा)

# टपाल विभागाची २४ आणि ४८ तासांत वितरणाची हमी

### प्रीमियम सेवा सुरू

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**

डाक विभागाने मंगळवारी तीन प्रीमियम सेवा सुरू केल्या असून, त्याद्वारे तातडीच्या आणि वेळेच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या टपालासाठी २४ आणि ४८ तासांत वितरणाची हमी देण्यात आली आहे.

'२४ स्पीड पोस्ट', '२४ स्पीड पोस्ट पार्सल' आणि '४८ स्पीड पोस्ट' या सेवांचे उद्‌घाटन दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी केले. सुरुवातीला या सेवा दिल्ली, मुंबई, चेन्नई, बंगळुरू आणि हैदराबाद या शहरांमध्ये सुरू केल्या जात आहेत. वितरणाच्या कालमर्यादांचे पालन करण्यासाठी विभाग विशेष प्रक्रिया आणि प्राधान्यक्रमाने हवाई वाहतुकीचा वापर करेल.

हे उद्‌घाटन 'पोस्ट इंडिया'साठी नूतनीकरणाचा एक क्षण आहे, असे शिंदे यांनी सांगितले. त्यांनी यामागील प्रचंड संधी अधोरेखित केली. ई-कॉमर्स बाजारपेठ २०३० पर्यंत ३० लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. सध्याच्या ११ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ही वाढ जवळपास तिप्पट असेल.

या नवीन सेवांमध्ये ओटीपी आधारित डिलिव्हरी, सर्वसमावेशक एन्ड-टू-एन्ड ट्रॅकिंग आणि त्यासोबतच रिअल टाईल एसएमएस सूचनांचा समावेश असेल. व्यवसायांसाठी 'आता बुक करा, नंतर पैसे द्या' (बीएनपीएल) यासारखे पर्याय उपलब्ध असतील. या व्यतिरिक्त, मोठ्या प्रमाणात केल्या जाणाऱ्या शिपमेंट्‌ससाठी मोफत पिकअप सुविधा आणि डिलिव्हरीला विलंब झाल्यास पैसे परत मिळण्याची हमीदेखील दिली जाईल. (वृत्तसंस्था)

# एलपीजी वाहक नौका 'नंदा देवी' गुजरातमध्ये दाखल




पश्चिम आशियातील संघर्षाच्या पृष्ठभूमीवर होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून मार्गक्रमण करीत ४६,५०० मेट्रिक टन वायू घेऊन भारताचे दुसरे एलपीजी वाहक जहाज 'नंदा देवी' मंगळवारी गुजरातच्या वदिनार बंदरावर सुखरूप दाखल झाले

# दहशतवादी कारवायांचा कट रचणाऱ्या सात विदेशींना अटक

### एनआयएची कारवाई ● युक्रेनच्या सहा, एका अमेरिकी नागरिकाचा समावेश

◆ **नवी दिल्ली, १७ मार्च**

देशात दहशतवादी कारवाया घडवण्याचा कट रचणाऱ्या सात विदेशींना राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने अटक केली. यात सहा युक्रेनच्या, तर एका अमेरिकी नागरिकाचा समावेश आहे.

एनआयएच्या विविध पथकांनी मागील आठवड्यात समन्वित पद्धतीने कारवाई करीत बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यातील कलम १८ आणि इतर तरतुदींच्या अंतर्गत हे अटकसत्र राबवले. या प्रकरणात शुक्रवारी सायंकाळी एफआयआर दाखल करण्यात आला. कोलकाता विमानतळावर ब्युरो ऑफ इमिग्रेशनने एका अमेरिकी नागरिकाला ताब्यात घेतले, तर लखनौ आणि दिल्ली येथील विमानतळांवर प्रत्येकी तीन युक्रेनियन नागरिकांना ताब्यात घेण्यात आले.

आरोपींनी वैध व्हिसावर भारतात प्रवेश केला होता. मात्र, अनिवार्य असलेल्या प्रतिबंधित क्षेत्र परवान्याशिवाय ते मिझोरमकडे रवाना झाले होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. तिथून त्यांनी म्यानमारमध्ये प्रवेश केला. त्यांनी भारताशी शत्रूत्व बाळगणाऱ्या वांशिक गटांची भेट घेतल्याचे सांगितले जाते. युरोपमधून आलेल्या ड्रोनच्या अनेक खेपा त्यांनी मिझोरममध्ये पोहोचवल्याचेही तपासात उघड झाले, असे सूत्रांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

**बंडखोर गटांना दहशतवादी साहित्याचा पुरवठा**

आरोपी वांशिक सशस्त्र गटांच्या वापरासाठीन युरोपमधून भारतामार्गे म्यानमारला ड्रोनचे प्रचंड साठे बेकायदेशीरपणे आयात करण्यात सहभागी होते. या गटांनी काही प्रतिबंधित भारतीय बंडखोर गटांना शस्त्रे आणि इतर दहशतवादी साहित्य पुरवून तसेच त्यांना प्रशिक्षण देऊन मदत केल्याचा आरोप एनआयएने केला.

## ओडिशातील काँग्रेसचे तीन आमदार निलंबित

◆ **भुवनेश्वर, १७ मार्च**

ओडिशातील विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने भाजपा समर्थित अपक्ष उमेदवार दिलीप राय यांना मतदान केल्याबद्दल आणि त्यांना राज्यसभा निवडणुकीत विजयी होण्यास मदत केल्याबद्दल आपल्या तीन आमदारांना मंगळवारी निलंबित केले, अशी माहिती पक्षाच्या एका निवेदनात देण्यात आली. सनाखेमुंडीचे आ. रमेशचंद्र जेना, मोहनाचे दाशरथी गोमांगो आणि बाराबती-कटकच्या सोफिया फिरदौस यांचा समावेश यात आहे. मंगळवारी झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत त्यांनी राय यांना मतदान केले होते, असा दावा पक्षाने केला आहे. जे काँग्रेसला धोका देतात, ते देशाला धोका देतात, असे काँग्रेसने समाज माध्यमावर त्यांच्या निलंबनाची घोषणा करताना म्हटले आहे. या आमदारांकडून अशा विश्वासघाताची अपेक्षा नव्हती. संविधानाच्या दहाव्या अनुसूचीनुसार, त्यांना विधानसभेतून अपात्र ठरवले जाईल, याची आम्ही खात्री करू. पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाला या निर्णयाची माहिती देण्यात आली, असे प्रदेशाध्यक्ष भक्त चरण दास यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र बनले वीज अधिशेष राज्य

### औद्योगिक मागणी पूर्ण करण्यास सज्ज : फडणवीस

◆ **मुंबई, १७ मार्च**

महाराष्ट्र आता वीज-अधिशेष राज्य बनले असून, उद्योग आणि डेटा सेंटर्सकडून वाढणाऱ्या विजेच्या मागणीची पूर्तता करण्यास पूर्णपणे सज्ज आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

प्रश्नोत्तराच्या तासात या विषयावर झालेल्या चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी सांगितले की, हरित ऊर्जेचा वाटा वाढवत असतानाही विजेचे दर स्थिर राहतील. महावितरण ही आशियातील सर्वांत मोठ्या वीज वितरण कंपन्यांपैकी एक म्हणून उदयास आली आहे. तिचा वार्षिक महसूल एक लाख कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे, अशी माहिती त्यांनी सभागृहाला दिली. सौर ऊर्जा निर्मितीमुळे बदलत असलेल्या विजेच्या वापराच्या पद्धतींना अनुसरून राज्याने आपल्या टाइम-ऑफ-डे दर रचनेत सुधारणा केली आहे. पूर्वी, मध्यरात्री ते पहाटे ६ वाजेपर्यंत वीज वापरणाऱ्यांना प्रोत्साहन दिले जात असे. आता, सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मुबलक प्रमाणात सौर ऊर्जा उपलब्ध होत असल्याने ग्राहकांना या तासांमध्ये २५ टक्क्यांपर्यंतची सवलत दिली जात आहे. विजेच्या मागणीत झालेल्या वाढीवर प्रकाश टाकताना फडणवीस म्हणाले, गत तीन वर्षांत राज्यातील औद्योगिक विजेच्या वापरात २३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हे राज्याच्या भक्कम औद्योगिक विस्ताराचे निदर्शक आहे. डेटा सेंटर्सच्या संदर्भात ते म्हणाले, भारताच्या एकूण क्षमतेपैकी जवळपास ६० टक्के क्षमता महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्र हे या क्षेत्रातील एक प्रमुख केंद्र बनण्याच्या मार्गावर आहे. पुढील पाच वर्षांत लागणाऱ्या अतिरिक्त ४,५०० मेगावॅट विजेच्या गरजेसाठी आम्ही आधीच नियोजन केले असून, त्यासाठी आवश्यक संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित केली आहे, असेही त्यांनी सांगितले.

फडणवीस पुढे म्हणाले, पुढील पाच वर्षांसाठी महाराष्ट्र विजेच्या दरांबाबतचे स्थिर धोरण कायम ठेवेल. सर्व क्षेत्रांना विश्वासार्ह व परवडणारा वीजपुरवठा सुनिश्चित करेल. काही सौरऊर्जा उत्पादकांनी कॅप्टिव्ह जनरेशनमधून मिळणारे फायदे कमी झाल्याबाबत व्यक्त केलेल्या चिंतांची दखल घेत त्यांनी यावर उपाय म्हणून त्यांनी बॅटरी स्टोरेज सिस्टिम्सचा वापर हा एक व्यवहार्य पर्याय असल्याचे सुचवले. बॅटरी साठवणुकीच्या सुविधेमुळे ग्राहकांना २४ तास स्वस्त वीज उपलब्ध होऊ शकते आणि सरकार अशा तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देत आहे. (वृत्तसंस्था)

**हरितऊर्जा धोरणाचा आराखडा सादर**

फडणवीस यांनी राज्याच्या हरित ऊर्जा धोरणाचा आराखडाही सादर केला. त्यानुसार, २०३० पर्यंत ५२ टक्के आणि २०३५ पर्यंत ६५ टक्के वीज ही नवीकरणीय स्रोतांपासून मिळवली जाईल. ग्रीडची स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावरील बॅटरी आणि पंप्ड स्टोरेज प्रकल्प विकसित केले जात आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## अग्रलेख...

# धर्मो रक्षति रक्षितः...

'धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।
तस्माद्धर्मो न हन्तव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥'

धर्म हा शब्द ऐकला की अनेकांच्या डोळ्यांसमोर केवळ पूजा, प्रार्थना, उपासना किंवा आचार-विचार येतात. परंतु, भारतीय परंपरेत धर्म हा केवळ श्रद्धेचा किंवा कर्मकांडाचा विषय नाही; तो आपल्या समाजरचनेचा कणा आहे, तो कर्तव्याचा मार्ग आहे आणि नैतिकतेचा आधारही. या श्लोकात मांडलेला विचार अत्यंत साधा आहे. तो असा की, जो धर्माचा नाश करतो, धर्म त्याचाच नाश करतो; आणि जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्म करतो. त्यामुळे धर्माचे पालन करणे म्हणजे केवळ स्वतःच्या श्रद्धेचे रक्षण नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या संतुलनाचे रक्षण करणे होय. धर्माचा अर्थ विकृत स्वरूपात मांडण्याचे, त्याचा वापर स्वार्थासाठी करण्याचे आणि समाजात फूट पाडण्यासाठी त्याचा गैरवापर करण्याचे प्रकार वाढताना दिसतात. अशा वेळी सरकारने हस्तक्षेप करणे हा अधिकारांचा नव्हे, तर कर्तव्याचा विषय ठरतो. या पृष्ठभूमीवर विधिमंडळात मांडण्यात आलेल्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक-२०२६ कडे सरकार बजावत असलेल्या सामाजिक कर्तव्याचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. एखादी व्यक्ती धार्मिक आहे किंवा ती एखादा धर्म मानते, याचा लौकिक अर्थ ती व्यक्ती चांगली वागते किंवा पूजापाठ करणारी आहे, असा घेतला जाऊ शकतो. खऱ्या अर्थाने धर्म पालनाचा अर्थ होतो चांगले वर्तन आणि चांगल्या गोष्टींचे संवर्धन. धर्म म्हणजे सत्य, कर्तव्य, संयम, न्याय आणि समन्वय यांचे मिश्रण. धर्माच्या नावाखाली फसवणूक, दबाव, भीती किंवा प्रलोभन यांचा वापर केला जातो, तेव्हा तो धर्म नव्हे तर अधर्म बनतो. भारतीय परंपरेत करुणा आणि सहिष्णुता यांना महत्त्व दिले गेले आहे, पण त्याचबरोबर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवणही दिली आहे. म्हणूनच, समाजात जेव्हा धर्माच्या नावाखाली चुकीचे कृत्य घडते, तेव्हा त्याला आळा घालणे ही देखील धर्माचीच सेवा ठरते. नवे विधेयक ही त्या प्रकारची धर्म सेवा आणि समाज सेवा होय.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात विविध धर्म, संस्कृती आणि परंपरा एकत्र नांदतात. ती आपली ताकद आहे. मात्र, या विविधतेचा गैरफायदा घेऊन कुणी लोकांची दिशाभूल करीत असेल, दबाव टाकत असेल किंवा आमिषे दाखवून त्यांच्या श्रद्धावंत मानसिकतेचा फायदा घेत असेल तर त्यातून त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आघात होतो आणि समाजाच्या संतुलनालाही धक्का बसतो, हे लक्षात घेतले पाहिजे. धर्मांतर हा वैयक्तिक निर्णय नसून परिस्थितीचा परिणाम असतो, हे सांगणाऱ्या अनेक घटना आपल्या भोवताली घडत असतात. भीती, फसवणूक किंवा प्रलोभन यांचा परिणाम म्हणून धर्मांतर केल्याची उदाहरणेही आहेतच. तसे घडू नये यासाठी यासंदर्भात स्पष्ट कायदेशीर चौकट असणे अत्यावश्यक होते. ती उणीव नव्या कायद्याने भरून निघणार आहे. भारतीय संविधानात प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे. पण त्याच वेळी, हे स्वातंत्र्य कुणाच्या फसवणुकीचे साधन बनू नये, याचीही काळजी घेणेही आवश्यक आहे. नवीन विधेयक याच संतुलनावर आधारित आहे. ते कोणाच्याही श्रद्धेवर बंधने घालत नाही; उलट खऱ्या अर्थाने ती स्वतंत्र राहावी यासाठी संरक्षण देणारे हे विधेयक आहे. एखाद्या व्यक्तीने पूर्ण विचारपूर्वक, कोणत्याही दबावाशिवाय आपला धार्मिक मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला असेल तर त्याला कुणीही अडवणार नाही. मात्र, तो निर्णय दबावाखाली घेतला जात असेल, तर त्याला थांबविणे ही सरकारची जबाबदारी ठरते. त्याची तजवीज करणारा हा कायदा आहे.

वरकरणी धर्म बदलल्याने फार मोठे नुकसान किंवा फायदा होतो, असे लोकांना वाटत नाही. प्रत्यक्षात अनेकांना धर्म परिवर्तनाच्या नंतर प्रचंड मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. त्यांचे पालन-पोषण ज्या वातावरणात झालेले असते, त्याहून अगदी वेगळ्या वातावरणात, वेगळ्या समुदायात जुळवून घेणे सोपे नाही. शिवाय, काही वेळा आमिष किंवा जुलूम या घटनांच्या मागे असतो, हेही दिसते. त्यामुळेच अशा निर्णयांसाठी प्रक्रिया निर्धारित करण्यात आली आहे. ती स्वातंत्र्याच्या नियंत्रणासाठी नाही. ती आहे-संबंधित व्यक्तीने धर्म परिवर्तनाचा निर्णय पूर्णपणे स्वेच्छेने घेतलेला आहे किंवा नाही, याची खातरजमा करण्यासाठी. त्यामुळे कुणी कितीही बोंबा ठोकत असले, तरी हा कायदा कुणाची अडवणूक करण्यासाठी नव्हे, तर भाबड्या माणसांची फसवणूक होऊ नये, यासाठी आणला जात आहे, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

या विधेयकातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुटुंबाशी संबंधित तरतुदी. धर्मांतराच्या घटनांमुळे अनेकदा कुटुंबांमध्ये तणाव निर्माण होतो. विशेषतः अशा घटनांमध्ये फसवणूक किंवा दबाव असतो, तेव्हा त्याचे परिणाम गंभीर होतात. अशा स्थितीत मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजाचा पाया असलेल्या कुटुंबव्यवस्थेची स्थिरता टिकविण्यासाठी अशा तरतुदींची गरज होती. या कायद्यामुळे मुलांचे हित, त्यांचे अधिकार आणि त्यांचे भविष्य अधिक सुरक्षित होणार आहे. एखाद्या व्यक्तीच्या धार्मिक विचारात बदल घडवून आणण्याचा संबंध देशाची वीण विस्कटून टाकण्याच्या उद्देशाशी असेल तर त्याला आळा घातलाच पाहिजे. कायद्याचा उद्देश केवळ मार्गदर्शन करणे नसतो. आवश्यक तेथे प्रतिबंध घालणे हेही कायद्याचे काम आहे. त्यासाठीची व्यवस्था या कायद्यात आहे. जे लोक प्रामाणिकपणे वागतात, त्यांना या कायद्याची भीती वाटण्याचे कारण नाही. पण जे लोक धर्माच्या नावाखाली चुकीचे कृत्य करतात, त्यांच्यासाठी 'ही भूमी सहिष्णु असली तरी दुर्बल नाही' असा या विधेयकाचा सांगावा आहे. आजच्या काळात अनेक गोष्टी वैयक्तिक पातळीवर न होता संघटित पद्धतीने घडतात. त्यामुळे अशा गैरप्रकारांमध्ये संस्थांचा सहभाग असेल, तर त्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे. या कायद्यातील तरतुदी अशा प्रकारच्या रॅकेट्सना रोखण्यासाठी उपयुक्त आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे- हे विधेयक महाराष्ट्र सरकारने अचानक आणलेले नाही. त्यामागे सखोल अभ्यास, विविध राज्यांतील अनुभव आणि कायदेशीर विश्लेषणाचे पाठबळ आहे. हे विधेयक केवळ भावनिक प्रतिक्रियेचा भाग म्हणून आलेले नाही. ते विचारपूर्वक उचललेले पाऊल आहे. समाजात दीर्घकालीन स्थिरता निर्माण करण्यासाठी अशा कायद्यांची गरज असते. त्यामुळे समस्यांवर प्राथमिक उपाय करणे शक्य होते आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारीही होत असते. शासकाने एका धर्माच्या मागे उभे राहू नये, हे आपल्या राज्य व्यवस्थेचे तत्त्व असले, तरी समाजाचे व्यापक हित सांभाळण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतात. हा निर्णय त्यातलाच आहे. तो कोणत्याही एका धर्माच्या बाजूने किंवा विरोधात नाही. जे कुणी वाममार्गाने धर्म परिवर्तन घडवून आणत असतील त्यांना या कायद्याने चाप बसेल, हे मात्र नक्की. कोणताही मोठा निर्णय घेतला की त्यावर टीका होतेच. काही जणांना हा कायदा व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर बंधन घालणारा वाटू शकतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, हा कायदा कुणाचेही स्वातंत्र्य मर्यादित करणारा नसून, स्वातंत्र्याचे संरक्षण करणारा आहे. स्वातंत्र्य आणि जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. आपल्या स्वातंत्र्याचा वापर इतरांच्या हक्कांवर आघात करण्यासाठी केला जात असेल, तर त्यावर नियंत्रण आवश्यक असते. या कायद्याच्या अधिष्ठानी असलेले तत्त्व हेच होय. धर्म हा कोणाच्याही स्वार्थासाठी वापरण्याचा विषय नाही. तो प्रत्येकाच्या अंतःकरणाशी जोडलेला आहे आणि त्याचा आदर राखला पाहिजे. हा नवा कायदा त्या आदराचे संरक्षण करणारा, लोकांना आपल्या श्रद्धेप्रति अधिक सजग बनविणारा आणि समाजात विश्वासाची भावना निर्माण करणारा आहे. धर्म हा समाजाच्या अस्तित्वाचा पाया आहे. तो पाया पोखरण्याचा प्रयत्न कुणी करीत असेल तर त्याला रोखले पाहिजेच. 'धर्मो रक्षति रक्षितः' या सूत्रातील आवाहन हेच आहे आणि त्यामुळे हे विधेयक पूर्णपणे योग्य व समर्थनीय आहे.

## विशेष

# भारताची ऊर्जा भविष्योन्मुख वाटचाल

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताने अणुऊर्जा क्षेत्रात धोरणात्मक बदल करीत 'सस्टेनेबल हार्नेसिंग अँड अॅडव्हान्समेंट न्यूक्लिअर टेक्नॉलॉजी फॉर इंडिया' (शांती अॅक्ट २०२५) हा महत्त्वाचा कायदा लागू केला आहे. हा कायदा लागू करताना केंद्र सरकारने 'अॅटॉमेटिक एनर्जी अॅक्ट, १९६२' आणि 'सिव्हिल लायबेलिटी फॉर न्यूक्लिअर डॅमेज अॅक्ट २०१०' हे दोन जुने कायदे रद्द करून त्याऐवजी एकसंध आणि आधुनिक कायदेशीर चौकट तयार केली आहे. त्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक, नियमन आणि विकास यांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. पुढील दोन-तीन दशकांमध्ये देशातील वीजवापर दुप्पट होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. सौर आणि पवन ऊर्जा यासारख्या नवीकरणीय स्रोतांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असला, तरी त्यांची एक मर्यादा आहे. त्यांची उपलब्धता सतत स्थिर नसते. याउलट अणुऊर्जा हा स्थिर आणि सातत्यपूर्ण वीजपुरवठा करणारा स्रोत आहे. त्यामुळे ऊर्जा मिश्रणात अणुऊर्जेच्या वाटा वाढविणे हे भारताच्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाचे मानले जाते. सध्या भारताची अणुऊर्जा क्षमता सुमारे ८.७८ गीगावॅट आहे आणि देशातील एकूण वीज उत्पादनात तिचा वाटा सुमारे तीन टक्के आहे. हा वाटा वाढविण्यासाठी सरकारने महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले आहे. २०४७ पर्यंत १०० गीगावॅट अणुऊर्जा क्षमता निर्माण करण्यात येणार आहे. या पृष्ठभूमीवर तयार करण्यात आलेला 'शांती कायदा' हा केवळ कायद्यांचे एकत्रीकरण नसून अणुऊर्जा क्षेत्राच्या संपूर्ण रचनेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

शांती कायद्याची व्याप्ती तीन प्रमुख स्तरांवर दिसते. त्यात अणुऊर्जा क्षेत्राचे नियंत्रित उदारीकरण, नियामक व्यवस्था मजबूत करणे आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार करणे, यांचा समावेश आहे. नवीन कायद्यामुळे भारतीय खाजगी कंपन्या, संयुक्त उपक्रम आणि इतर मान्य संस्थांना अणुऊर्जा प्रकल्प उभारणे, संचालन करणे आणि बंद करणे यासाठी परवाना घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तथापि, काही अत्यंत संवेदनशील क्षेत्रे अजूनही केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालीच ठेवण्यात आली आहेत. त्यात युरेनियम समृद्धीकरण, अणुइंधन पुनर्प्रक्रिया, उच्चस्तरीय अणुकचरा व्यवस्थापन, जड पाण्याचे उत्पादन यांचा समावेश आहे. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींवर सरकारी नियंत्रण कायम राहणार आहे. या कायद्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील नियमन अधिक स्पष्ट आणि मजबूत करण्यात आले आहे. या अंतर्गत 'अॅटॉमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्ड' या संस्थेला प्रथमच वैधानिक दर्जा देण्यात आला आहे. परिणामी, या संस्थेची स्वायत्तता आणि विश्वासार्हता वाढण्याची अपेक्षा आहे. नवीन कायद्यात परवाने देणे, तपासणी करणे, उल्लंघनांवर कारवाई करणे आणि दंडात्मक कारवाई करणे यासाठी स्पष्ट प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

अणुऊर्जा प्रकल्पांबाबत गुंतवणूकदारांना सर्वाधिक चिंता असते, ती अपघाताच्या परिस्थितीमध्ये होणाऱ्या आर्थिक जबाबदारीची. पूर्वीच्या कायद्यानुसार ऑपरेटरची नुकसानभरपाई जबाबदारी १५ अब्ज रुपये इतकी मर्यादित होती; परंतु पुरवठादारांविरुद्ध कारवाईच्या तरतुदींमुळे आंतरराष्ट्रीय कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास कचरू लागल्या. नवीन कायद्याने स्तरानुसार नुकसानभरपाई प्रणाली लागू केली आहे. मोठ्या रिअॅक्टरसाठी ही मर्यादा ३० अब्ज रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे, तर लहान प्रकल्पांसाठी कमी मर्यादा ठेवण्यात आली आहे. याशिवाय स्वतंत्र अणुऊर्जा नुकसानभरपाई निधी तयार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. भारताने अणुऊर्जा विस्तारासाठी दीर्घकालीन योजना आखली आहे. सरकारच्या मते २०३१-३२ पर्यंत अणुऊर्जा क्षमता २२ गीगावॅटपेक्षा अधिक होऊ शकते. यासाठी देशांतर्गत विकसित ७०० मेगावॅट रिअॅक्टर, आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रकल्प आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

याचबरोबर लघु मॉड्युलर रिअॅक्टर (एसएमआर) विकसित करण्यावरही सरकार भर देत आहे. या क्षेत्रात संशोधनाचे नेतृत्व 'भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटर'सारख्या संस्थेकडे आहे. आज जगभर ऊर्जा संक्रमणाची प्रक्रिया सुरू आहे. सौर आणि पवन ऊर्जेचा विस्तार वेगाने होत असला, तरी त्या स्रोतांची उपलब्धता हवामानावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत अणुऊर्जा स्थिर, कमी कार्बन उत्सर्जन करणारा आणि मोठ्या प्रमाणावर उपलब्ध ऊर्जा स्रोत म्हणून महत्त्वाची ठरते. भारताच्या ऊर्जा धोरणात अणुऊर्जेला आता नवी भूमिका दिली जात आहे, ती नवीकरणीय ऊर्जेची स्पर्धक नसून पूरक स्रोत म्हणून पाहिली जात आहे. 'शांती कायदा' लागू झाल्यानंतर अणुऊर्जा क्षेत्रात गुंतवणुकीच्या नवीन संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. खाजगी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी भारताचे अणुऊर्जा क्षेत्र अधिक आकर्षक बनू शकते. यामुळे नवीन प्रकल्पांची गती वाढू शकते. तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना मिळू शकते. देशांतर्गत उत्पादन आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळू शकते.काही महत्त्वाची आव्हाने अजूनही कायम आहेत. त्यात प्रामुख्याने अणुऊर्जा प्रकल्पांचा प्रचंड खर्च, स्थानिक लोकांचा विरोध, पर्यावरणीय चिंता, नियामक प्रक्रियेत होणारा विलंब यावर प्रभावी उपाययोजना केल्याशिवाय अणुऊर्जा विस्तार अपेक्षित गतीने होणे कठीण ठरू शकते. 'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल आणि आर्थिक विकास या तीन मोठ्या आव्हानांच्या पृष्ठभूमीवर हा कायदा भविष्यातील ऊर्जा धोरणाची दिशा ठरवू शकतो. खाजगी क्षेत्राचा सहभाग, नियामक संरचनेची बळकटी, गुंतवणूक सुलभता आणि तांत्रिक प्रगती या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला नवे आयाम मिळण्याची शक्यता आहे; मात्र या धोरणाचे खरे यश अंमलबजावणीवर अवलंबून राहणार आहे. योग्य नियोजन, पारदर्शक प्रशासन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संगम साधला गेला तर भारताच्या ऊर्जा भवितव्यात अणुऊर्जा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकते.

कायद्यांचे एकत्रीकरणच नव्हे, तर अणुऊर्जा क्षेत्राच्या वाढीस अडथळा ठरणाऱ्या काही संरचनात्मक समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्नही या कायद्यात करण्यात आला आहे. त्यात सरकारी नियंत्रणाखाली असलेले संचालन मॉडेल, गुंतवणूक रोखणारी नुकसानभरपाईची जबाबदारी व्यवस्था, एका बंद, एकमेव ऑपरेटरवर आधारित नियामक रचना हे पूर्वी अडथळे ठरत होते. नवीन कायदा या सर्व बाबींमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. पूर्वी ऑपरेटरला दोषपूर्ण उपकरणांबाबत पुरवठादारांविरुद्ध थेट कारवाई करण्याचा अधिकार होता. यामुळे पुरवठादारांना मोठ्या जोखमीला सामोरे जावे लागत होते आणि अनेक परदेशी कंपन्या भारतात येण्यास कचरू लागल्या.

नवीन कायद्यानुसार फक्त करारात नमूद असल्यास किंवा जाणीवपूर्वक चुकीचे कृत्य सिद्ध झाल्यास पुरवठादारांविरुद्ध कारवाई करता येईल. यामुळे भारताची कायदेशीर चौकट आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत करण्यात आली आहे. कायद्यात नवीन तक्रार निवारण यंत्रणाही तयार करण्यात आली आहे. यामध्ये अणुऊर्जा तक्रार सल्लागार परिषद, नियामक निर्णयांवर अपील करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण, नुकसानभरपाईसाठी विशेष दावा आयुक्त आणि दावा आयोग यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात २०० अब्ज रुपये लघु मॉड्युलर रिअॅक्टर (एसएमआर) विकसित करण्यासाठी देण्यात आले आहेत. २०३३ पर्यंत किमान पाच स्वदेशी 'एसएमआर' कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा वळणबिंदू ठरू शकतो. कायद्यांचे एकत्रीकरण, खाजगी क्षेत्राचा सहभाग, नुकसानभरपाई व्यवस्थेतील सुधारणा आणि नियामक संस्थेची बळकटी या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला अधिक सक्षम आणि विस्तारक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ऊर्जा सुरक्षेसोबतच हवामान बदलाच्या पृष्ठभूमीवर स्वच्छ आणि स्थिर ऊर्जेची गरज वाढत असताना हा कायदा भारताच्या ऊर्जा भवितव्यासाठी महत्त्वाची पायाभरणी ठरू शकतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# दोष हा कुणाचा?

विकृती हा मानवी स्वभावाचा एक भाग मानला गेला तरी त्या विकृत वृत्तीला जोपासले गेले तर ती अनेकांच्या दृष्टीने कशी घातक ठरू शकते. ही जाणीव सर्वांना असूनही जर अशा वृत्ती जोपासल्या जात असतील तर मात्र समाजभान गमावले गेले आहे, असेच म्हणावे लागेल. जी गोष्ट समाजातील प्रत्येकाला शरमेने मान खाली घालावी लागेल, इतकी किळसवाणी असेल आणि ती शासन-प्रशासनाच्या लेखी अंशतः चूक असेल तर मग मात्र विकृत प्रवृत्तींचे पीक येऊन विध्वंस करणार, हे नक्की.

विकृती हा मानवी स्वभावाचा भाग म्हणून आपण त्याला सोडून दिले तर ती समाजाला पोखरत जाते, हे तेवढेच खरे.



एखाद्या व्यक्तीच्या स्वभावात हा 'विकृत' योग असेल तर त्याच्यावर उपाययोजना करण्याची व्यवस्थाही आपल्या समाजात आहे. पण आम्ही तो त्याचा वैयक्तिक विषय म्हणून डोळेझाक करतो आणि बरेचदा तीच विकृती समाजात संवेदनशील विषय बनतात. मान्यच आहे, आम्ही कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करून वळण लावू शकत नाही; किमान जेव्हा संधी मिळेल, तेव्हा असलेल्या अधिकारांचा वापर करून अशा घातक वृत्तींना ठेचून नक्कीच काढू शकतो. हा विषय एवढ्यासाठीच आहे. १० दिवसांपूर्वी जो काही प्रकार भंडारा जिल्ह्यात उघड झाला, तो प्रत्येकाला शरमेने मान खाली घालण्यास लावणारा होता. जो आमच्या आयुष्याला दिशा देतो, ज्याच्याकडून आम्हाला संस्कारांची अपेक्षा आहे. आई-वडिलानंतर जो आमचा एकमेव गुरू असतो, अशा शिक्षकाचा प्रताप विकृतीलाही लाजवेल असाच होता. ज्यांनी जग पाहिलं नाही, अशा चिमुकल्यांच्या शरीराशी खेळून आपली किळसवाणी भूक भागविणाऱ्या शिक्षकाचे बाहेर आलेले प्रताप शिक्षकी पेशालाही कलंकित करून गेले. हद्द म्हणजे, हे प्रकार पुढे आल्यानंतर ग्रामस्थांनी शिक्षकाला चोप दिला, तर तोच शिक्षक 'झालं का तुमचं मारून' म्हणून निर्विकारपणे बोलून जात असेल तर या धाडसामागे कोण? याचा विचार व्हायलाच हवा! एक नव्हे, पाचदा या महाशयांनी प्रताप केले. मार खाल्ला. तुरुंगवास झाला. पण ते नोकरीत कायम आहेत. हे कसं? याचं कोडं काही उलगडलेलं नाही. इतके गंभीर आरोप. दोषी असल्याचा अहवाल सर्वकाही विरोधात असताना प्रत्येक वेळी निलंबनानंतर नोकरीत पुन्हा समाविष्ट केला जाणारा हा शिक्षक इतका प्रभावी कसा असू शकतो? कदाचित पहिल्याच घटनेनंतर या वृत्तीला ठेचले असते तर आज निष्पाप पाच चिमुरड्यांच्या आयुष्याशी खेळण्याची हिंमत त्याची झाली नसती. सर्व काही विरोधात होते. पण तो न्यायालयातून निर्दोष सुटतो. त्यांचे वरिष्ठ अधिकारीही एवढ्या मोठ्या घटनांकडे अंशतः दोषी म्हणून पुन्हा त्याला नोकरीवर घेण्याचे आदेश काढतात आणि इथेच अशा वृत्तींना खतपाणी घातले जाते. १० वर्षांपूर्वी चुकांची जाणीव ठोसपणे करून दिली गेली असती, तर आम्हाला आज विकृत मानसिकतेवर चर्चा करावी लागली नसती. हा यंत्रणेचा दोष की अजून काही? हा अभ्यासाचा विषय असू शकतो, पण ज्यांच्या हातात अधिकार आहेत, त्यांना त्याची जाणीव होऊ नये, याचे नवल वाटते. मुलींच्या आयुष्याशी खेळणे हा जर अंशतः दोष असेल तर पूर्णतः दोष कोणता, हे अशा अधिकाऱ्यांनी स्पष्ट करायला नको का? हा अंशतः दोष हेच अशा वृत्तींची हिंमत वाढण्याचे मूळ कारण आहे. आमची यंत्रणा निद्रावस्थेत आहे. जोपर्यंत ही झापड डोळ्यावरून निघणार नाही, तोपर्यंत अशा विकृतांचे दोष हे अंशतःच असतील, हे नक्की! एका शिक्षकाने केलेले हे कृत्य शिक्षकी पेशाला लाजविणारे आहे. त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून टाकणारे आहे. पण शिक्षकांच्या एकाही संघटनेला अशा शिक्षकाचा निषेध करावा किंवा त्यावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी मागणी करावी वाटले नाही. आम्ही आमच्या पेशाचे म्हणून आणखी किती संवेदना मेल्यागत वागणारा आहोत. एरवी लहानसहान गोष्टींसाठी रस्त्यावर उतरणाऱ्या या संघटना आज मात्र मूग गिळून बसल्या असतील तर विकृतीला त्यांनी दिलेला हा पाठिंबा तर नाही, असा प्रश्न पडतो. शिक्षकांच्या संघटना असोत किंवा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या वागण्याची पद्धत याच गोष्टी अनिल राऊतसारख्या शिक्षकांचे मनोबल वाढवितात आणि त्यांच्यातील विकृतीची जोपासना करतात. जोपासलेले हे विकृत मग कधीतरी समाजभान विसरून बेभान वागतात. या विकृत मानसिकतेला वेळीच ठेचले गेले नाही तर भविष्यात अनेक अनिल राऊत समाजापुढे आव्हान बनून उभे राहतील आणि मग यंत्रणाही हतबल होऊन सर्व तमाशा पाहत असतील. आज अनिल राऊतच्या निमित्ताने विकृत मानसिकतेला संपविण्यासाठी उदाहरण घालून देण्याची चांगली संधी आहे. दोष अंशतः की पूर्णतः याचे मूल्यमापन करीत बसण्यापेक्षा दोष समाजाला घातक हे हेरून कृती करण्याची ही वेळ आहे, असे वाटते!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# ब्रह्मवैवर्त पुराण

**प्रा. दिलीप जोशी**

'ब्रह्मवैवर्त' या नावातील 'वैवर्त' शब्द महत्त्वाचा आहे. वैवर्त शब्द विवर्तन शब्दसंबंधित आहे. विवर्तन म्हणजे चक्र किंवा चाकाचे फिरणे अर्थात परिवर्तन. सरळ आणि सोप्या भाषेत रूपांतरण, नित्यबदल, कायाकल्प किंवा अस्तित्व बदल होय. ब्रह्मवैवर्त म्हणजे ब्रह्माचे विवर्तन.

'ब्रह्मवैवर्त म्हणजे ब्रह्मणो विवर्तः ।'

या पुराणात ब्रह्म राधाकृष्ण रूपात विवर्तित झाले. ब्रह्म कृष्णरूपाने प्रकट झाले, नव्हे श्रीकृष्ण म्हणजेच ब्रह्म. '

विवर्त ब्रह्मकात्स्नर्यं च कृष्णेन यत्र शौनक ।
ब्रह्मवैवर्तकं तेन प्रवदंति पुराविदः ॥'

कृष्णाचे आद्यविवर्त प्रकृती आहे. कृष्णाची आद्या प्रकृती श्रीराधा आहेत. हे ब्रह्मवैवर्त पुराण होय. हे पुराण चार खंडात विभागले आहे. ब्रह्मखंड, प्रकृती खंड, गणपती खंड आणि श्रीकृष्णजन्म खंड असे ते चार खंड आहेत. यातील पहिल्या ब्रह्मखंडात बीजरूप असलेल्या परब्रह्म परमात्म्याचे म्हणजे श्रीकृष्ण तत्त्व निरुपण आहे. दुसऱ्या प्रकृती खंडात प्रकृती स्वरूप परब्रह्म परमात्म्याची आद्याशक्ती श्रीराधा तत्त्वाचे आणि उपतत्त्व लक्ष्मी, दुर्गा, सरस्वती, सावित्री यांचे निरुपण आहे. तिसऱ्या गणपती खंडात परमात्म स्वरूप भगवान गणपती तत्त्वाचे निरुपण आहे. चौथ्या श्रीकृष्णजन्म खंडात भगवान श्रीकृष्ण लीला तत्त्वाचे निरुपण आहे. थोडक्यात ब्रह्मवैवर्त पुराणात भगवान श्रीकृष्ण आणि त्यांची अभिन्नस्वरूपा श्रीराधारासेश्वरी यांचे ब्रह्मस्वरूप आणि लीला वर्णन आहे.

नैमिषारण्यात शौनकादी ऋषी बसले असताना तिथे पुराणप्रवक्ते सूत लोमहर्षन महोदय आणि त्यांचे पुत्र उग्रश्रवा यांचे आगमन झाले. त्यांचे पाद्यपूजन करून शौनकादी ऋषींनी सूतनंदन उग्रश्रवा ज्यांना सौती असेही म्हणतात; त्यांना अद्भुत, अपूर्व आणि अभिष्ट पुराण सांगण्याची विनंती केली. सर्वांच्या विनंतीला मान देऊन सौती यांनी परब्रह्म परमात्म्याचे परात्पर स्वरूप म्हणजे भगवान श्रीकृष्ण. त्यांचे विवर्तन ज्या पुराणात सांगितले सांगितले ते ब्रह्मवैवर्त पुराण होय.

ब्रह्मवैवर्त पुराण श्रीकृष्णाने ब्रह्मदेवांना, ब्रह्मदेवांनी धर्माला, धर्माने आपला पुत्र नारायणाला, नारायणाने नारदांना, महर्षी नारदांनी व्यासांना, महर्षी व्यासांनी सूतनंदन सौती यांना सांगितले होते. या पुराणात सर्वप्रथम ब्रह्मखंड असून यात गोलोकातील भगवान श्रीकृष्ण यांचे महिमान आहे. श्रीकृष्ण हेच एकमात्र सत्य असून सर्वोच्च ब्रह्म आहे. त्यांच्यापासूनच सृष्टीचा प्रारंभ झाला. गोलोकात भगवान श्रीकृष्णाच्या वामभागातून श्रीराधा यांचे



प्राकट्य, श्रीराधा यांच्या रोमातून गोपिकांचे निर्माण झाले. भगवान श्रीकृष्णानेच आदिशक्ती महालक्ष्मी, महासरस्वती प्रकट केल्या. शिवशक्ती विवाहही त्यांचीच इच्छा होय. ब्रह्मदेवाकडून सृष्टी निर्माण ही श्रीकृष्ण परमात्म्याच्याच इच्छेने झाली. वैकुंठ, शिवलोक, गोलोक यांचे शाश्वत स्थान या पुराणात दिले आहे. याच पुराणातील प्रकृती खंडात दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री आणि श्रीराधा या पंचदेवी म्हणजे प्रकृती असून सृष्टी या पंचदेवीवर अवलंबून असल्याचे प्रारंभीच स्पष्ट केले. परिपूर्णतम श्रीकृष्ण आणि चिन्मयी श्रीराधा यांच्या दिव्य तेजातून विराटस्वरूप बालक म्हणजे श्रीमहाविष्णू निर्माण झाल्याची कथा या पुराणात आहे. याज्ञवल्क्य यांनी केलेली भगवती सरस्वती स्तुती, गंगा उत्पत्ती कथा, तुळशी कथा, तुळशी वृक्ष जन्म, शाळिग्राम पाषाण निर्मिती कथा विस्ताराने आली आहे. वेदजननी सावित्री स्तुती, सावित्री उपासनेने राजा अश्वपतींना कन्यारत्न, त्या कन्यारत्नाचे नाव सावित्री, सत्यवान सावित्री कथा या पुराणात आहे. भगवती लक्ष्मीचे समुद्रमंथनातून प्राकट्य, भगवती स्वाहा, स्वधा, दक्षिणा, षष्ठी, मंगलचंडी, मनसादेवी, आद्य गौमाता सुरभी यांचे उपाख्यान या पुराणात आहे. गणपती खंडात गणेश उत्पत्ती कथा, श्रीगणेशावर शनीचा दृष्टिपात, श्रीगणेशाला गजमुख लावण्याची कथा, गणपतींना अग्रपूजेचा मान, कार्तिकेय नंदी संवाद, गणेश यांची एकदंत होण्याची कथा, परशुराम कथा, गणेश स्तुती या पुराणात आहे. श्रीकृष्ण जन्म खंडात श्रीकृष्ण जन्म वृत्तांत, गोकुळात आगमन, बाललीला, रासलीला, मथुरागमन, कंसवध, द्वारकापुरी निर्माण, रुक्मिणी हरण इत्यादी श्रीकृष्ण चरित्र या पुराणात आहे. ब्रह्मवैवर्त पुराणातील तत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. इथे श्रीकृष्ण परमात्मा सर्वोपरी आहे. ते गोलोकधामात राहतात. त्यांच्या सोबत श्रीराधा आणि गोप-गोपिका राहतात. गोलोकधाम शिवलोक, वैकुंठ, भूलोकाच्याही वर आहे. जिथे जन्ममृत्यू जरा व्याधींना स्थान नाही. श्रीकृष्णाच्याच शरीरातून भगवान नारायण विष्णू आणि भगवान शिव प्रकट झाले. श्रीराधा ही श्रीकृष्णाच्या वामांगातून निर्माण झालेले व त्यांच्या हृदयात कायम निवासी असलेले कृष्णतत्त्वच आहे. श्रीराधा आद्याप्रकृती असून तिचे दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री ही रूपे आहेत. तिच्यातूनच गंगा, तुलसी, मनसा, स्वाहा, स्वधा इत्यादी रूपे उत्पन्न झालीत. श्रीराधा श्रीकृष्णाची तर श्रीकृष्ण श्रीराधेची आराधना करतात. म्हणजे ते परस्पर आराधक आणि आराध्य आहेत.

'राधा भजति श्रीकृष्णम् स च तां च परस्परं ।
उभयोः सर्वसाम्यं च सदा संतो वदंति च ॥'

श्रीकृष्ण गोलोकात रासमंडलात असताना त्यांच्या वामभागातून उत्पन्न झाल्यामुळे श्रीराधा आयोनी आहेत. श्रीदामा यांच्या शापवाणीमुळे श्रीराधा यांना वाराहकल्पात गोकुळात श्रीवृषभानू आणि माता कलावती यांच्या पोटी जन्म घ्यावा लागला. असे असले तरी प्रत्यक्षात योगमायेने माता कलावतीच्या गर्भात वायू होता. जन्माच्या वेळी श्रीराधा तेथे स्वेच्छेने अयोनी प्रकट झाल्या. त्यांचे लग्न प्रसंगात त्यांचे पती श्रीरायान यांच्याशी श्रीराधा यांचा विवाह नसून श्रीराधा यांच्या छायारूपाशी विवाह झाला आणि त्या स्वयं अंतर्धान पावल्या. श्रीदामा यांच्या शापाने श्रीराधा यांना भूतलावर प्रकट व्हावे लागले; तद्वतच श्रीराधा यांच्या प्रतिशापाने श्रीदामा भूतलावर शंखचूड नावाच्या राक्षसरूपात जन्माला आले. त्यांचा विवाह तुळशी यांच्याशी झाला. तुळशीचे श्रीहरीकडून पातिव्रत्य भंग, शंखचूड वध, तुळशीचा श्रीहरीला श्राप, विष्णूचे शालिग्राम रूप तुळशीला हरिप्रिया म्हणून वरदान ही कथा या पुराणात दिली आहे. पुराण हा भारताचा इतिहास, भूगोल, परंपरा, संस्कृती सांगणारे वाङ्मय असून आपला वारसा आहे. त्यातही ब्रह्मवैवर्त पुराण अतीव रोचक, मधुर, ज्ञानवर्धक आणि कल्याणकारी आहे. त्याचा अभ्यास नव्या पिढीने केल्यास नवनीत निश्चित मिळेल.

९८२२२६२७३५

### माणूस माणसापासून दुरावतोय?

माणूस हा निसर्गतःच समाजप्रिय प्राणी आहे, माणूस कोणाकडे जात-येत नसला, तरी तो माणसांच्या वस्तीतच घर बांधतो. आज कामाच्या व्यापात आणि स्पर्धेच्या युगात प्रत्येक माणूस धावत आहे. उसंत घ्यायलाही तो विसरत आहे. त्यामुळे आपण आणि आपलं, ही वृत्ती बळावत चालली आहे. मग विचार येतो की, खरंच माणूस माणसापासून दूर चाललाय काय? या धावपळीच्या युगात कुटुंबातला प्रत्येक जण यंत्रासारखा पळतोय. घरातून बाहेर पडताना आपण कुटुंबीयांना घाईतच 'लव्ह यू', 'मिस यू' बस्स! एवढेच शिल्लक राहिले आहे. विचार करा, आपण आपल्या मुलांना दिवसातून एकदा तरी जवळ घेतो का? त्यांच्या केसातून मायेने हात फिरवतो का? नात्यांमधला औपचारिकपणा वाढला आहे.

तरुणाई नातेवाईकांनाही ओळखत नाही. कोणाशी, कोणते नाते हे त्यांना सांगता येत नाही. जेवढ्यास तेवढे ही वृत्ती वाढत आहे. यामुळे नात्यातील गोडवा, प्रेम लुप्त होतेय. वाढत चाललेला हा औपचारिकपणा कमी व्हायला हवा तरच माणसातले आपलेपण टिकून राहील. माणसांच्या गावात वा शहरातच तो वस्ती करतो. म्हणजे प्रत्यक्ष ओळखीत अथवा येता-जाता कोणाशी गप्पा मारण्यात तो रमत नसला, तरी आजूबाजूच्या माणसांचा कानोसा घेतच तो आपल्या कोषात आपले आयुष्य व्यतीत करीत असतो. नाण्याला जशा दोन बाजू असतात तशाच माणसांबाबत विचार करतानाही सर्व बाबींचा विचार करावा लागेल तरच आपण योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचू की खरंच माणूस माणसापासून दूर जातोय का?

**रूपाली जयदीप हिरवे**/पुणे, ९७६६४०५१२५

● ● ● ●

### इच्छामरण : दया की हस्तक्षेप?

एखाद्या जिवाला होणाऱ्या वेदना सोसणे किंवा पाहणे अशक्य होते त्यावेळी इच्छ मरण मिळावे असे वाटते आणि असे वाटणे बरोबर आहे. प्रत्येकाचे जीवन हे दोन सिद्धांतावर आधारित असते. एक आहे कर्म-फल सिद्धांत आणि दुसरा पुनर्जन्म सिद्धांत! या सिद्धांतांचा सोपा अर्थ असा आहे की, प्रत्येक कर्माला फळ आहे आणि ते करणाऱ्या व्यक्तीला ते भोगावेच लागते. एका जन्मात ते भोगून झाले नाही तर त्यासाठी पुढचा जन्म मिळत असतो. आपला प्रत्येकाचा सध्याचा जन्म हा मागील अनेक जन्मातील योग्य-अयोग्य कृतींचे फळ उपभोगण्यासाठीच झालेला असतो. असाध्य आजार होणे किंवा अन्य कोणत्याही कारणांनी परिस्थिती असहनीय होणे आणि परिस्थितीत काही सुधारणा होणार नाही, असे चित्र असल्याने जीवन संपवावेसे वाटणे ही एक भावना आहे; विचार आहे. एका अर्थाने ती भगवंताच्या नियोजनात अज्ञानामुळे केलेली ढवळाढवळ आहे.

रस्त्यावर वाहन वाहतुकीच्या नियमांनुसार चालवले नाही तर आपल्याला शिक्षा होते तसेच भगवंताच्या नियमांचे उल्लंघन झाले तर शिक्षा होणारच आहे. स्वतःचे किंवा दुसऱ्याचे जीवन संपवणे हे भगवंताच्या नियमांचे उल्लंघनच आहे. मग यावर उपाय काय तेही हिंदू धर्माने सांगून ठेवले आहे. आपल्या जीवनाचा उद्देश फक्त आपल्या मागील जन्मांतील योग्य अयोग्य कृतींचे फळ म्हणजेच प्रारब्ध भोगणे एवढाच नाही तर चिरकाल टिकणाऱ्या आनंदाची प्राप्ती हा सुद्धा उद्देश आहे. आपले प्रारब्ध कितीही भयंकर असले तरी सच्चिदानंदस्वरूप असलेल्या भगवंतासमवेत मनाने राहून जीवन जगत असताना म्हणजेच आपले प्रारब्ध भोगून संपवताना आनंदी राहता येते. भगवंतासोबत मनाने कसे राहावे तर ते नामस्मरणाने सहज शक्य आहे. हाक मारली तर ती व्यक्ती मागे वळून पाहते तसेच आपण नामस्मरण सुरू केले तर भगवंत आपल्याकडे पाहतो. जीवन संपवावेसे वाटणे इतके ते भयानक असेल तर त्याला आपणच कारणीभूत आहोत, हे स्वीकारावे लागेल. पण ते आपल्या मनाने संपवले तर त्यासाठी भगवंताच्या कायद्यानुसार असलेल्या शिक्षा भोगायची तयारी आपल्याला ठेवावी लागेल. त्यापेक्षा नामस्मरणाची कास धरूया आणि जीवन आनंदात जगूया.

**छाया मिराशी**/पुणे

● ● ● ●

### पाण्याचे दुर्भिक्ष्य

१५ मार्च २०२६ च्या तरुण भारतात पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि १४ मार्चच्या अंकात विदर्भातील ८२ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १४ पूर्ण. उर्वरित ६८ प्रकल्प प्रगतिपथावर व ८ प्रकल्पांचे काम रखडले. उन्हाळा जेमतेम सुरू होत आहे तर काही गावांना टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आलेली आहे. सद्यस्थितीत सुरू असलेल्या ६८ प्रकल्पांची एकूण अद्ययावत किंमत सुमारे १ लाख ४२ हजार कोटी रुपये इतकी असून मार्च २०२५ अखेर ५७ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. सिंचन प्रकल्पांमुळे पिण्यासाठी पाण्याची सोय, पिकांसाठी सिंचनाची सोय व कारखान्यांसाठी पाण्याची सोय होत असते. सिंचन प्रकल्पांमुळे पूर नियंत्रण होत असते. काही सिंचन प्रकल्पामुळे वीज निर्मिती होत असते. अशी सिंचन प्रकल्पांची उपयुक्तता लक्षात घेता विदर्भातील ८२ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १४ पूर्ण झाले ही बाब चिंतनीय आहे. उपरोक्त आकडेवारी बघता विदर्भातील सिंचन प्रकल्पांचे पुनर्नियोजन करणे आवश्यक आहे असे वाटते. सिंचन प्रकल्प व पाणी अत्यंत महत्त्वाच्या बाबी असल्यामुळे याचे यथोचित नियोजन होणे जरुरी आहे.

**शशिकांत दलाल** /नागपूर, ९८२२३६५१९०

● ● ● ●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमूर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. Publised at TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, RNI No. MAHMAR/2023/86477
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



**सोलापूर महानगरपालिकेच्या कामकाजाकरीता**

**सोलापूर महानगरपालिका**

**सूचना**

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची (ड) प्रकरण २ (शेडयूल चॅप्टर २) मधील नियम क्रमांक १ (जे) अन्वये)**

**कार्यपत्रिका क्र. ३**

**मार्च २०२६ (पुरवणी)**

सोलापूर महानगरपालिकेची मासिक मा. सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक २०-३-२०२६ रोजी सकाळी ११.३० (साडे अकरा) वाजता** महानगरपालिकेच्या कै.यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृह (कौन्सिल हॉल) येथे भरेल. सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

(**टिप:** प्रस्तावाचा सारांश देण्यात आलेला असून मूळ प्रस्ताव सर्वसाधारण सभेत वाचून दाखविण्यात येईल)

**-मा.सभासद प्रस्ताव-**

**२९) मा.श्रध्दा पवार व मा.कल्पना कारभारी यांचा दि.०९/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर शहर हद्दीतील डी-मार्ट ते विजापूर हायवे पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे कामाबाबत.
वरील विषयास अनुसरून डी- मार्ट ते विजापूर हायवे पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे रक्कम ३ कोटी ५१ लाख इतक्या रक्कमेचे डांबरीकरण करणे हे कोणत्या योजनेमधून मंजूर आहे.
२.जर सदर काम राष्ट्रीय धुळमुक्त योजनेमध्ये मंजूर असेल तर संबंधित अधिकारी खुलासा करतील का?
अ) पूर्वगणनापत्रकाचे नाव रस्ता डांबरीकरण करणे असे असताना ३ कोटी ५१ लाख रुपयाचे डांबरीकरण करण्यात येणार आहे का?
ब) जर नसेल तर नक्की काय करणार आहेत.
क) फक्त मुरमाचा रस्ता करणार असेल तर पुर्वगणनापत्रकामध्ये नाव डांबरीकरण करणे असे दिलेले आहे.
ड) मुरमीकरण करणे हे राष्ट्रीय धुळमुक्त योजनेमध्ये नियमात बसते का?
इ) जर मुरमीकरण करुन धुळमुक्त करता का धुळ वाढविण्याचे काम करता याचा खुलासा करावा.
फ) जर नियमानुसार नसेल तर असे नियम बाह्य काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार याचा खुलासा करावा. याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**३०) मा.अक्षयकुमार अंजिखाने व मा.बिज्जु प्रधाने यांचा दि.१२/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर महानगरपालिका अंतर्गत महापौर महोदयांच्या उपस्थितीत नुकतीच शहरातील स्मशान भूमी आढावा बैठक पार पडली, या बैठकीत लिंगायत स्मशान भूमी करीता पूर्व भागातील शांती चौकातील अक्कलकोट रोड टिपी.०१. प्लॉट १२ जुना सर्व्हे ९७०१ येथील २ एकर जागा देण्याबाबत यापूर्वी सर्वसाधारण सभा संदर्भ विषय क्र १७१ ठराव क्रमांक १७१ दिनांक १२/०८/२०२५ रोजी झालेला होता याबाबत चर्चा झाली, याप्रसंगी सिद्धेश्वर देवस्थानला देखभाल बाबत सोलापूर महानगरपालिकेने सिद्धेश्वर देवस्थानास ०५/१२/२०२५ रोजी सदर स्मशान भूमी देखभाल बाबत पत्र दिले होते. त्यानंतर सिद्धेश्वर देवस्थान कमिटी अध्यक्ष धर्मराज काडादी व महापौर साहेबांची ही चर्चा झाली असून, सिद्धेश्वर देवस्थान ने देखभाल बाबत सहमती दिली आहे. त्यांना रूपाभवानी येथील रुद्रभूमी स्मशान भूमी चालविण्याचा अनुभव देखील असल्याने त्यांना देखभाल करीता देणे सोयीस्कर आहे.तरी याबाबतचा प्रस्ताव घेणेबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव

**३१) मा.मंजिरी किल्लेदार व मा.ज्ञानेश्वरी देवकर यांचा दि.१२/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर महानगरपालिका अंतर्गत दि.२६/०२/२०२६ रोजी माननिय आयुक्त यांना लेखी निवेदनाद्वारे सर्व मिळकतीवरील दंड व्याज व शास्ती शंभर टक्के माफ करावे व त्यानतर उरलेल्या मिळकत कराची रक्कम एक रक्कमी भरण्यास नागरिक तयार आहेत. व शंभर टक्के शास्ती माफ करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्यासाठी नागरिकांकडून तिव्र भावणा व्यक्त होत आहे.सोलापूरातील कष्टकरी जनतेच्या भावणा लक्षात घेऊन आर्थिक वर्षातील ३१ मार्च अखेरपर्यत मिळकतकरावरील सर्व दंड शास्ती माफ करावी व नागरिकांच्या भावणेचा आदपूर्वक विचार व्हावा. पूर्वी महानगरपालिकेने वरील विषयासंदर्भात मिळकतकरावरील दंड व्याज शास्ती माफ करुन उर्वरित मिळकतकरावर एक रक्कमी अभय योजना वेळोवेळी राबविलेली आहे.

तरी उपरोक्त नमुद कामी मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**३२) मा.मंदाकिनी तोडकरी व मा.बिज्जु प्रधाने यांचा दि.१२/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** प्रभाग क्रं.५ बाळे शिवाजी नगर इत्यादी परीसर आहे. तरी माझ्या प्रभागा मध्ये लक्ष्मी नगरच्या बाजुला नविन नगर वसलेले आहे तरी त्या नगरास आज पर्यंत कोणतेही नामकरण नसल्या कारणाने तेथील नागरीकांच्या मागणी नुसार तेथील नगरास "आदीला नगर" असे नामकरण करण्यात यावे.म्हणून मी एक मनाने बोर्डात ठराव मंजुर करून त्या नगरात "आदीला नगर" असे नामकरण करण्यास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**३३) मा.मंदाकिनी तोडकरी व मा.बिज्जु प्रधाने यांचा दि.१२/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- शिवाजी नगर बाळे प्र.क्रं. ५ इ. परीसर आहे. तरी माझ्या प्रभागा मध्ये बंजारा समाज (लमाण समाज) मोठया प्रमाणात राहत असल्याने व तेथुनच पुणे हायवे रोड, व विजापूर बायपास लगत असलेला चौक हा नागरिकांचा दृष्टीने महत्वाचा व वर्दळीचा आहे. तरी बंजारा समाजाचे आराध्द दैवत संत व श्री सेवालाल महाराज यांच्या स्मृती प्रित्यर्थ सदर चौकास " संत श्री सेवालाल महाराज चौक" असे नामकरण करणेस **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**३४) मा.गणेश वानकर,मा. विनोद भोसले, मा.अमोल शिंदे, मा.जयकुमार माने, मा.अनंत जाधव, मा.बिज्जु प्रधाने, मा.सुनील खटके, मा.शिवाजी (तात्या) वाघमोडे, मा.विजय चिप्पा, मा.श्रध्दा पवार, मा.सतिश सिरसिल्ला, मा.दिपाका यंलदडी, मा.विनायक विटकर, मा.सारिका खजुरगी, मा.कल्पना कदम, मा.सोनाली गायकवाड, मा.मृण्मयी गवळी, मा.अश्विनी चव्हाण यांचा दि.१३/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविणाऱ्या माँसाहेब जिजाऊचा इतिहास व प्रेरणा नविन पीढीच्या मनावर कोरली जावी व त्यांच्या जाज्वल्य इतिहासाची प्रेरणा घेऊन युवक युवतींनी वाटचाल करावी या हेतूने सोलापूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी चार पुतळा चौकात असलेल्या कोणत्याही पुतळ्यास बाधा न आणता चार पुतळाच्या बाजूला महापालिकेच्या जागेत माँसाहेब जिजाऊ यांचा पुर्णाकृती पुतळा व्हावा ही संपूर्ण सोलापूरकरांची मागणी आहे. चार पुतळ्याच्या बाजूला महापालिकेच्या जागेत माँसाहेब जिजाऊचे पुर्णाकृती पुतळा करणेकामी तातडीने प्लॅन इस्टीमेट करण्यास मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**३५) मा.रवि शंकर कय्यावाले व मा. भारतसिंग बडूरवाले यांचा दि.१३/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- प्रभाग क्रमांक २१ मधील महाराणा प्रताप झोपडपट्टी गेल्या पन्नास वर्षापेक्षा जास्त वर्षे पासून म्हणजे मजरेवाडी ग्रामपंचायत होती तेव्हापासून वास्तवात आहे. सदर झोपडपट्टीमध्ये गरीब कामगार वर्गीय लोक राहतात म्हणून महाराष्ट्र शासनाने गलीच्छ वस्ती म्हणून झोपडपट्टीस मान्यता दिली आहे. सदर झोपडपट्टी ही मातोश्री रमाबाई आंबेडकर मार्ग मीरा सोसायटी लगत ते भाग्योदय सोसायटीच्या दक्षिणेपर्यंत व्यापलेली असून हजारो गरीब लोक येथे राहतात. दि.२१/१०/२०१० रोजी सदर झोपडपट्टीचा मातोश्री रमाबाई आंबेडकर मार्ग पासून चा भाग म्हणजे झोपडपट्टीच्या उत्तरेकडील भाग मनपाने अतिक्रमण म्हणून पाडले होते. यात, ईश्वर उद्धव सिंग शिवसिंग वाले, कौशल्याबाई छोटूसिंग शिवसिंगवाले, सिताराम तुळजाराम शिवसिंगवाले, मिराबाई नारायण गोरंदेवाले, गंगाराम तुळजाराम शिवसिंगवाले, रतन गंगाराम शिवसिंगवाले, लक्ष्मीबाई राजाभाऊ चव्हाण, नागनाथ गंगाराम शिवसिंगवाले, अनिता वीरसिंग शिवसिंगवाले, घनश्याम सिताराम शिवशिंगवाले, भारत सिताराम लंबूवाले, शारदाबाई कन्हैया मैनावाले, सिताराम अमर तुक्कुवाले, यांची राहती घरे पाडली गेली होती त्यानंतर वरीलपैकी काही झोपडपट्टी धारक रहिवाशी हे मे कोर्टात न्याय मागण्यास गेले मे कोर्टाने दिनांक २९/२/२०१२ रोजी सदर लोकांची पाडलेली घरे त्याच जागेवर बांधून देण्याचे आदेश दिले होते. त्याची प्रत या प्रस्तावासोबत जोडलेली आहे.

त्यानंतर मनपाने सदर निकालाच्या विरोधात अपील केले होते. आपली चा निकाल दिनांक १६/१/२०१५ रोजी मनपाच्या विरोधात लागला. नंतर सदर गरीब लोकांनी स्वतःच्या खर्चातून पुन्हा आपली घरे बांधून घेतली आहे. सदर लोकांना मनपाने पाणी दिवाबत्ती व राहत्या घरात समोर बारा फुटाचा रस्ता सुद्धा करून दिलेला आहे.

वरील नमूद गरीब कामगार लोक बेघर होऊ नये यांचे संसार उघड्यावर येऊ नये म्हणून सदर लोकांना येथेच राहण्यास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**३६) मा.रवि शंकर कय्यावाले व मा. भारतसिंग बडूरवाले यांचा दि.१३/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- लोधी समाजाच्या विरांगणा राणी अवंतीबाई लोधी यांचा जन्म १६ ऑगस्ट १८३१ रोजी मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यात झाला होता.

विरांगण राणी आवंतीबाई लोधी ही मध्य प्रदेशातील रामगड च्या राणी होत्या, १८५७ च्या बंडात ब्रिटिशांच्या विरोधात सशस्त्र युद्ध केले, २० मार्च १८५८ रोजी ब्रिटिश सैन्याने वेढलेली असताना सुद्धा अवंती बाई लोधी यांनी शरण न जाता हौतात्म्येय पत्कारले.

विरांगणा राणी अवंतीबाई लोधी यांचा इतिहास प्रेरणादायी आहे. म्हणून भारत सरकारने २० मार्च १९८८ रोजी विरांगणा राणी अवंतीबाई लोधी यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट जारी केले. वीरांगणा राणी अवंतीबाई लोधी यांची जयंती १६ ऑगस्ट रोजी मध्य प्रदेशात आणि उत्तर प्रदेशात शासकीय सुट्टी असते. मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश येथील चौका चौकात वीरांगणा राणी अवंतीबाई लोधी यांचे अश्वारूढ पुतळे सरकारने उभे केलेले आहे.

आपल्या सोलापुरात सुद्धा लोधी समाजाची संख्या जास्त आहे सोलापुरातील लोधी समाज विरांगणा राणी अवंतीबाई लोधी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतो विरांगणा राणी अवंतीबाई लोधी यांचा अश्वारूढ भव्य पुतळा सोलापुरात व्हावा अशी लोधी समाज सातत्याने मागणी करत आहे. आज २० मार्च आहे २० मार्च १९८८ रोजी विरांगणा राणी अवंतीबाई लोधी यानी हुतात्मे स्वीकारले होते म्हणून आजच्या दिवशी सोलापुरात वीरांगण अवंतीबाई लोधी यांच्या पुतळ्यासाठी जागेला मान्यता देणे हीच खरी आदरांजली होईल.

म्हणून आपल्या महानगरपालिकेची नाना नाणी पार्क येथील जागेत वीरांगणा राणी अवंतीबाई लोधी यांचा अश्वारूढ पुतळा बसण्याकरिता ही सभा मान्यता देत आहे बसण्याकरिता **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**३७) मा .अर्चना वडनाल व मा. बिज्जु प्रधाने यांचा दि.१३/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :-
**१**. दिनांक ०१/०१/१९९१ ते ३०/१२/२०१० या कालावधीत जाई-जुई संस्थेकडून फासप्रो प्रणालीमध्ये जन्म-मृत्यू नोंदींची डेटा एन्ट्री करून ती जन्म-मृत्यू कार्यालयाकडे सुपूर्द करण्यात आलेली आहे. त्याच आधारे यापूर्वी अनेक दाखलेही देण्यात आलेले आहेत. मात्र, सध्या संबंधित नागरिकांनी रितसर अर्ज केल्यानंतर "रजिस्टर फाडलेले आहे, १३(३) करून आणा" असे तोंडी उत्तर देण्यात येत आहे. जर डेटा उपलब्ध आहे व पूर्वी त्याच आधारे दाखले देण्यात आले असतील, तर आज अचानक १३ (३) प्रक्रिया लावणे हा नागरिकांवर अन्याय असून प्रशासकीय अपयश झाकण्याचा प्रकार आहे.
**२**. दिनांक ०१/०१/२०११ ते २०२१ या कालावधीत "मायनेट" प्रणालीमध्ये नोंदी करण्यात येत होत्या व नियमित दाखले देण्यात येत होते. त्यामुळे संबंधित नोंदी तपासून तात्काळ दाखले देण्यात यावेत.
**३**. सध्या सर्व जन्म-मृत्यू रजिस्टरचे स्कॅनिंग करून अपलोड करण्यात आले आहे, परंतु डेटा एन्ट्री अपूर्ण ठेवून नागरिकांना न्यायालयीन प्रक्रियेकडे ढकलणे ही गंभीर व निष्काळजी बाब आहे. नागरिकांची चूक नसताना त्यांना १३(३) प्रक्रिया करण्यास भाग पाडणे हे अन्यायकारक व कायद्याच्या विरोधात आहे.
म्हणून आपण तात्काळ खालील कार्यवाही करावी :

१९९१ ते २०१० कालावधीतील उपलब्ध डेटा अधिकृत संकेतस्थळावर समाविष्ट करून नियमित दाखले देण्यात यावेत. २०११ ते २०२१ मधील मायनेट नोंदींच्या आधारे त्वरित दाखले देण्यात यावेत.

तरी प्रलंबित डेटा एन्ट्री तातडीने पूर्ण करावी. संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून प्रशासकीय कारवाई करावी. मा.आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.**

**३८) मा मंजिरी किल्लेदार व मा.अर्चना वडनाल यांचा दि.१३/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सो.म.पा.झोन कार्यालय येथे टेंडर प्रक्रिया राबवून त्याठिकाणी झोन कार्यालयासाठी वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. परंतू विशेषकरुन हद्दवाढ भागातील झोन कार्यालय येथे मोठ्या प्रमाणात रोड मेंटेनन्स, ड्रेनेज चेंबर चोक अप होणे, मुरुम घालणे, हापसा दुरुस्ती इत्यादी बऱ्याच प्रकारची मेंटेनन्स कामे हद्दवाढ भाग असल्यामुळे मोठ्या प्रमाणात निघतात. तसेच पावसाळयामध्ये मेंटेनन्स कामे मोठ्या प्रमाणात निघतात व त्यामुळे प्रभागाच्या वेगवेगळ्या भागात एकाच दिवशी एकाच वेळी असंख्य मेंटेनन्स कामे निघाली असता सदर मेंटेनन्स कामे तातडीने मार्गी लावणेसाठी झोन कार्यालयातील मक्तेदार अपयशी ठरत असल्याचे मागील दोन महिन्यांच्या कालावधीपासून माझ्या निदर्शनास आलेले आहे.

तरी झोन कार्यालयातील जनतेच्या दैनंदिन मेंटेनन्स कामे तात्काळ व समाधानकारक पद्धतीने मार्गी लावणेसाठी पुर्वीचे टेंडर प्रक्रिया राबवून त्याठिकाणी वार्षिक मक्तेदार नेमलेल्या आहे. त्याचबरोबर टेंडर प्रक्रियेतील सेकंड मक्तेदार ह्यंनादेखील झोन कार्यालय येथे तातडीने नियुक्ती करावी.

तरी उपरोक्त नमुद कामी मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करावी यांस ही सभा **धोरणात्मक मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.**

**३९) मा.सफीया चौधरी व मा.आसिफ शेख यांचा दि.१३/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- माझे प्रभाग क्रमांक २० अ मधील होटगी रोडवरील ब्रम्हदेव नगर येथील तांबोळी घर ते मुल्ला घर पर्यंत प्रत्येक पावसाळ्यात या भागातील २५ ते ३० घरामध्ये पावसाचे पाणी शिरते. या भागात ड्रेनेजचे पाईप लाईन कमी आकाराचे घालण्यात आलेले आहे. त्यामुळे या भागातील ड्रेनेज ब्लॉक होऊन पाणी रस्त्यावर साचत असून अनारोग्य परिस्थिती निर्माण होत आहे.

त्यामुळे तांबोळी घर ते मुल्ला घर पर्यंत तुर्त रस्ता उकरुन नैसर्गिक उतार करुन रस्ता डांबरीकरण करणेस **मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.**

**४०) मा.अजय पोन्नम व मा. उज्वल दासरी यांचा दि.१४/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- विडी घरकुलचे भाग्यविदाते स्व. श्री. महेश अण्णा. विष्णूपंत कोठे यांच्या आकस्मित निधनाने सोलापूर वासीयांचा स्वर्गीय महेश अण्णा कोठे हे सोलापूरच्या राजकारणातील आणि समाजकारणातील एक अत्यंत अभ्यासू, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्व होते. त्यांच्या आकस्मित निधनाने सोलापूर शहराने, विशेषत विडी घरकुल आणि परिसरातील कष्टकरी जनतेने आपला हक्काचा 'लोकनेता' गमावला आहे.

स्व महेश अण्णा विष्णूपंत कोठे यांच्या विडी घरकुल परिसरात त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रवेशद्वार (Gate) आणि पूर्णकृती पुतळा उभारण्याचा प्रस्ताव हा केवळ एक स्मारक नसून, त्यांनी या भागासाठी दिलेल्या योगदानाचा तो एक कृतज्ञ तापूर्वक सन्मान ठरेल.

स्व. महेश अण्णा कोठेः व्यक्तिमत्व आणि कार्य कष्टकऱ्यांचा आधारस्तंभ महेश अण्णांचे विडी घरकुल परिसराशी अत्यंत जवळचे नाते होते. या भागातील विडी कामगार आणि कष्टकरी कुटुंबांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्राधान्य दिले. नागरी सुविधा असो किंवा वैयक्तिक अडचण, अण्णा नेहमीच धावून जात असत. दूरदृष्टीचे नेतृत्व सोलापूर महानगरपालिकेत काम करताना त्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा मांडला होता. रस्ते, पाणी, ड्रेनेज आणि शिक्षण या मूलभूत गरजांवर त्यांचा विशेष भर होता. प्रलंबित प्रश्नांना तांत्रिक आणि राजकीय पातळीवर मार्गी लावण्याचे कसब त्यांच्याकडे होते. सर्वपक्षीय नेत्यांशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. त्यांच्या शब्दाला प्रशासनात आणि जनमानसात वजन होते.

विडी घरकुलच्या मुख्य प्रवेशद्वारावर त्यांचे नाव आणि पुतळा असल्यास, येणाऱ्या-जाणाऱ्या पिढीला त्यांच्या समाजकार्याची प्रेरणा मिळत राहील. हा परिसर अण्णांच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. त्यामुळे या परिसराला त्यांच्या नावाने ओळख मिळणे हे औचित्यपूर्ण ठरेल. सोलापूरच्या विकासासाठी झटणाऱ्या नेत्याला ही जनतेकडून दिलेली खरी आदरांजली असेल, विडी घरकुलच्या मुख्य रस्त्यावर एक भव्य आणि कलात्मक 'स्व. महेश अण्णा कोठे स्मृती प्रवेशद्वार' उभारण्यात यावे. परिसरातील मोक्याच्या ठिकाणी त्यांचा 'पूर्णकृती पुतळा' बसवून त्याभोवती सुशोभीकरण करण्यात यावे. याबाबत व येणाऱ्या खर्चास **मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.**

**४१) मा.ज्ञानेश्वरी देवकर , मा अर्चना वडनाल, मा.गणेश वानकर यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक २३ मधील संबंधित परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वस्ती असून सदर भागात पिण्याच्या पाण्याचा नियमित व पुरेसा पुरवठा उपलब्ध होत नाही. त्यामुळे येथील नागरिकांना दररोज पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सदर परिसरातील वाढती लोकसंख्या व नागरिकांची गरज लक्षात घेता प्रभाग क्रमांक २३ मधील संबंधित परिसरात स्वतंत्र उंच पाणी साठवण टाकी (ओव्हरहेड वॉटर टँक) उभारणे अत्यंत आवश्यक आहे. ही सुविधा उपलब्ध झाल्यास परिसरातील नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल व नागरिकांची पाणी समस्या मोठ्या प्रमाणात दूर होईल.

तसेच या ठिकाणी उंच पाणी साठवण टाकी उभारल्यामुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येईल.

तरी सन्माननीय सभेस विनंती आहे की प्रभाग क्रमांक २३ मधील संबंधित परिसरात उंच पाणी साठवण टाकी उभारण्यास तत्त्वतः मान्यता देऊन सदर कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास तसेच संबंधित विभागास पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात यावेत व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करावी यास ही सभा धोरणात्मक मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.

**४२) मा.रुद्रमनी बोरामणी व श्रीनिवास दायमा यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- १) श्री. शिवयोगी सिद्धेश्वर हे सोलापूरचे ग्रामदैवत आहे. सोलापूर हे त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले शहर आहे. तसेच सोलापून पासून तुळजापूर पंढरपूर अक्कलकोट व गाणगांपूर हे जवळच आहे. यात्रेकरुना सोलापूर हे मध्यवर्ती ठिकाणे असल्याने ते सोलापूरात मुक्काम करुन वरील सर्व ठिकाणची यात्रा पूर्ण करत असतात म्हणून श्री. शिवयोगी सिद्धेश्वर मंदिराकडे जाण्यासाठी विविध ठिकाणी दिशादर्शक फलके उभी करावी. २) सिद्धेश्वर तलावाच्या भोवताली सो.म.पाने वॉकींग ट्रॅक व सुशोभिकरण केले आहे. तरी तिथे वॉकिंग करणाऱ्या महिलांसाठी पिंक टॉलयेटची व्यवस्था करावी. सायंकाळी ५ ते ८ दरम्यान किमान दोन राऊंड दामिनी पथकाचे संचलन व्हावे. मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.

तरी उपरोक्त नमुद विषयांकीत कामी मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस धोरणात्मक मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.

**४३) मा.कविता गज्जम व मा. कलावती गदगे यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :-सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्र.१९ निलम नगर भाग १ सर्व्हे नं. २७/२/२ अ येथील शिवगणेश पटांगण भागात अंबिका नगर, मार्कडे चौक, इंदिरा गांधी चौक, नटराज चौक, थोबडे चौक, बसवेश्वर गनर, कुमार स्वामी नगर, रामगड चौक, श्री. गंगा चौक, शरण मठ चौक, भारत चौक, महात्मा गांधी चौक, कन्नड प्रशाला चौक, जमादार चौक या भागात जवळपास दाट लोकवस्ती असल्याने तेथील लहान मुलांना खेळण्यासाठी बगीचे नसून तेथील लहान मुलांना खेळण्यासाठी कुठेही साधन उपलब्ध नाही.

तरी वरील नमुद ठिकाणी इस्टिमेट तयार करून नविन चिल्ड्रन पार्क विकसित करण्याच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करणेस मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करावी यांस ही सभा **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**४४) मा.मनिष केत व मा. सारिका खजुरगी यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सोलापूर शहर हे एक ऐतिहासिक शहर असून त्याला एक चांगल्या प्रकारची धार्मिक जोड आहे. या शहरामध्ये विविध अशी धार्मिक स्थळे मोठ्या प्रमाणावर असून यामध्ये मुख्यतः सोलापूरचे ग्रामदैवत श्री. सिध्दरामेश्वर मंदिर, श्री. रूपाभवानी मंदिर असून सोलापूर शहराचे वैशिष्ट्य म्हणजे या शहरातूनच तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर अशा धार्मिक क्षेत्रांनाही जाण्याचा मुख्य मार्ग असून यामुळेच सोलापूर शहराच्या धार्मिकतेमध्ये अधिकच भर पडलेली आहे. राज्यातून आणि परराज्यातून धार्मिक क्षेत्रांसाठी येणारे भक्तगन सोलापूरातच मुक्काम करतात वरील धार्मिक क्षेत्रा बरोबरच सोलापूर शहरातही एक दिवस (कबंर तलाव बोटींग, श्री. सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेले अष्टविनायक मंदिर व ६८ लिंग, मार्कंडेय मंदिर, भुईकोट किल्ला, साईबाबा मंदिर, प्राणीसंग्रहालय, कुडल संगम, शाहजहूर अली दर्गा,) या ठिकाणी दर्शन व पर्यटनासाठी शहरातील पर्यटनक्षेत्र व अन्य महत्वाची ठिकाणे याची परिपूर्ण माहिती संदर्भात महापालिकेने एक वेबसाईट काढावी, शहरामध्ये ठिकठिकाणी माहिती फलक तयार करावेत व सोलापूर विमानतळ, एस.टी.स्टँड, रेल्वे स्टेशन अशा महत्वाच्या ठिकाणी लावण्यात यावे. तसेच वरील ठिकाणांचे अंतर आणि डिजिटल माहितीसाठी QR कोडसह डिजिटल बोर्ड लावणेस तसेच सोलापूर शहरामध्ये असलेले धार्मिक स्थळे व अन्य महत्वाची ठिकाणे दाखविण्यासाठी एक सोलापूर महानगरपालिका परिवहन विभागाच्या वतीने उपयुक्त अशी वातानुकुलित व अनवातानुकुलित फक्त सोलापूर शहर धार्मिक स्थळे अशी सोलापूर दर्शन बससेवा उपलब्ध होणे कामी **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**४५) मा.मनिष केत व मा. विनोद भोसले यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सोलापूर शहरामध्ये अनेक ठिकाणी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने व स्मार्ट योजनेअंतर्गत विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय केलेल्या आहेत परंतु काही बंद अवस्थेत तर काही चालू अवस्थेत आहेत. महिलांसाठी मुख्य बाजारपेठा, विविध चौकामध्ये (नवी पेठ, मंगळवार बाजार, बेगमपेठ, विजापूर वेस, रेल्वे स्टेशन, एसटी स्टँड, अशा विविध ठिकाणी पे अँड युजचे नुतन सार्वजनिक शौचालयासाठी जागा निश्चित करण्यासाठी मा.महापौर, मा. आयुक्त, मा. पदाधिकारी यांनी एक भेट द्यावी. ज्या ठिकाणी शौचालय सुरू आहे त्या ठिकाणी पुरुष सेवक असल्याने महिला शौचालयाचा वापर करीत नाहीत. त्यामुळे त्याठिकाणी शौचालय चालविणा-या संस्थानी महिलाच सेवक उपलब्ध करुन द्यावेत.

तसेच शौचालयाची स्वच्छता राखावी. महिलांसाठी शौचालय नसल्याने फक्त महिलांसाठी मोफत शौचालयाची योजना राबविणेबाबत व येणा-या खर्चास ही सभा होणे कामी **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**४६) मा.सारिका खजुरगी व मा. सिध्देश्वर कमटम यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- कसबे सोलापूर सर्वे नं. १८१ पैकी सोलापूर अक्कलकोट रोड, एम.आय.डी.सी. मधील सोलापूर महानगरपालिकेकडे वर्ग झालेल्या खुल्या जागेत विनायक नगर, सिध्दरामेश्वर नगर, सुनिल नगर भाग १, २, आराफत नगर, माळी नगर, कलावती नगर, कामगार वसाहत नगर भाग १,२, आशा नगर, निलम नगर, पडगाजी नगर, संगमेश्वर नगर, आकाशवाणी केंद्र परिसर, बोळकोटे नगर या नगरातील राहणाऱ्या होतकरू, कष्टाळू तसेच हातमाग कामगार, विडी कामगार या सारख्या गरीब नागरिकांसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सर्वरोग प्रथमोचार केंद्र व अत्याधुनिक प्रसुतीगृह तसेच लगत असलेल्या जागेत वयोवृध्द व ज्येष्ठ नागरीकांसाठी वॉकिंग ट्रॅक, चिल्ड्रन पार्क लहान मुलांसाठी खेळणी असे विविध ॲडव्हेंचर पार्क प्रमाणे नवीन उद्यान करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण, गत अनेक वर्षापासून या भागामध्ये नागरी उपयोगी अशा सोयी-सुविधा मिळालेल्या नसून या भागातील नागरिकांसाठी अशी सुविधा दिल्यास नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील गोर-गरीब महिला व लहान मुलांना याचा चांगला उपयोग होणार आहे.

तरी, वरील ठिकाणी नागरिकांसाठी प्रथमोपचार केंद्र, प्रसुतीगृह, चिल्ड्रन पार्क व उद्यान उभारणे कामी येणाऱ्या खर्चास सदर कामाचे प्लॅन व एस्टिमेट करणे व येणाऱ्या खर्चास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**४७) मा.सतिश सिरसिल्ला व मा. सत्यनारायण गुर्रम यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :सविनय निवेदन असे की, प्रभाग क्रमांक 10 अंतर्गत सागर चौक, MSEB कंपाउंड समोरील सार्वजनिक मैदान हे परिसरातील नागरिक, युवक तसेच विविध सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांसाठी नियमितपणे वापरले जात आहे. सदर मैदान हे स्थानिक नागरिकांसाठी एक महत्त्वाचे सार्वजनिक केंद्र बनले असून, येथे विविध राष्ट्रीय, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात येतात.

सदर मैदानाचा उपयोग युवकांच्या क्रीडा उपक्रमांसाठी, नागरिकांच्या सभा-मेळाव्यांसाठी तसेच विविध सामाजिक व राष्ट्रप्रेरित कार्यक्रमांसाठी होत असल्यामुळे या ठिकाणाला एक प्रेरणादायी व ऐतिहासिक नाव देण्याची आवश्यकता नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक माधव सदाशिव गोलवलकर (पूजनीय गुरुजी) यांनी राष्ट्रनिष्ठा, चारित्र्यनिर्मिती, सामाजिक एकात्मता व संघटनशक्ती यांचे विचार देशभर पोहोचवले. त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो स्वयंसेवक घडले आणि समाजजीवनात सेवा, संस्कार व राष्ट्रभक्तीची भावना दृढ झाली. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजातील विविध क्षेत्रांत प्रेरणादायी स्वरूपात दिसून येतो. सध्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ चे शताब्दी वर्ष देशभर मोठ्या उत्साहात साजरे होत आहे. या ऐतिहासिक पर्वाच्या निमित्ताने राष्ट्रकार्याला संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या पूजनीय गुरुजींच्या स्मृती जपणे व त्यांचे कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे समाजाचे कर्तव्य आहे.

त्यामुळे सागर चौक, MSEB कंपाउंड समोरील सार्वजनिक मैदानास "मा. माधव सदाशिव गोलवलकर पटांगण (पूजनीय गुरुजी)" असे नामकरण करण्यात आल्यास त्यांच्या कार्याला कृतज्ञ अभिवादन होईल तसेच परिसरातील युवक व नागरिकांना राष्ट्रसेवा, शिस्त, संघटन व सामाजिक बांधिलकीची प्रेरणा मिळेल.

सदरच्या नामकरण प्रस्तावास परिसरातील नागरिक, युवक तसेच विविध सामाजिक संस्थांचा सकारात्मक व उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून, या निर्णयामुळे समाजामध्ये अभिमान व प्रेरणेची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास आहे.

तरी उपरोक्त नमुद विषयान्वये प्रभाग क्रमांक 10 मधील सागर चौक, MSEB कंपाउंड समोरील सार्वजनिक मैदानास "मा. माधव सदाशिव गोलवलकर पटांगण (पूजनीय गुरुजी)" असे नामकरण करण्याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**४८) मा.सतीश सिरसिल्ला व मा.सत्यनारायण गुर्रम यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विडी घरकुल परिसराच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणारे तसेच सग्गम नगर वसाहतीचे विकास पुरुष व आधुनिक शिल्पकार म्हणून महाराष्ट्रभर परिचित असलेले स्वर्गीय महेश अण्णा विष्णुपंत कोठे यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. प्रभाग क्र. 10 मधील सग्गम नगर तसेच विडी घरकुल परिसरातील नागरिकांच्या वतीने अशी मागणी करण्यात येत आहे की, मुळेगाव रोडवरून सग्गम नगरकडे जाताना यल्लमा गॅस पंपाच्या बाजूला विकास पुरुष स्वर्गीय महेश अण्णा विष्णुपंत कोठे यांच्या नावाने भव्य व आकर्षक असे प्रवेशद्वार उभारण्यात यावे.

त्यानुसार प्रवेशद्वारामुळे त्या महान व्यक्तिमत्त्वाच्या कार्याला योग्य तो सन्मान मिळेल तसेच परिसराची ओळख व सौंदर्यही वाढेल. त्यामुळे भव्य प्रवेशद्वार उभारण्याबाबत तातडीने आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

तरी उपरोक्त नमुद विषयांकीत कामी मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**४९) मा . सारिका खजुरगी व सिध्देश्वर कमटम यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव :-** सोलापूर शहर मधील आशा नगर व समरा नगर भागात लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात आहे जगतगुरू महात्मा बसवेश्वर महाराज हे महान समाज सुधारक तत्वज्ञ व मानवतेचा संदेश देणारे संत होते. त्यांनी समाजात समता, बंधुता आणि कष्टाला मान देणार विचार दिला. त्यांच्या या कार्यामुळे समाजात मोठे परिवर्तन घडून आले. त्यांना मानणारा वर्ग या परिसरात मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्या या महान कार्याचा सन्मान म्हणून आशा नगर व समरा नगर भागातील चौकास श्री.महात्मा बसवेश्वर महाराज चौक असे नामकरण करून सदर चौकामध्ये नामफलक लावणेस या कामी येणाऱ्या खर्चास **मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.**

**५०) मा.सारिका खजुरगी व मा.सिध्देश्वर कमटम यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :-सोलापूर शहर माळी नगर, बोळकोटे नगर, न्यु विडी घरकूल रोड, सोलापूर येथील रहिवाशांची अशी मागणी आहे की, सदर माळी नगर, बोळकोटे नगर व न्यु विडी घरकूल, कुंभारी रोड, ओमशांती बियर शॉपी चौक असे संभोधले जात असल्याने तेथील रहिवासी व शाळा कॉलेजातील मुलींना पत्ता सांगणे अवघड जात आहे.

छत्रपती संभाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. ते लहानपणापासून अत्यंत बुध्दिमान, धाडसी व पराक्रमी होते. छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान हे स्वराज्य आणि धर्मासाठी दिलेले एक महान बलिदान समजले जाते त्यांचे हे बलिदान पुढील पिढीस स्मरणी रहावे म्हणून माळी नगर व बोळकोटे नगर येथील चौकास **धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक** असे नामकरण करून सदर चौकामध्ये नामफलक लावून सुशोभीकरण करणेकामी येणाऱ्या खर्चास **मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.**

**५१) मा.यलंदडी दिपिका वासुदेव व मा.शारदा विजयकुमार रामपूरे यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सोलापूर शहरातील विडी घरकूल, सरवदे नगर येथील रहिवाशांनी प्रभाग क्र. १० व ११ च्या सामाईक मुख्य रस्त्याच्या होणाऱ्या चौकास (मुळेगांव क्रॉस रोड, यल्लम्मा गॅस पंप) माजी महापौर स्व. महेश आण्णा विष्णूपंत कोठे यांचे नाव देणे कामी मागणी केली असून त्यांचे मागणी नुसार वरील सामाईक रस्त्यावर मुख्य प्रवेशद्वार उभारून त्यावर माजी महापोर स्व. महेश आण्णा विष्णूपंत कोठे असे नाव नमूद करण्यास व याकामी येणारे खर्चास **मान्यतेस्तव आलेला प्रस्ताव.**

**५२)मा.ज्ञानेश्वरी देवकर , मा.राजशेखर पाटील व सत्यजित वाघमोडे यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- छत्रपती संभाजी तलाव परिसरात शासन अनुदानातून करण्यात आलेल्या अंदाजे रुपये १८ कोटी खर्चाच्या विकासकामांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याबाबत.

सोलापूर शहरातील महत्त्वपूर्ण ठिकाण असलेल्या छत्रपती संभाजी तलाव परिसराच्या विकासासाठी शासनाकडून अंदाजे रुपये १८ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्या अनुषंगाने विविध विकासकामे करण्यात आली आहे. तथापि, सदर कामांचा सविस्तर तपशील, प्रत्यक्ष करण्यात आलेली कामे, त्यावर झालेला खर्च, तसेच संबंधित कंत्राटदार / मक्तेदार यांची माहिती सभागृहास अद्याप स्पष्टपणे उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.
तसेच तलाव परिसरात करण्यात आलेल्या काही कामांबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असून, काही कामे मंजूर आराखड्यानुसार पूर्ण झाली आहेत की नाहीत, तसेच कामांच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. सार्वजनिक निधीतून मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला असल्यामुळे या कामांचा संपूर्ण व पारदर्शक आढावा घेणे अत्यावश्यक आहे.

त्याअनुषंगाने छत्रपती संभाजी तलाव परिसरात शासन अनुदानातून करण्यात आलेल्या विकासकामांसंदर्भात खालील बाबींची सविस्तर माहिती सभागृहासमोर सादर करण्यात यावी :

शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीची एकूण रक्कम व त्याचा उपयोग.
मंजूर आराखड्यानुसार प्रस्तावित कामे व प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामांचा तपशील.
प्रत्येक कामावर झालेल्या खर्चाचा सविस्तर हिशोब.
सदर कामांसाठी नियुक्त करण्यात आलेले कंत्राटदार / मक्तेदार यांची नावे.
निविदा प्रक्रिया, काम आदेश दिनांक व पूर्णत्वाचा कालावधी.
कामांची तांत्रिक तपासणी व गुणवत्ता नियंत्रण अहवाल.

तसेच सदर कामांमध्ये अनियमितता, निकृष्ट दर्जा किंवा गंजूर आराखड्याप्रमाणे कामे न झाल्याचे आढळल्यास त्याबाबत स्वतंत्र चौकशी करण्यात यावी व त्यासाठी संबंधित अधिकारी तसेच कंत्राटदार / मक्तेदार यांची जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

तरी सन्माननीय सभेस विनंती आहे की छत्रपती संभाजी तलाव परिसरातील शासन अनुदानातून करण्यात आलेल्या अंदाजे रुपये 18 कोटी खर्चाच्या विकासकामांचा सविस्तर अहवाल सभागृहासमोर सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागास देण्यात यावेत, तसेच आवश्यक असल्यास सदर कामांची स्वतंत्र चौकशी करण्यात यावेत व याबाबत मा. आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करावी यास ही सभा **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**५३) मा.मिनाक्षी कडंगची व मा. भारतसिंग बडूरवाले यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सोलापूर शहरातील मिळकतदारांना प्रशासनाने यापूर्वी मिळकत करामध्ये दंड व वॉरंट फी नोटीस फी लावण्यात आलेली होती ती शंभर टक्के सुट देण्यात आलेली होती. सद्या प्रशासनाने शास्तीवर ५०% सुट देण्याचे घोषीत केलेले आहे.

सद्या महापालिकेत नव्याने नगरसेवक निवडून आलेले असून नगरसेवकांच्याकडे नागरिकांनी शास्तीमध्ये शंभर टक्के सुट मिळणेसाठी विनंती करत आहेत. मनपाची मिळकतकराची थकबाकीची रक्कम पाहता वसूल करण्याच्या दृष्ट्रीने ३१ मार्च अखरे पर्यंत मुदत देऊन शास्तीमध्ये शंभर टक्के सुट देण्यास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**५४) मा.भारतसिंग बडूरवाले व मा.मिनाक्षी कडंगची यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- सोलापूर शहरातील शासन मान्य शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची फी आकारणी न करता ज्ञानदानाचे काम करणाऱ्या शाळेच्या मिळकतदारांना सद्या कमर्शिअल दराने कर आकारणी केली जात आहे. सदरच्या इमारतीमध्ये कोणत्याही प्रकारचे व्यवसायीक उद्योक नसल्याने त्या ठिकाणी लावण्यात आलेले कमर्शिअलचे दर हे अन्यायकारक असून ते रद्द करुन घरगुतीदाराने कर आकारणी करण्यास **मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

**५५) मा.मिनाक्षी कडंगची व मा. भारतसिंग बडूरवाले यांचा दि.१६/०३/२०२६ रोजीचा सभासद प्रस्ताव** :- प्रभाग क्र. ११ येथील समाधान नगर ते संगमेश्वर नगर रस्ता ओलांडण्यासाठी लोखंडी ब्रिज तयार करणे अत्यंत गरजेचे असून मल्लिकार्जुन नगर, राजू किसान नगर, समाधान नगर, शिवानंद नगर या भागातील नागरिकांना रस्त्याच्या पलिकडे MIDC मध्ये कामास जाण्यासाठी हायवेचा रस्ता क्रॉस करताना महिन्यातून बरेच अपघात घडत असतात व प्रत्येक महिन्यास एकतरी बडी जात असतो. त्यामुळे सदर हायवेचा रस्ता क्रॉस करण्यासाठी लोखंडी ब्रिज करणे अत्यंत गरजेचे असून सदरकामी तात्काळ कार्यवाही करणेस **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेला प्रस्ताव.

---

नगरसचिव कार्यालय, सो.म.पा.
जाहिरात क्र.०५ दि.१७/०३/२०२६

प्रविण प्रभावती प्रेमसागर दंतकाळे
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

---

टिप - १) प्रस्तुत विषयांची कागदपत्रे नगरसचिव कार्यालयात पाहणेस्तव ठेवणेत आलेली आहेत.
२) कार्यालयीन दुरुस्ती :- दैनिक तरुण भारत दि.१२/०३/२०२६ मध्ये कार्यपत्रिका क्र.३ प्रसिध्द झालेले आहे. यात प्रश्नोत्तरेच्या खाली (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४४ अन्वये) तद्नंतर (टिप :- प्रस्तावाचा सारांश देण्यात आलेला असून मुळ प्रस्ताव सर्वसाधारण सभेत वाचून दाखवण्यात येईल) हे वाचावे.

## महत्वाचे...



### रेशन धान्यावरील जाचक अटींविरोधात तीव्र निदर्शने

**सोलापूर, दि. १७ मार्च-**

शासनाने १ एप्रिल २०२६ पासून रेशन धान्याबाबत लागू केलेल्या जाचक अटींच्या निषेधार्थ 'सोलापूर शहर व जिल्हा रेशनिंग कार्ड धारक संघटना' आक्रमक झाली आहे. संघटनेचे अध्यक्ष निरंजन बोध्दूल यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने आंदोलन करण्यात आले आणि मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी बोलताना निरंजन बोध्दूल म्हणाले की, १०० चौ. मी. पेक्षा जास्त घर किंवा कुटुंबात ट्रॅक्टर/चारचाकी वाहन असणाऱ्यांना व इन्कमटॅक्स भरणाऱ्यांना रेशनसाठी अपात्र ठरवणे हा कष्टकरी आणि शेतकऱ्यांवर मोठा अन्याय आहे. शेतकरी शेतीसाठी कर्ज काढून ट्रॅक्टर घेतो, तो श्रीमंतीचा पुरावा नाही. या अटींमुळे सोलापूर जिल्ह्यातील लाखो व महाराष्ट्रातील करोडो नागरिकांचे रेशन बंद होईल. त्यांनी दिलेल्या निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये रेशन धान्यावरील १ एप्रिलपासून लागू होणाऱ्या जाचक अटी तातडीने रद्द कराव्यात, शेतकऱ्यांच्या मालाची हमीभावाने होणारी खरेदी बाधित होऊ नये, जर या अटी त्वरित मागे घेतल्या नाहीत, तर संपूर्ण जिल्ह्यात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल असा इशाराही दिला आहे. या आंदोलनात संघटनेचे पदाधिकारी आणि अनेक रेशन कार्ड धारक उपस्थित होते. याप्रसंगी निरंजन बोध्दूल, प्रभाकर भोंगे, गौतम चौधरी, महेश गायकवाड, महेश डोलारे,मल्लीनाथ स्वामी, यशवंत आडम, नागनाथ गणपा, देविदास चन्ना, प्रियंका खद्दे, ललिता खद्दे, सिद्राम म्हैत्रे, भिमराव आसादे, गौबीपाशा नदाफ, इलियास शेख, इम्तीहाज अक्कलकोटे, नागेश काकी आदी रेशनिंग कार्ड धारक उपस्थित होते.



### सुजितकुमार सर्वगोड यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पंढरपूर, दि.१७ मार्च-**

पंढरपूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, भाजपा गटनेते भागवत बडवे आणि शहर विकास आघाडीचे गटनेते सुजितकुमार सर्वगोड यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले की. उपनगराध्यक्ष व गटनेते यांना नागरिकांचे प्रश्न सोडवावे म्हणून स्वतंत्र दालन उपलब्ध करून द्यावे म्हणून मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत नगरपालिका प्रशासनाने दालन उपलब्ध करून दिल्या बद्दल मुख्याधिकारी महेश रोकडे यांचे सर्व नगरसेवकांच्या वतीने आभार व्यक्त केले. यावेळी गटनेते भागवत बडवे, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, नगरसेवक ॲड सुनिल वाळूजकर यांनी विचार व्यक्त केले. या उद्धाटन समारंभस मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच माजी नगराध्यक्ष व नगरसेवक लक्ष्मणराव शिरसट, गट नेते सुजितकुमार सर्वगोड, पाणीपुरवठा सभापती अमोल डोके, धर्मराज घोडके,कुसुम परचंडे, विनायक संगीतराव, लखन चौगुले, संध्या शेंबडे, अर्चना शिंदे, उज्वला भालेराव, तेजश्री पानकर, शीला माने, सौरभ थिटे, विशाल मलपे, बालाजी मलपे, माजी नगरसेवक गुरुदास अभ्यंकर, इब्राहिम बोहरी, राहुल परचडे, शरद माने विक्रम शिरसट, सिकंदर ढवळे, मालोजी शेंबडे,अशोक शिंदे, कृष्णा कवडे, वैभव भोसले, निखिल परचंडे, रोहित पानकर, गुरु दोडिया, उमेश सर्वगोड, यल्लाप्पा कबाडे, विकी अभंगराव उपस्थित होते.

### इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाडमध्ये गोपाळराव देव प्रशालेचे यश

**माळशिरस, दि. १७ मार्च-**

३ फेब्रुवारी २०२० रोजी गोपाळराव देव प्रशाला मध्ये इंडियन टॅलेंट ओलंपियाड मार्फत घेण्यात आलेल्या गणित, इंग्रजी व विज्ञान या विषयांमध्ये फर्स्ट राऊंड मध्ये शाळेत टॉपर असलेले विद्यार्थी ४७ सेकंड राउंड साठी पात्र झालेली होते. त्यापैकी सहा विद्यार्थी यांनी यश संपादन केले. गणित विषयामध्ये सिद्धी सचिन पवार(५वी), सुधांशू सुयश कुलकर्णी (६ वी),कृष्णराज अभिजीत धुमाळ (८वी) (राज्यात १८ वा) इंग्लिश विषयामध्ये अलिफा मुलानी (८ वी) (राज्यात ६ वि आणि ७०० रु. स्कॉलरशिप) विनायक जयसिंग पाचपुंड (९वी)(राज्यात तृतीय व १२०० रुपये स्कॉलरशिप), श्रेयश संदीप जगताप(१० वी) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले या विद्यार्थ्यांना वरील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलेल्या लोणकर जोशी, धुमाळ (ज्युनियर विभाग), पवार या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष माधव मिरासदार, कार्याध्यक्ष ॲड मिलिंद कुलकर्णी, सचिव राम दोशी, मुख्याध्यापक धनंजय केसकर यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### प्रमिला कोल्हे



**बार्शी, दि. १७ मार्च**

बार्शीतील भाजीपाला अडत व्यापारी उत्तरेश्वर कोल्हे यांच्या पत्नी व प्राईम कॉम्प्युटरचे संचालक संतोष कोल्हे यांच्या मातोश्री प्रमिला उत्तरेश्वर कोल्हे यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# आज ठरणार २१ वा जि.प.अध्यक्ष



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या इतिहासात एकमेव अशी नोंद आहे की, नामदेव महादेवराव जगताप यांनी अध्यक्षपद दोन वेळा भूषवले आहे. जिल्हा परिषदेच्या पहिल्या कार्यकाळात १२ ऑगस्ट १९६२ ते ११ ऑगस्ट १९६७ या कालावधीत त्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले. त्यानंतर पुन्हा एकदा त्यांची अध्यक्षपदी निवड झाली आणि १२ ऑगस्ट १९६७ ते १५ सप्टेंबर १९६९ या कालावधीत त्यांनी दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची धुरा सांभाळली.

विशेष म्हणजे, जगताप यांच्यानंतर आजपर्यंत कोणत्याही अध्यक्षाला दुसऱ्यांदा ही संधी मिळालेली नाही, ही बाब सोलापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण ठरते. जगताप यांच्या पश्चात शहाजी पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, यशवंतराव पाटील, काकासाहेब निंबाळकर, रामचंद्र माने, प्रतापसिंह मोहिते पाटील, बाबुराव जाधव, फत्तेसिंह माने पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, नारायण खंडागळे, वैशाली सातपुते, सुमन नेहतराव, बळीराम साठे, निशिगंधा माळी, जयमाला गायकवाड, संजय शिंदे, शिवानंद पाटील आणि अनिरुद्ध कांबळे यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली.यानंतर जिल्हा परिषदेत प्रशासक काळ सुरू झाला. या काळात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी प्रशासक म्हणून जिल्हा परिषदेचा कार्यभार सांभाळला. अध्यक्ष पदाच्या निवडीसाठी सभागृह तसेच दालने स्वच्छ करण्यात येत होती. त्यावेळी अध्यक्षपदाच्या नावाचे फलक देखील यावेळी स्वच्छ करण्यात आल्याचे दिसून आले.

### सभेच्या तयारीची सीईओ जंगम यांनी केली पाहणी

नव्या जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीसाठी जिल्हा परिषद प्रशासनाने जोरदार तयारी सुरू केली असून संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे. आजच्या सभेसाठी यशवंतराव सभागृहात आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण करण्यात आली. याचबरोबर अध्यक्ष व उपाध्यक्ष दालनांची स्वच्छता, डागडूजी आणि सजावट करून तीही पूर्णपणे तयार करण्यात आल्याचे चित्र दिसून आले. अध्यक्षपदाची निवड प्रक्रियेसाठी सर्व व्यवस्था चोख ठेवण्यावर प्रशासनाचा भर दिसून आला. या सर्व तयारीची पाहणी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी प्रत्यक्ष भेट देऊन केली. पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत कामकाज अधिक सुरळीत आणि नियोजनबद्ध करण्याचे निर्देश दिले.

## जिल्हा परिषद अध्यक्षपद दोनदा भूषवणारे एकमेव नेते कै.नामदेवराव जगताप



### जिल्हा परिषद, सोलापूर अध्यक्ष यांचा कार्यकाल

**नामदेवराव महादेवराव जगताप** - १२.०८.१९६२ ते ११.०८.१९६७

**नामदेवराव महादेवराव जगताप**- १२.०८.१९६७ ते १५.०९.१९६९

**शहाजीराव शंकरराव पाटील**- २०.०२.१९६९ ते १९.०८.१९७२

**विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील**- १२.०८.१९७२ ते १९.०६.१९७९

**यशवंतराव गोपाळराव पाटील**- २०.०६.१९७९ ते १८.०३.१९८५

**काकासाहेब रामचंद्र निंबाळकर**- १०.०५.१९८५ ते २८.०२.१९८९

**रामचंद्र श्रीपती माने**-३०.०३.१९८९ ते ३०.०६.१९९०

**प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील**- १.०३.१९९२ ते २०.०३.१९९७

**बाबुराव मारूती जाधव**- १.०३.१९९७ ते २०.०३.१९९८

**फत्तेसिंह व्यंकटराव माने-पाटील**- २१.०३.१९९८ ते २०.०३.१९९९

**मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील**- २१.०३.१९९९ ते २०.०३.२००२

**नारायण शिवराम खंडागळे**- २१.०३.२००२ ते १७.०२.२००५

**वैशाली लक्ष्मण सातपुते**-१८.०२.२००५ ते २०.०३.२००७

**सुमन वसंतराव नेहतराव**- २१.०३.२००७ ते ०१.१२.२००९

**बळीराम (काका) भाऊराव साठे**- ०२.१२.२००९ ते २०.०३.२०१२

**डॉ. सौ. निशिगंधा प्रशांत माळी (कोल्हे)**- १.०३.२०१२ ते २०.०९.२०१४

**जयमाला महादेव गायकवाड**- २१.०९.२०१४ ते २०-०३-२०१७

**संजय विठ्ठलराव शिंदे**- २१-०३-२०१७ ते २५.१०.२०१९

**शिवानंद सिद्रामप्पा पाटील** - २६.१०.२०१९ ते ३०.१२.२०१९

**अनिरुध्द विठ्ठल कांबळे**- १.१२.२०१९ ते प्रशासक कार्यकाळ





### बीबी दारफळ शाळेतील स्वच्छतागृहाच्या बांधकामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

बीबीदारफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वच्छतागृहाच्या बांधकामाचे भूमिपूजन बालाजी अमाईन्स कंपनीचे जनरल मॅनेजर गोविंद मेंचेकरे यांच्या हस्ते झाले.

बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी व सर्व संचालक मंडळानी शाळेत एक स्वच्छतागृहाचे युनिट बांधकामास मंजुरी दिली. यावेळी कंपनीचे डी. जी. एम. विनय दुर्गम व सीएसआर प्रमुख अनिल विपत, लक्ष्मण अडसूळ यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापिका श्रीधर साखरे यांच्याहस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शाळा क्र. २ च्या मुख्याध्यापिका वनिता गवळी, शालेय समिती अध्यक्ष सोमनाथ घोंगडे, युवा प्रतिष्ठानचे शैलेश साठे, बालाजी अमाईन्सचे सचिन मोरे, प्रसाद सांजेकर, अमोल गुंड, बसवराज आंटद, वसंत साठे महाराज उपस्थित होते.

## युगंधर नवरत्न पुरस्कार जाहीर

**शनिवारी वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

युगंधर फाउंडेशन, सोलापूर यांच्या वतीने प्रतिवर्षी देण्यात येणारे प्रतिष्ठित युगंधर नवरत्न पुरस्कार यावर्षी जाहीर करण्यात आले असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांनी दिली. तसेच युगंधर फाउंडेशनच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त पर्यावरण व संशोधन क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल युवा प्रेरणा पुरस्कार यावर्षी माननीय पंकज सुतकर (प्लास्टिक विघटन संशोधन पेटंट) यांना प्रदान करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा दि. २१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता लोकमान्य टिळक सभागृह, ॲम्फी थिएटर (किल्ला बागेसमोर), येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी (उप महासंचालक, यशदा - निवृत्त आयएएस) उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक वनीकरण विभाग सोलापूरचे विभागीय वनाधिकारी लक्ष्मण आवारे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे उपस्थित राहणार आहेत. तसेच सोनी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक रोकडे, केअर फाउंडेशन, पुणेचे संचालक अवधूत कदम, सामाजिक वनीकरण अधिकारी शुभांगी जावळे तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. विलास बेत यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

मागील दहा वर्षांत विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या तसेच पर्यावरण आणि आरोग्य क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या दोन संस्थांना युगंधर सामाजिक बांधिलकी पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यामध्ये सोलापूर येथे व्यसनमुक्ती आणि युवकांसाठी कार्य करणारी सारथी युथ फाउंडेशन, सोलापूर तसेच बार्शी शहरात वृक्षारोपणाची व्यापक मोहीम राबवून शहर हरित करण्यासाठी कार्यरत असलेली वृक्ष संवर्धन समिती, बार्शी शाखा यांचा समावेश आहे.

२१ मार्च - जागतिक वन दिन आणि युगंधर फाउंडेशनच्या दशकपूर्ती निमित्ताने वनसेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या वन अधिकारी व वन कर्मचाऱ्यांचा सन्मान देखील या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

**युगंधर नवरत्न पुरस्कार विजेते याप्रमाणे**

पर्यावरण – संतोष धाकपाडे
कला – सचिन जगताप
आरोग्य – डॉ. व्यंकटेश मेतन
शिक्षण – प्रा. डॉ. युवराज सुरवसे
उद्योग – सविता जुजगार
महिला व बाल कल्याण– ॲड. सरिता मोकाशी
कृषी – डॉ. स्वाती थिटे
क्रीडा – श्रेया परदेशी
पत्रकारिता – विजय गायकवाड



## अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाचा अध्यादेश काढा

**सुरेश पाटोळे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

राज्यातील अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करून त्यानुसार त्यांना आरक्षण देण्यासंदर्भातील न्या. अनंत बदर समितीचा अहवाल लागू करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सकल मातंग समाज राज्य समन्वयक सुरेश पाटोळे यांनी केली आहे. सोमवारी सादर केलेल्या अहवालावर राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यांनी अनुसूचित जातींचे मागासलेपणाच्या आधारावर वर्गीकरण करून त्यानुसार आरक्षणाचा लाभ द्यावा असा निकाल दिलेला आहे. मात्र, त्याचे स्वरूप हे राज्याने निश्चित करावयाचे होते. त्यानुसार तत्कालीन महायुती सरकारने उच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली उपवर्गीकरणाबाबत शिफारशी करण्यासाठी ऑक्टोबर २०२४मध्ये समिती नेमली होती. या समितीला सप्टेंबर २०२५ मध्ये अहवाल देण्यास सांगितले होते, पण नंतर मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

न्या. अनंत बदर समितीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्य मंत्री माधुरी मिसाळ आणि आमदार अमित गोरखे यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अखेर आपला अहवाल सादर केला.

श्री. पाटोळे म्हणाले, अनुसूचित जातीच्या आरक्षण वर्गीकरणासाठी आम्ही मागील पंचवीस वर्षापासून न्यायिक आणि प्रशासकीय पातळीवर लढा देत आहोत. यासाठी वेळोवेळी आंदोलने, धरणे आणि मोर्चे काढण्यात आले. जूनच्या अगोदर उपवर्गीकरण लागू झाले तर वैद्यकीय आणि सर्व तांत्रिक शिक्षणात आरक्षणाचा मोठा लाभ मिळण्यास सुरुवात होणार आहे.

## लोकमंगल फाऊंडेशनच्यावतीने कवठे येथे १० कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कवठे येथे लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कर्तृत्ववान स्त्रीशक्तीचा या कार्यक्रमाअंतर्गत कवठे येथील १० महिलांचा सन्मान करण्यात आला.

लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष आ. सुभाष देशमुख व लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या अध्यक्षा अलका देवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता. लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संत गाडगेबाबा आश्रम शाळेच्या संचालिका लक्ष्मीबाई पाटील यांनी महिला दिनाचे महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे व्यवस्थापक संजय बागल, अमोल जोकारे, नितीन अलकुंटे यांनी काम पाहिले. आभार प्रदर्शन नागुबाई काळे यांनी केले.

**सत्कारमूर्ती महिला**

सीआरपी नागुबाई काळे, किराणा दुकानदार कुंदाराणी कुलकर्णी, स्टेशनरी दुकानदार तब्बसुम शेख, दुग्ध व्यावसायिक कविता नरोटे, लेडीज टेलर नुरजहाँ शेख, किराणा दुकानदार अमिना शेख, शेवया मेकींग भाग्यश्री इमडे, दुग्ध व्यवसाय अनिता पाटील, पशुखाद्य शिल्पा तोवर, शिवणकाम भाग्यश्री मदने

## आदर्श क्रीडा शिक्षक व क्रीडा प्रेमी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पुरस्कार वितरण

**दक्षिण सोलापूर क्रीडा शिक्षक असोसिएशनचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग १७ मार्च-**

दक्षिण सोलापूर क्रीडा शिक्षक असोसिएशनकडून दरवर्षी गणल्या जाणारे आदर्श कला, क्रीडा शिक्षक, उपक्रमशील सहकारी शिक्षक व क्रीडाप्रेमी शिक्षकेतर कर्मचारी यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

बोरामणी येथील एस.व्ही.सी.एस प्रशाला येथे संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली व दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार, संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे, द.सो क्रीडा शिक्षक



असोसिएशनचे अध्यक्ष वीरेश थळंगे, माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शशिकांत उपासे व एस.व्ही.सी.एस प्रशाला बोरामणीचे प्राचार्य महांतेश अतनुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी मल्लप्पा कोनापुरे प्रशाला आहेरवाडीचे माजी मुख्याध्यापक गुरुपादप्पा तूप्पद, गेनसिद्ध प्रशाला कुंभारीचे माजी मुख्याध्यापक हणमंत चौगुले, स्वामी विवेकानंद प्रशाला शिंगडगावचे माजी मुख्याध्यापक भारत साठे, एस.व्ही. सी.एस प्रशाला भवानी पेठचे माजी मुख्याध्यापक राजकुमार भोरे, बाळे येथील माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन चनबसप्पा बिराजदार, लोकसेवा विद्यामंदिर मंद्रूपचे क्रीडाशिक्षक श्रीधर टेळे, बोरामणीचे केंद्रप्रमुख गुरुलिंग व्हनमाने, पर्यवेक्षक शिवानंद बिराजदार आहेरवाडी प्रशालेचे मुख्याध्यापिका संध्या कुनाळे आदींनी म्हणून उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रवीण कुंभार यांनी केले. संतोष पाटील यांनी आभार मानले.

**सत्कारमूर्ती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी**

**क्रीडा शिक्षक :** विश्वनाथ गावडे (मल्लप्पा कोनापुरे प्रशाला), रवींद्र डोंबाळे (एस.व्हि सी.एस प्रशाला बोरामणी),

**उपक्रमशील सहकारी शिक्षक :** महासिद्ध वाले (इंडियन पब्लिक स्कूल), शावरसिद्ध म्हेत्रे (शावरसिद्ध प्रशाला आचेगाव).

**कर्मचारी :** सुरेश कोळी (गणेश रामचंद्र चितळे प्रशाला बरूर), शिवलिंग कोले (जीवन ज्योत प्रशाला कंदलगाव)

**आदर्श पुरस्कारप्राप्त :** माधुरी पाटू (बोरामणी, मुख्याध्यापिका), शिवप्पा बिराजदार (पर्यवेक्षक).

# महापालिकेच्या प्रशासकीय अंदाजपत्रकात स्थायी समितीने केली ५.६९ कोटींची वाढ

## ▶▶ १३८९ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास बहुमताने मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

सोलापूर महापालिकेच्या प्रशासकीय अंदाजपत्रकात स्थायी समितीने ५.६९ कोटींची वाढ सूचवत एकूण १३८९ कोटी ७ लाख १८ हजार ४०१ रुपयांच्या अंदाजपत्रकास बहुमताने मान्यता दिली. महापालिकेच्या इतिहासात यंदा प्रथमच लोकांच्या सूचना मागवून आवश्यक त्या तरतुदी करून लोकाभिमुख वास्तववादी असे अंदाजपत्रक तयार करण्यात आले, असे स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांनी सांगितले. दुसरीकडे विभागीय कार्यालयांसह समाजकल्याण विभागाच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात कपात करुन सोलापूरकरांची दिशाभूल करणारे बजेट सादर करण्यात आल्याचा आरोप शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी केला.

महापालिकेच्या कौन्सिल हॉल येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात अंदाजपत्रकीय सभा पार पडली. या सभेमध्ये १३८९ कोटी ७ लाख १८ हजार ४०१ रुपयाच्या अंदाजपत्रकास बहुमताने मान्यता देण्यात आली. काही दिवसांपूर्वी महापालिका आयुक्त यांनी १३८३ कोटी ३८ लाख १८ हजार ४०१रुपयांचे प्रशासकीय अंदाजपत्रक स्थायी समितीकडे सादर केले होते. त्यातील काही तरतुदींमध्ये मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली आहे. भांडवली कामासाठी आयुक्त यांनी महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग करण्याची रक्कम ३१ कोटी ७४ लाख रुपये सुचविली होती. त्यामध्ये ७० कोटीची वाढ करत १०१ कोटी ५१ लाख ६० हजार रुपये तरतूद स्थायी समितीने केली आहे.

मनपाचे एकूण खर्च यामध्ये विवरणाचा विचार करता स्थायी समितीने वेतन व भत्ते पाणीपुरवठा व्यतिरिक्त यामध्ये २४८ कोटी ६४ लाख रुपये तरतूद केली आहे. यामध्ये दोन कोटीची कपात सुचवली आहे. प्रशासकीय खर्चात दोन कोटीची कपात करत १८ कोटी ८९ लाख ४० हजार रुपये तरतूद केली आहे. देखभाल व दुरुस्ती अंतर्गत आयुक्तांनी १४७ कोटी ३७ लाख १९ हजार रुपये तरतूदीत ३७ कोटी रुपयांची कपात केली आहे. कार्यक्रमा योजनांवरील खर्चात स्थायी समितीने ६२ कोटी १३ लाख १७ हजार रुपयाची तरतूद सूचित करत सहा कोटीची कपात केली आहे.

करावरील सूट व परतावा यामध्ये स्थायी समितीने तब्बल १३ कोटीची कपात करत १६ कोटींची तरतूद सुचवली आहे. भांडवली खर्चामध्ये महापालिका आयुक्तांच्या प्रशासकीय बजेटमधील ६१ कोटी १५ लाख ७० हजारांची तरतूद होती. त्यामध्ये तब्बल ७० कोटीची वाढ करीत स्थायी समितीने १३० कोटी ९३ लाख २६ हजारांची तरतूद केली आहे.



**ही आहेत वैशिष्ट्यपूर्ण कामे :** विणकर बाग, मार्कंडेय बाग व जानकी नगर येथील बाग सुशोभिकरण. जोडभावी पेठ येथील ब्रिटिशकालिन महानगरपालिकेचा गोलचावडी दवाखान्याचे संपूर्णतः नुतनीकरणासाठी केंद्र व राज्य शासन आणि विविध फंडातून निधी मिळविण्याचा प्रयत्न. शहरात प्रमुख पाच ठिकाणी महिलांसाठी प्रसाधनगृह व शौचालये उभारणे. देगाव येथे स्मशानभुमीमध्ये सुधारणा. जुळे सोलापूर भागामध्ये नाट्यगृह विकसित करणे. जुळे सोलापूर भागामध्ये इनडोअर स्टेडियम बांधणे. प्रायोगिक तत्वावर पाच मनपा दवाखान्याचे नुतनीकरण करणे. शहराच्या प्रवेशद्वारास कमान उभारुन बोर्ड लावणे. छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते सात रस्ता ते विजापूर रोड या रस्त्यावर दुतर्फा तसेच डिव्हाडरमध्ये झाडे लावणे. शहरातील प्रमुख रस्त्यावर डिव्हायडरची सोय करुन त्यामध्ये झाडे लावणे.

### परिवहन समितीच्या ६४ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता

आयुक्तांनी सादर केलेल्या महापालिका परिवहन उपक्रमाच्या ६४ कोटी ५० लाख ६१ हजार ४२३ रुपयाच्या अंदाजपत्रकास महापालिका स्थायी समितीने बहुमताने मान्यता दिली. स्थायी नंतर आता महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये त्यास अंतिम मंजुरी देण्यात येणार आहे. महापालिका उपक्रमाकडे येत्या दोन महिन्यात म्हणजेच मे महिन्यामध्ये १०० पैकी नव्या ३० ई बसेस दाखल होणार आहेत. न्यू बुधवार पेठ येथील बस डेपो येथील जागेत या बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण करण्यात येत आहे. या नव्या बसेस साठी रूट ही ठरविण्यात येत आहे. या बसेस उपलब्ध झाल्यानंतर सोलापूरकरांना परिवहन सेवा अधिक सुलभ आणि वेळेत उपलब्ध होईल, असा विश्वास सभापती चाकोते यांनी व्यक्त केला.

### अंदाजपत्रकावर नागरिकांच्या ६३९ सूचना

महापालिकेने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत आपले सोलापूर आपला अर्थसंकल्प याअंतर्गत तीन दिवसात नागरिकांनी ६३९ सूचना पाठविल्या. बॉक्समध्ये सहा सूचना पत्र प्राप्त झाल्या. ऑनलाईन ६३३ सूचना आल्या आहेत. त्याचे वर्गीकरण करण्यात आले आहेत. प्रत्येक प्रभागनुसार हे वर्गीकरण केले आहे. महत्त्वाचे आणि सर्वसाधारण असं वर्गीकरण केले आहे. यापैकी ११ सूचनांचे स्वागत करण्यात आले. टप्प्याटप्प्याने या सूचनांचा विचार करण्यात येत आहे, असे स्थायी समितीचे सभापती रंजीता चाकोते यांनी सांगितले.

# सुयोग संस्थेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सुयोग फाऊंडेशन, या संस्थेचे २६ वे स्नेहसंमेलन व महिला दिन सोहळा नुकताच पार पडला.

या प्रसंगी संस्थेच्या सचिवा डॉ. राजलक्ष्मी गायकवाड यांनी दिप प्रज्वलन करून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.जयसुधा कोठा सौंदर्यतज्ञ, डॉ.श्रध्दा पवार आहार तज्ञ या उपस्थित होत्या.

या वेळी डॉ. राजलक्ष्मी गायकवाड म्हणाल्या की, जरी मी मागील पाच सहा वर्षे साखर कारखानदारीमध्ये आली असले, तरी पंचवीस वर्षे तामलवाडीशी असलेली ओढ तशीच कायम आहे. डॉ.रविराज गायकवाड यांना साथ द्या. ते हे, सर्व कार्य तुमच्या साठीच करत आहेत. प्रथम बाल संस्कार केंद्रातील मुलांचे विविध कला दर्शन झाले.या नंतर किशोर वयीन मुलींची भाषणे झाली.

या वेळी शालेय मुलींच्या दोरीवरील उड्या, कॉलेज युवतींच्या वेशभुषा स्पर्धा, सौभाग्यवतींच्या केशरचना स्पर्धा व सर्वच महिलांसाठी विविध स्पर्धा पार पडल्या.सर्वांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. प्रास्ताविक धनश्री मल्टीस्टेटच्या वनिता धपाटे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ.स्नेहा जाधव हिने केले.

या वेळी डॉ.रविराज गायकवाड,करिष्मा पटेल,रमिजा गाडिवान,राधा गायकवाड,प्रविण शिंदे, शुभांगी शिंदे,विनोद चुंगे,राजेंद्र माळी,ऐजाज कोतवाल,बाळु डोलार,लक्ष्मण ऊत्तरवाड यांची अनमोल साथ होती. तामलवाडी मधील ३०० महिलांचा सहभाग यात होता.



# कॅसीनो ऑकेस्ट्रा बारवर पोलिसांचा छापा

**११ महिला, ९ ग्राहक, बारचे मॅनेजर व मालक अश्या २१ आरोपीविरूध्द गुन्हा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

मौजे कोंडी ता.उत्तर सोलापूर येथील कॅसीनो ऑकेस्ट्रा बार वर ग्रामीण पोलीसांच्यावतीने छापा कारवाई करण्यात आली. यामध्ये ५ लाख १२ हजार ४२० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

दि. १७ मार्च रोजी कॅसीनो ऑकेस्ट्रा बार येथे छापा टाकला तेंव्हा कॅसीनो ऑकेस्ट्रा बार मधील महिला अंगावर तोकडे कपडे घालुन बिभत्सपणे अश्लिल हावभाव करून संगीताच्या तालावर अश्लि नृत्य करीत असल्याचे दिसुन आले. तेथे बसलेले ग्राहक समोरील नर्तका यांचेकडे पाहुन अश्लील हावभाव करून संगीताच्या तालावर नाचत असल्याचे दिसुन आले होते.

ऑकेस्ट्रा बार मधील ११ महिला, ९ ग्राहक ऑकेस्ट्रा बारचे मॅनेजर व मालक असे एकूण २१ आरोपी विरूध्द पोकॉ भिमराव उत्तम खंडागळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून सोलापूर तालुका, पोलीस ठाणेस गुन्हा दाखल झाला आहे. कॅसीनो ऑकेस्ट्रा बार येथुन साऊंड बॉक्स, रोख रक्कम, मोटार सायकल, मोबाईल हॅन्डसेट असा एकूण ५ लाख १२ हजार ४२० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. गुन्हयाचा अधिक तपास सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील नेमणुकीस असलेले सपोफौ/रामेश्वर कोडक हे करीत आहेत.

सदरची कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली त्यांचे कडील पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका, पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार यांनी बजावली आहे.



# पल्लवी मेणकर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१७ मार्च -**

सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या वतीने देण्यात येणारा सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार महूद अंतर्गत असलेल्या खांडेकरवस्ती (नवी) येथील जि.प.प्रा.शाळेमधील उपशिक्षिका पल्लवी रामचंद्र मेणकर- महाजन यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सांगली येथे लवकरच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील तसेच जिल्हा परिषदेचे नूतन पदाधिकारी यांच्या उपस्थितीत होणार आहे, असे बँकेच्या चेअरमन रूपाली गुरव यांनी सांगितले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**वाहतूक कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील डीआयएम यांचे कार्यालय, खालील कामसाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा आमंत्रित करत आहे. निविदा सूचना क्र.: GEM/2026/B/7340320, दिनांक: 13/03/2026; कामाचे नाव व ठिकाण: सोलापूर कोचिंग डेपोमधून चाकांच्या संचासह (wheel set) जोडलेल्या बोगींची वाहतूक माटुंगा कार्यशाळा, पार्सल कार्यशाळा किंवा भारतीय रेल्वेवरील इतर कोणत्याही निर्देशित कार्यशाळेपर्यंत (किंवा उलट दिशेने) करणे; ही कंत्राटी वाहतूक GeM प्रणालीद्वारे, योग्य सुरक्षा व्यवस्थेसह खुल्या 'फ्लॅट ट्रक'मधून केली जाईल. निविदा पद्धती: दोन पाकीट पद्धत (Two Packet System). कामाचा अंदाजित खर्च: रु. 2,39,81,299.25. निविदा अर्जाची किंमत: शून्य (Nil). ज्या कार्यालयातून निविदा अर्ज खरेदी करता येईल, त्या कार्यालयाचा पत्ता: DRM(M) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. जमा करावयाची बयाणा रक्कम: रु. 2,69,910/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: काम सुरू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षे. निविदा सादर करण्याची तारीख व वेळ: 06/04/2026 रोजी 10:00 वाजता. निविदा उघडण्याची तारीख व वेळ: 06/04/2026 रोजी 10:30 वाजता. निविदेचा संपूर्ण तपशील पाहण्यासाठी संकेतस्थळाचा पत्ता व सूचना फलकाचे ठिकाण: www.gem.gov.in/

**वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
DE/Sur-06

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

## जाहीर प्रसिध्दीकरण

एस.आर.जन्म मृत्यु अर्ज १३८/२०२६

### सोलापूर येथील मे. उत्तर सोलापूर तहसिलदार यांचे समोर

**अब्दुलगनी अजीज पटेल**
वय - ६९ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त
रा. प्लॉट नं. ३१, मुमताज नगर, सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**मा. अधिक्षक जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर** — **सामनेवाला**

ज्या अर्थी यातील अर्जदार यांची मुलगी नामे महेजबीन अब्दुलगनी पटेल, यांचे दिनांक १७/०९/१९८५ रोजी भावनाऋषी हॉस्पिटल, सोलापूर येथे जन्म झालेले आहे व अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद मा. अधिक्षक तथा जन्म-मृत्यू अधिकारी जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालय, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर येथे जन्माची नोंदणी कायद्याप्रमाणे होऊन मिळणेकरिता हल्लीचा अर्ज दाखल केलेले आहे.

त्या अर्थी सदर अर्जाचेकामी अर्जदार यांना त्यांच्या मुलीचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत किंवा नेमलेल्या तारीख १०/०४/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १७/०३/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले आहे.

(शिक्का)

**सही**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**उत्तर सोलापूर, सोलापूर**

## तहसिल कार्यालय बार्शी

**(कुळ कायदा शाखा)**

दुरध्वनी क्र. (०२९८४) २२२२१३ E-mail : tahbarshi@gmail.com
क्र. कुळकायदा/क. १४, १५/एसआर-१९/२५ दिनांक - १६/०३/२०२६

### जाहीर समन्स

प्रति,
**१. पांडुरंग रामभाऊ गडसिंग** - **अर्जदार/वादर**
रा. घाणेगांव ता.बार्शी
विरुध्द
**१. सिद्राम धोंडय्या स्वामी** - **सामनेवाला**
रा. घाणेगांव ता.बार्शी

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**

दावा जमीनीचे वर्णन

| गावाचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे.आर | पो.ख. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| घाणेगाव | १०४ | १.७६ | 0.00 | ३.१२ |

दावा जमिनीचे इतर हक्कातील सिद्राम धोंडय्या स्वामी स.सा. कुळ हा शेरा कमी करुन मिळणेबाबत अर्जदार यांचे दि.२०/०३/२०२५ रोजी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये दि. २२/०१/२०२६, २६/०२/२०२६ व १२/०३/२०२६ रोजी चौकशीची तारीख ठेवण्यात आलेली होती. तथापि प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले असून ग्राम महसूल अधिकारी घाणेगांव, ता. बार्शी यांनी प्रतिवादी अथवा त्यांचे नातेवाईक गावी रहात नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, वरील नमूद प्रतिवादी अथवा त्यांचे वारस हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या संदर्भाने तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्यांमार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह दि. १६/०४/२०२६ रोजी तहसिल कार्यालय बार्शी हजर रहावे. जर तुमचे म्हणणे प्राप्त झाले नाही तर आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

**सही/-**
**एफ.आर. शेख**
**तहसिलदार बार्शी**

## दुधनी नगरपरिषद, दुधनी

**जा.क्र. न.प./कावि/२१५/२०२६** **दिनांक :- १७/०३/२०२६**

**परिपत्रक**

याद्वारे तमाम नोंदणीकृत मक्तेदारांना / पुरवठादारांना कळविणेत येते की, दुधनी नगरपरिषदने अग्निशमन सेवा बळकटीकरण योजनेंतर्गत पुरक उपकरणे खरेदी करणेचे काम प्रस्तावित केलेले आहे. या कामाचे खरेदी करावयाच्या उपकरणाकरिता मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा मुंबई यांचेकडून तांत्रिक मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर उपकरणांचे अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही चालू आहे. याकामी शासनाच्या मंजुर दरसूचीमध्ये दर नमूद नसलेने सदर उपकरणांचा अंदाजपत्रकात समावेश करण्यासाठी सदर बाबींचे बाजार भावाप्रमाणे दरपत्रक मागविणेत येत आहे. तरी कोणास सदर बाबींची दरपत्रके द्यावयाचे असतील त्यांनी इकडील कार्यालय अधिक्षक यांचेकडे समक्ष संपर्क साधून आवश्यक बाबींची माहिती घेऊन त्याचे दरपत्रक दि. २५/०३/२०२६ रोजी सायं. ४.00 वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात बारनिशी विभागाकडे समक्ष सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**(लक्ष्मीकांत कहार)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, दुधनी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः आष्टा तालुका भूम व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीन कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डिं धाराशिव सब डि व ता. भुमपैकी मोजे आष्टा येथील घरजागा ग्रामपंचायत मिळकत नं. ६८ याचे क्षेत्र ७१३.00 चौ. फुट यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - ग्रामपंचायत कार्यालय, दक्षिणेस - नाथ महाराज मठ, पश्चिमेस - नाथ महाराज मठ व इतर व उत्तरेस - ग्रामपंचायत रस्ता येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री. विक्रम तुळशीराम गिलबीले यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. श्री. विक्रम तुळशीराम गिलबीले हे सदरची मिळकत आपला मुलगा श्री. रोहन विक्रम गिलबीले यांच्या नावे हस्तांतरीत करुन सदर मिळकत बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणचेही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी-बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आपल्या मुलाच्या नांवे खरेदीखताने अथवा बक्षीसपत्राद्वारे अथवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करतील. सदरचा हस्तांतरणचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून हो खरेदीपूर्व/हस्तांतरणपूर्व जाहीर नोटीस दिली असे. कळावे. दिनांक १७/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
**पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी**
**मो.नं. ९८२२०६५६६१**

## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

ज्याअर्थी, मी सही करणारा, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचा प्राधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, 2002 च्या नियम 3 सह वाचन केलेल्या कलम 13 च्या उप-कलम (12) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्यासाठी मागणी नोटीस 22/12/2025 जारी केली.

कर्जदाराने रक्कम परतफेड न केल्यामुळे, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, अधोस्वाक्षरी करणाऱ्याने, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (4) अन्वये आणि तारण हितसंबंध अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक 06/03/2026 रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, त्यांनी मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार केल्यास, तो वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या बोज्याच्या अधीन असेल.

तारण ठेवलेल्या मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेसंदर्भात, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जात आहे.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सूचनेची तारीख आणि एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - वळसंग**<br>**कर्जदारः**<br>**1. मे. सुलतान किराणा ट्रेडर्स प्रो.प्रा. शालम हुसेनबाशा अमिलचुंगे**<br>पत्ता :- मु.पो. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर - 413228<br>**निवासाचा पत्ता :** मु.पो. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर - 413228 | सुरक्षा : -<br>1. समभागांचे तारण, हिशोबातील येणी, फर्निचर, यंत्रसामग्री आणि उपकरणे यांचे तारण<br>2. श्री. शालम हुसेनबाशा अमिलचुंगे यांच्या नावावरील मालमत्तेचे गहाण.<br>वळसंग येथे स्थित, असलेली आणि वसलेली जमिनीचे सर्व तुकडे व भाग; मालमत्ता भूखंड क्रमांक 76, एकूण क्षेत्र 161.71 चौ.मी., गट क्रमांक 512/2 (भाग), मालमत्ता क्रमांक 1867, पोस्ट वळसंग, दक्षिण सोलापूर, महाराष्ट्र.<br>सीमा खालीलप्रमाणे आहेत: -<br>पूर्व : - भूखंड क्र. 77, पश्चिम: - थळंगे यांची मालमत्ता<br>दक्षिण: - गट क्र. 511/A, उत्तर: - रस्ता<br>CERSAI ID : - 200070414241<br>CERSAI ID : - 200068263472 | **मागणी सूचना -**<br>22/12/2025<br>रु. 27,27,954.00/-<br>(सत्तावीस लाख सत्तावीस हजार नऊशे चौपन्न रुपये फक्त) |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ०६/०३/२०२६**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी, सोलापूर विभाग**

## सावधानतेची जाहीर नोटीस


तमाम लोकांना या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नंबर. २२० तथा २०/१६/१३/२ पैकी न्यु आनंद नगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीतील प्लॉट नं.१२ याचे एकूण क्षेत्रफळ १७७०.३४ चौ. फुट इतकी असलेली दुमजली इमारत ही सौ. नंदा हरी गायकवाड यांच्या मालकीची होती. सदरहु घरजागा ही त्यांनी आमचे अशिलास दिनांक १७/०३/१९९८ रोजी कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलाच्या नांवे कब्जा साठेखताचा दस्त लिहून दिलेला आहे, सबब तेंव्हापासून सदरहू घरजागेचा संपूर्ण कब्जा आमचे अशिलाच्या ताब्यात आहे.

सदरहु सौ. नंदा हरी गायकवाड यांनी आमच्या अशिलाच्या नांवे साठेखताप्रमाणे खरेदीखताचा दस्त लिहून न दिल्याने आमचे अशिलांनी त्यांच्या विरुद्ध स्पेसिफिक परफॉर्मन्सचा दावा हा दाखल केला असून, सदरहु स्पे.मु.नं. ३३/२०१२ हा सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. सदरहू घरजागेच्या आमच्या अशिलाच्या कब्जेस १) मुबीन फारुख पटेल, २) मुस्ताक हिदायत रसुल शेख, रा. सोलापूर हे कब्जेस हरकत अडथळा करीत असल्यामुळे यांच्या विरुद्ध रे. मु.नं. १२५८/२०२५ दाखल केला असून सदरहु दावा हा सोलापूर येथील मे. न्यायालयात प्रलंबित आहे.

सदरहु हकीकत व वस्तुस्थिती असतानाही व दावा मिळकतीत कायदेशीर हक्क व अधिकार नसताना १) मुबीन फारुख पटेल, २) मुस्ताक हिदायत रसुल शेख व फय्याज सलामत हकीम हे गैर व बेकायदेशीरित्या सदर वर नमुद प्लॉट जागा तथा घरजागा विक्री करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे खात्रीशीर माहिती आमचे अशिलास मिळाली आहे. सबब त्यांच्याशी कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार सदर घरजागेसंदर्भात करु नये याउपरही केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. सबब कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही सावधानेची जाहीर नोटीस दिली असे दिनांक १७/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. आर.एच. परदेशी**
**एम.कॉम. एलएल.बी.,**
**२क बुधवार पेठ, कस्तुरबा मार्केट जवळ**
**सोलापूर मो. नं.९८२२८०७८७९**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

सा.नों.क्र. महाराष्ट्र २९८/सोलापूर. सा.न्या.नों.क्र. एफ/२२१/सोलापूर, दिनांक १७-६-१९७१
(अल्पभाषिक संस्था)



## श्री नीलकंठेश्वर शिक्षण संस्था

१९१, साखर पेठ, सोलापूर - ४१३००५.

### विशेष सर्वसाधारण सभेची सूचना / नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

**श्री नीलकंठेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची विशेष सर्व साधारण सभा रविवार दि. २२/०३/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वा. संस्थेचे कार्यालय श्री नीलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान १९१, साखर पेठ, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेली आहे.**

**तरी सदर सभेस सर्व सभासद व पदाधिकारी यांनी वेळेवर उपस्थित रहावे.**

**✻✻✻ सभेपुढील विषय पत्रिका ✻✻✻**

१) मागील सभेचे कार्यवृत्तांत वाचून मंजूर करणे.
२) शिक्षण संस्थेच्या आगामी पंचवार्षिक निवडणूकीमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करणे कामी व मतदान करणे कामी फक्त आजीव सभासदच अधिग्राह्य राहतील. तसेच उमेदवार हा किमान बारावी किंवा तत्सम डिप्लोमा उत्तीर्ण असावे. त्याच प्रमाणे मागील वार्षिक सर्व साधारण सभासद यांचे यादी निष्काशित करणे व घटना / नियमावली मध्ये दुरुस्ती करणे बाबत विचार विनिमय करणे.
३) संस्थेचे आजीव सभासदाचे सभासदत्वासाठी नाव नोंदणी फी रक्कम रुपये २०१/– या ऐवजी रु. ५०१/– असे वर्गणी मध्ये वाढ करणे बाबत विचार करणे व सदर आजीव सभासद फी मध्ये वाढ करणे कामी घटना / नियमावली मध्ये दुरुस्ती करणे बाबत विचार विनिमय करणे.
४) मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने आयत्या वेळी घेण्यात येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

टीप :– सभेच्या अधिकृत वेळेपासून अर्ध्या तासांत गणपूर्ती झाली नाही तर ती सभा तहकूब करुन त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासांनी घेण्यात येईल. व सदरहू सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही आणि त्या सभेस मूळ सभेच्या कार्यक्रम विषय पत्रिकेप्रमाणे कामकाज केले जाईल याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

**श्री नीलकंठेश्वर शिक्षण संस्था, सोलापूर**
**श्री. रवि वि. नादरगी** - सचिव **श्री. राजीव सु. आडकी** - अध्यक्ष

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीसाठी रणसंग्राम रंगला

## अध्यक्षपदासाठी रामप्पा चिवडशेट्टी यांचे नाव निश्चित?



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**
सोलापूर जिल्हा परिषदेतील अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांच्या निवडीसाठीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर होताच जिल्ह्यातील राजकीय रणसंग्राम रंगतदार ठरत आहे. या निवडीसंदर्भात विशेष सभा बोलावण्यात येणार आहे. प्रशासनाने त्यादृष्टीने तयारी सुरु केली आहे.

यंदाचे अध्यक्षपद ओबीसी अर्थात् नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षित असल्याने राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची बनली आहेत. विविध गटांकडून 'फिल्डिंग' लावण्यास सुरुवात झाली असून इच्छुक उमेदवारांमध्ये जोरदार लॉबिंग सुरु असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी गावचे सुपुत्र रामप्पा चिवडशेट्टी यांचे नाव अध्यक्षपदासाठी निश्चित झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. या घडामोडीमुळे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, अनेक इच्छुकांच्या आशांवर पाणी फिरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अध्यक्ष निवडीचा कार्यक्रम याप्रमाणे; सकाळी १० ते १२ नामनिर्देशनपत्र स्विकारणे, दुपारी २.०० वाजता विशेष सभेस प्रारंभ, दुपारी २.०० वाजता नाम निर्देशनपत्रांची छाननी व उमेदवार घोषित करणे, दुपारी २.१५ ते २.३० उमेदवारी अर्ज मागे घेणे, दुपारी २.३० पासून अध्यक्ष निवडीच्या कामकाजास प्रारंभ.

उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम याप्रमाणे; दुपारी ३.०० वाजता नामनिर्देशनपत्रांची छाननी व उमेदवार घोषित करणे, दुपारी ३.१० ते ३.२५ उमेदवारी अर्ज मागे घेणे, दुपारी ३.२५ वाजता उपाध्यक्ष निवडीच्या कामकाजास प्रारंभ. दरम्यान, उमेदवारी अर्जासोबत जातीचा दाखला, जातपडताळणी प्रमाणपत्र किंवा जातपडताळणी प्रस्ताव कार्यालयात जमा केलेचे संबंधित कार्यालयाची पोहोच पावती, आधारकार्ड जोडणे बंधनकारक असेल.



### सोलापूर जनता बँक निवडणूक

# ५१ हजार ४९४ पैकी ५ हजार ६७९ सभासदांनी बजाविला मतदानाचा अधिकार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
सोलापूर जनता सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मंगळवार, दि.१७ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. बँकेच्या ५१ हजार ४९४ सभासदांपैकी ५ हजार ६७९ सभासदांनी मतदानाचा अधिकार बजाविला.

जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली. जिल्हाभरात मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा, कर्मचारी आणि पोलिस बंदोबस्ताची योग्य व्यवस्था करण्यात आली होती.

मतदानाची एकूण टक्केवारी ११.०२ इतकी आहे. कमी मतदानामुळे विविध राजकीय गट-तटांच्या गणितात बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सोलापूर जनता सहकारी बँक ही मल्टिस्टेट बँक असून सोलापूर शहर-जिल्ह्यासह राज्यभरात शाखा आहेत. या बँकेच्या एकूण १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. त्यापैकी ७ जागा बिनविरोध झाल्या. उर्वरित १० जागांसाठी १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते.




# समूहनृत्य स्पर्धेत हिंगुलांबिका प्राथमिक शाळा प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
हिंगुलांबिका प्राथमिक शाळेने समूहनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. नृत्य कलाकार नागेश अलुर यांच्यामार्फत समूहनृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. समूहनृत्य स्पर्धेत एकूण ११ शाळांनी सहभाग घेतला होता.

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेने खूब लढी वो मर्दानी या झाशीच्या राणीवर आधारित अंगावर रोमांच उभे करणारे थीम साँग सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेसाठी आश्विन संगवे, माधवी खमितकर, रेवती क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले.



बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापू ढगे, सचिव विजय पुकाळे यांनी अभिनंदन केले. हिंगलाज प्रीमियर लीगचे आशिष कटारे, दर्शन ढगे, प्रतीक पुकाळे, आनंद खामितकर, सूर्यकांत खमितकर, रामकृष्ण रंगदळ, नरेंद्र दंतकाळे, यश ढोले यांच्यावतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. याप्रसंगी विद्यानिकेतन हायस्कूलचे मुख्याध्यापक गोपी नवले, पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी, सहशिक्षक नितीन मुसळे, प्राथमिकचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे व सहशिक्षिका बीना बुगले यांची उपस्थिती होती.

# ५४ मीटर रस्ता येथे एसटी बस थांबा द्यावा

**सोलापूर, दि.१७ मार्च-**
साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौक (जुने भैय्या चौक) ते मरिआई चौक दरम्यान असलेला थांबा पूल पाडण्यात आल्यामुळे भैय्या चौकातील एस.टी.थांबा बंद झाला आहे. त्यामुळे ५४ मीटर रस्ता येथे एसटी बस थांबा द्यावा, अशी मागणी एकात्मता बहुउद्देशीय संस्थेने राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिन शिराळकर, हर्षल साबळे, मुन्ना वाघमारे, हतिक कसबे आदी उपस्थित होते.

# तरुण भारत माजी कर्मचारी समितीतर्फे कारंजकर, वडतिले, म्याकल, बसाटे, तडवळकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
तरुण भारत माजी कर्मचारी समितीतर्फे तरुण भारतचे माजी संपादक नारायण कारंजकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तरुण भारतचे माजी कर्मचारी रमेश बसाटे यांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती ग्राहक भांडारच्या उपाध्यक्षपदी, दशरथ वडतीले यांची औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्यपदी, ज्ञानेश्वर म्याकल यांची स्वीकृत नगरसेवक आणि महावीर बँकेच्या संचालकपदी तसेच रोहिणी तडवळकर यांची स्वीकृत नगरसेवक आणि भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

जुळे सोलापूरातील श्री द्वारकाधीश मंदिरात झालेल्या या पारिवारिक कार्यक्रमप्रसंगी तरुण भारतचे माजी संपादकद्वय अरुण करमरकर, अरविंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या मान्यवरांच्या हस्ते माजी संपादक नारायण कारंजकर व सौ.सुमती कारंजकर यांचा शाल, श्रीफळ, पूर्ण पोशाख देऊन सत्कार करण्यात आला.


तरुण भारतचे माजी संपादक अरुण करमरकर याप्रसंगी बोलताना म्हणाले, नारायण कारंजकर यांनी ज्योतिषशास्त्राच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आयुर्वेदातील अनेक गोष्टींचे त्यांना ज्ञान होते. आयुर्वेदाच्या माध्यमातून त्यांनी अनेक जुनाट रोगांवर उपचारही केले. विविध क्षेत्रात निवड झालेले माजी कर्मचारीर वृत्तपत्रात



केलेल्या कामाच्या अनुभवावरती आपापल्या क्षेत्रात अत्यंत प्रामाणिकपणे आणि कर्तव्य भावनेने आपली जबाबदारी निश्चितपणे पार पाडतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तरुण भारतचे माजी संपादक अरविंद जोशी म्हणाले, कारंजकर यांनी पत्रकारिता, आयुर्वेद, ज्योतिष शास्त्र आणि पर्यटन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. ज्योतिष शास्त्राच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनात येणारे अनेक छोटे-छोटे प्रश्न अतिशय सहजरित्या सोडविण्याचे मार्ग सांगून सामान्यांच्या जीवनात दिलासा दिला आहे. आजीबाईचा बटवा या माध्यमातून भारताची प्राचीन असणारी वैद्यकीय उपचार पध्दती अंगीकारण्यासाठी प्रयत्न केले. पत्रकारीतेमध्येही त्यांनी उत्कृष्ट लिखाण करुन आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. नोकरीच्या निमित्ताने त्यांनी सोलापूर-कुर्डुवाडी असा दररोज प्रवास केलेला आहे. भारतातील जवळपास सर्वच मोठी आध्यात्मिक तीर्थक्षेत्रे आणि ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन पर्यटनाचाही आनंद घेतलेला आहे.

सत्काराला उत्तर देताना नारायण कारंजकर यांनी आपला जीवन प्रवास उघडून दाखविला. नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल यांनी तरुण भारत मधील कामाचा अनुभव आपल्याला भावी काळात उपयोगी पडेल, असे सांगितले. नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी आपल्या मनोगतात तरुण भारतने नेहमीच आपल्याला सहकार्य आणि मार्गदर्शन केल्याचे सांगितले. माजी कर्मचारी समितीचे सदस्य दत्ता आराध्ये यांनी सूत्रसंचालन केले. माजी संपादक अनिल कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. राजेंद्र खमितकर यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सतीश पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मानसी मोकाशी, दिलीप कुलकर्णी, पुरुषोत्तम कारकल, परशुराम कोकणे, शरणप्पा शाबादे यांच्यासह तरुण भारतचे आजी-माजी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कै. कल्याणराव इंगळे
स्वामी सेवक

श्री स्वामी समर्थ

कै. उमेश इंगळे

**श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मा. चेअरमन व स्वामी सेवक कै. कल्याणराव इंगळे यांचे १० वे पुण्यस्म्रण दिन व कै. उमेश मालक इंगळे यांच्या २४ व्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त् विनम्र अभिवादन**

**कै. कल्याणराव इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त् विविध कार्यक्रमांचे आयोजन**

समर्थ पार्क मैंदर्गी रोड, अक्कलकोट येथे महास्वामीजी व मान्यवरांच्या हस्ते कै. कल्याणराव इंगळे स्मृती उद्यान लोकार्पण, उद्यानातील सुशोभीत लक्ष्मी मंदीरात पुजन, कै. कल्याणराव इंगळे यांच्या अर्धपुतळ्यास मालार्पण व अभिवादन.

कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात कै. कल्याणराव इंगळे यांच्या अर्धपुतळ्यास व कै. उमेश इंगळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अभिवादन.

कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात आरोग्य, ॲक्यूप्रेशर व रक्तदान शिबीर.

सोलापूर जिल्हा इंग्रजी कार्यशाळा.

कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या वतीने गुणीजनांचा सत्कार

कराड येथील हुतात्मा बहुउद्देशीय कल्याणकारी संस्थेच्या वतीने गुणीजनांचा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान.

देवस्थान संचलित श्री स्वामी समर्थ रुग्णालयात डॉ. स्वन्पिल हिप्प्रगी, डॉ. रोहित कुंभार, डॉ. स्वप्ना हिप्प्रगी, डॉ. नम्रता पवार, यांच्या सेवेतून सर्व रोग निदान व उपचार शिबीर

-: कार्यक्रमाचे स्थळ :-
**कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालय / श्री स्वामी समर्थ रुग्णालय मैंदर्गी रोड, अक्कलकोट**

-: आपले नम्र :-
**श्री. महेश कल्याणराव इंगळे** | **चि. प्रथमेश महेश इंगळे**

**अभिवादक**
**श्री वटवृक्ष स्पोर्टस् टर्फ**
**मैंदर्गी रोड, बायपास ब्रीज लगत**
**अक्कलकोट**

**श्री. वटवृक्ष एंटरप्राईजेस**
**श्री. बसवेश्वर मार्केट यार्ड,**
**अक्कलकोट**

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

### इंधन सुरक्षा आणि पर्यावरण रक्षण ही लोकचळवळ व्हावी

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १७ मार्च :** राजयोग ब्रह्माकुमारीसद्वारा भवन येथे सक्षम-२०२६ जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे प्रमखु पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. इंधनाची बचत ही केवळ गरज नसून ती एक देशसेवा आहे. ऊर्जा सुरक्षा आणि पर्यावरण रक्षण ही आता एक लोकचळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले. ऊर्जा बचत करणे हे केवळ सरकारचे काम नाही तर प्रत्येक नागरिकाचे वैयक्तिक कर्तव्य आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाद्वारे प्रेरित 'सक्षम' हे जनजागृती मोहिमांचे मुख्य घोषवाक्य आहे, जे हा संदेश देते की चालणे, सायकल वापरणे आणि ट्रॅफिक सिग्नलवर इंजिन बंद करणे यासारखे छोटे वैयक्तिक प्रयत्न पर्यावरण वाचवण्यात आणि इंधनाचा वापर कमी करण्यात मोठी भूमिका बजावतात. ऊर्जा संवर्धन जनजागृती ऊर्जा दूत अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्याद्वारे करण्यात आले.






# लातूर महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते उद्घाटन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १७ मार्च :** महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने आयोजित 'लातूर जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५-२६' चे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित या सोहळ्यात ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात झाली.





याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी आणि जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विविध उपविभागातील खेळाडूंनी शिस्तबद्ध पथसंचलन (परेड) केले. संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपापल्या पथकाचे नेतृत्व केले. यावेळी सर्व स्पर्धकांना क्रीडा नियमांचे पालन करण्याची शपथ देण्यात आली. उद्घाटनानंतर झालेल्या झुंबा डान्समध्ये जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वतः सहभागी होऊन कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित केला.

कोतवाल ते अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी अशा सर्व संवर्गातील कर्मचारी-अधिकारी यांचा या स्पर्धेतील उत्स्फूर्त सहभाग कौतुकास्पद आहे. लातूर जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंनी सांघिक भावनेने आणि चिकाटीने आपल्या खेळाचे प्रदर्शन करावे. लातूर जिल्ह्याला राज्यस्तरीय स्पर्धेत जास्तीत जास्त प्रतिनिधित्व मिळवावे, यासाठी सर्वांनी मनपासून प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. अतिशय कमी कालावधीत स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

या स्पर्धा म्हणजे केवळ क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम नसून सतत कामाच्या तणावात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवी ऊर्जा देणारा उपक्रम आहे. स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी पूर्ण सचोटीने सहभाग नोंदवून चांगली कामगिरी करावी. दैनंदिन जबाबदाऱ्या पार पाडताना आपले आरोग्य, शारीरिक स्वास्थाकडे लक्ष द्यावे. एखाद्या मैदानी खेळाची आवड जोपासून त्यासाठी नियमितपणे वेळ द्यावा, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंची परेड अतिशय उत्स्फूर्त झाली. सर्वांनी दोन दिवसीय स्पर्धा काळात कामाचा ताण विसरून खेळांमध्ये सहभागी होवून चांगली कामगिरी करावी. या स्पर्धेतील सहभागाचा आनंद अनुभवा, मनापासून खेळा. खेळ असो की दैनंदिन जबाबदाऱ्या, जिंकल्यावर जल्लोष करणे, पराभवानंतर खिलाडूवृत्तीने पराभव स्वीकारणे आवश्यक असते. महसूल, पोलीस विभागाच्या जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धा होतात. मात्र लातूर जिल्ह्यातील महसूल, पोलीस आणि इतर विभागांच्या एकत्रित स्पर्धांचे आयोजन व्हावे. विविध विभागांच्या एकत्रित स्पर्धा झाल्यास विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्यातील बाँडिंग वाढण्यासाठी मदत होईल, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छांऐवजी ग्रंथ देऊन करण्यात आले. तसेच विविध महसूल अधिकारी आणि कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींचाही यावेळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले. या दोन दिवसीय स्पर्धेत विविध मैदानी खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## समाधान नळेगावात शिबिरास प्रतिसाद

**नळेगाव :** महाराष्ट्र शासनाद्वारेराबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत नळेगाव येथे दि. १४ मार्च रोजी नळेगाव ग्रामपंचायत सभागृहात समाधान शिबीर घेण्यात आले.

शिबिरास उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी डॉ मंजुषा लटपटे, तहसीलदार नरसिंग जाधव, नायब तहसीलदार दिगंबर स्वामी, संतोष धाराशिवकर, शैलेश निकम, तालुका कृषी अधिकारी शिवचंद्रपाल जाधव, सरपंच सूर्यकांत चव्हाण, पंचायत समिती सदस्य शिवम देवशेटवार, संतोष कलवले, अनिकेत शेंडगे, रामेश्र्वर स्वामी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'महिला तंत्रनिकेतन' मध्ये महिला दिन उत्साहात साजरा

**लातूर :** शहरातील बार्शी रोड येथील शासकीय निवासी तंत्रनिकेतनमध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भारतातील कर्तृत्ववान महिलांच्या प्रतिमांचे अनावरण करण्यात आले. यामध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी, भारतरत्न लता मंगेशकर, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, अंतराळवीर कल्पना चावला, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. आनंदीबाई जोशी आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या डॉ. उमा कडगे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी 'बेटी बचाव, बेटी पढाओ' या विषयावर भव्य रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. ॲड. लक्ष्मिकांत कमलजकर यांनी 'भक्कम कुटुंब व्यवस्था' यावर, तर नाबार्डचे जिल्हा प्रबंधक श्रीराम वाघमारे यांनी 'आर्थिक साक्षरता व सक्षमीकरण' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. रंजिता कोताळकर यांनी केले. सूत्रसंचालन वैष्णवी शेळके यांनी केले. तर आभार श्रावणी गायकवाड यांनी मानले. प्राचार्य एस.डी. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला झाला. यावेळी प्रा. गिरगावकर, प्रा. आवले, प्रा. ऐतवाडे, प्रा. श्रीमती बिडवे यांच्यासह विद्यार्थ्यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम नियोजनासाठी पंकज स्वामी यांनी साथ दिली.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील रोबोटिक्स एक्स्पो प्रदर्शनाला प्रतिसाद

**लातूर :** दयानंद महाविद्यालयातील विज्ञान संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांच्या रोबोटिक्स एक्स्पो व त्यांच्या स्किल डेव्हलपमेंटचे भव्य प्रदर्शन भरविण्यात आलेले होते. त्यात ८ रोबोटिक्स व विद्यार्थ्यांच्या स्किल डेव्हलपमेंटचे अनेक प्रोजेक्ट वस्तू आकर्षणाच्या केंद्रबिंदू होत्या. अनेक विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

सदरील प्रदर्शनात संगणकशास्त्र विभागातील बी.एस्सी. तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांनी ॲग्रीकल्चर संदर्भात काही रोबोट तयार केलेले होते, ज्याच्यामध्ये शेतीमध्ये बिया पेरण्याचा रोबोट, शेतीमध्ये औषधे फवारणीसाठीचा रोबोट, नांगरणीसाठीचा रोबोट आणि काही रोबोट स्मार्ट क्लासरूमसाठी होते. ज्यांच्यामध्ये एनर्जी सेव्ह करता येते, अशा रोबोटचे प्रदर्शन भरविण्यात आलेले होते.ॲग्रो रोबोट प्रदर्शन, रोबोटची थेट प्रात्यक्षिके आणि विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे प्रदर्शन हे त्यांच्या स्किल, इनोव्हेशन, संशोधनाला चालना देणारी कौतुकास्पद बाब होती. प्रत्येक विद्यार्थ्यांनी भविष्यात असेच नावीन्यपूर्ण संशोधन करावे, असे रोबोटिक्स एक्स्पोचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आलेले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, डॉ. संध्या कोल्हे, डॉ. हेमंत वरुडकर, प्राचार्य अनिलकुमार माळी, डॉ. जमन, अंगुलवार, डॉ. रोहिणी शिंदे, डॉ. युवराज सारणीकर, डॉ. श्याम इबाते, डॉ. संगीता जाजू, प्रा. सुजाता काळे, प्रा. बळवंत सूर्यवंशी यांच्यासह विभागातील प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भेट दिली असता, या भेटी दरम्यान सर्वांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी दिली.

# माजी खासदार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. जनार्दन वाघमारे यांची शुक्रवारी श्रद्धांजली सभा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १७ मार्च :** लातूर पॅटर्नचे शिल्पकार, माजी खासदार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक व पहिले कुलगुरू, लातूरचे माजी नगराध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत, ख्यातनाम साहित्यिक, डॉ. जनार्दन वाघमारे यांचे २ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही श्रद्धांजली सभा शुक्रवारी (दि २०) सायंकाळी ४.३० वाजता दयानंद सभागृह येथे होणार आहे.



साहित्य, शिक्षण, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात डॉ. जनार्दन वाघमारे यांनी आपला ठसा उमटवला आहे. डॉ. वाघमारे यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत ७५ पेक्षा अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे. फक्त ज्ञानाच्या बळावर सर्वोच्च पदावर पोहोचलेले अखंडपणे ज्ञानयज्ञ चालवणारे ज्ञानर्षी म्हणजे डॉ. जनार्दन वाघमारे सर. त्यांनी आयुष्यभर शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये डॉ. वाघमारे सरांचा सिंहाचा वाटा आहे. इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ अध्यापन केले. निग्रो साहित्य, दलित साहित्य आणि पुरोगामी साहित्य चळवळीवर त्यांनी सखोल लेखन व संशोधन केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू झाले. विद्यापीठाच्या स्थापनेपासून शैक्षणिक पायाभूत रचना उभारणीपर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे त्यांची राज्यसभेवर खासदार म्हणून निवड झाली होती. मराठवाड्याच्या विकासासह अनेक सामाजिक प्रश्नांना त्यांनी राज्यसभेत वाचा फोडली. डॉक्टर वाघमारे यांची लातूर नगरीचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून कारकीर्द कौतुकास्पद राहिली आहे. डॉ.जनार्दन वाघमारे यांचे निधनामुळे शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक दुवा निखळला आहे.

त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजता दयानंद सभागृह येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन समस्त लातूरकरांच्यावतीने करण्यात आले आहे. या श्रद्धांजली सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची विनंती माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, डॉ. दिगंबर नेटके, डॉ. विनायक कलमे, प्राचार्य संजय वाघमारे, प्रा. सुधीर साळुंखे, प्रा.डॉ. विनोद चव्हाण, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, विवेक सौताडेकर आदींनी केली आहे.

## सैनिक कल्याण विभागाच्या लिपिक-टंकलेखक (गट-क) पदभरती परीक्षेच्या तारखेत बदल; आता २३ मार्च रोजी होणार ऑनलाईन परीक्षा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १७ मार्च :** सैनिक कल्याण विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) एकूण ७२ पदांसाठी टीसीएस-आयओएन यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेच्या तारखेपेक्षा बदल करण्यात आला आहे. ही परीक्षा आता २३ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या कालावधीत घेण्यात येणार आहे. पोलीस भरतीमुळे या परीक्षेची तारीख बदलण्यात आल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## लातूरच्या संकेत मिलनाचा या नाटकाला तिन पुरस्कार

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १७ मार्च :** छत्रपती संभाजी नगर येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत आयोजित विभागीय नाट्य स्पर्धेत लातूरच्या अजय गोजमगुंडे प्रस्तुत संकेत मिलनाचा या नाटकास तिन पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या ७१ व्या विभागीय नाट्य महोत्सवात संकेत मिलनाचा हे नाटक सादर करण्यात आले. सादरीकरणानंतर या नाटकातील कलाकारांची वृत्तपत्रांनी दखल घेवून कौतुक केले होते. या नाट्यस्पर्धेत एकूण वीस नाट्य संघांनी सहभाग नोंदविला.त्यात संकेत मिलनाचा या नाटकाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे. तर या नाटकातील कलाकार सुवर्णा बुरांडे यांना महिला अभिनयातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.तर पुरुष अभिनयातील तृतीय पुरस्कार अजय गोजमगुंडे यांना मिळाला आहे. संकेत मिलनाचा या नाटकाचे दिग्दर्शन बुरांडे,प्रकाश योजना अनिल कांबळे,नेपथ्य नंदकुमार वाकडे,रंगभूषा भारत थोरात यांनी केली असून संगीत मंदाकिनी घोरपडे व प्रकाश गंगणे यांनी दिले आहे.



## सावधान! लातूर जिल्हाधिकारी कार्यालय शिपाई पदभरतीची ती जाहिरात बनावट !

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १७ मार्च :** सोशल मीडियावर सध्या लातूर जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत २९ शिपाई (महसूल सेवक) पदांच्या भरतीची जाहिरात व्हायरल झाली आहे. सदर जाहिरात पूर्णपणे फेक आहे, नागरिकांनी अशा फसव्या माहितीला बळी पडू नये आणि कोणत्याही प्रकारचे पैसे भरू नयेत किंवा अर्ज करू नयेत.

भरतीसाठी अर्ज करण्यापूर्वी किंवा पैसे भरण्यापूर्वी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://latur.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. तेथे उपलब्ध असलेल्या अधिकृत जाहिरात/जाहीरनाम्याची खात्री करा.

अफवा पसरवू नका, स्वतःची आणि इतरांची फसवणूक टाळा!

वस्तुस्थिती : लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महसूल सेवक संवर्गातील शिपाई पदासाठी परिक्षा जाहीर करण्यात आली आहे. पण ही प्रक्रिया फक्त महसूल सेवक/कोतवाल संवर्गात सलग १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी आहे. खुली भरती प्रक्रिया नाही. २९ पदांची ही व्हायरल जाहिरात ही अधिकृत नसून बनावट आहे.

अधिकृत माहितीसाठी https://latur.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या !

# दयानंद कला महाविद्यालयात 'पेटंट फिलींग प्रक्रिया, संशोधन-त्यातील अडथळे' विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १७ मार्च :** दयानंद कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी 'पेटंट फिलींग प्रक्रिया, संशोधन आणि त्यातील अडथळे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील मॅनेजमेंट सायन्सचे विभाग प्रमुख डॉ. बालाजी कळंबे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते.

मानव्यविज्ञान शाखेतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी पेटंट फिलिंग करण्याकडे लक्ष दिल्यास अवघड काही नाही असे मत डॉ. बालाजी कळंबे यांनी व्यक्त केले. प्राध्यापक आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी व्हिडिओ बनवतात किंवा विशिष्ट पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना शिकवतात. अशावेळी त्यांनी बनवलेले व्हिडिओ किंवा वापरलेली पॅडागॉजी यावर पेटंट फाईल करता येते.याविषयी अधिक मार्गदर्शन करताना त्यांनी पेटंट फिलींग करण्याचे वेगवेगळे प्रकार सांगितले. त्यात मानव्यविज्ञान शाखेतील प्राध्यापकांशी संबंधित असणाऱ्या डिझायनर पेटंट बाबत विस्तृत माहिती दिली. प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना डॉ. अंजली जोशी यांनी कला महाविद्यालयातील प्राध्यापकांची पेटंट फिलिंग बाबतची उदासीनता व्यक्त केली. प्राध्यापकांना या संदर्भात अधिकाधिक माहिती मिळावी यासाठी १० पेटंट ज्यांनी मिळवले आहेत अशा डॉ. बालाजी कळंबे यांचे प्रमुख मार्गदर्शन आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी डॉ. संतोष पाटील समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम ए चा विद्यार्थी सुरज गोरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा ज्योती कदम यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ संजय स्वामी यांनी मेहनत घेतली.

या कार्यशाळेत वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.



## संक्षिप्त...

### तेजज्ञान फाउंडेशनच्या वतीने महिला दिन साजरा



**उदगीर :** येथील धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालयात तेजज्ञान फाउंडेशनच्या वतीने महिला दिनानिमित्त नव जीवन की ओर एक कदम या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तणाव महिलांमधील कमी करण्यासाठी त्याचे निराकरण कशा प्रकारे करता येईल याचे मार्गदर्शन या कार्यक्रमांमध्ये करण्यात आले. हॅपी थॉट्स उदगीरद्वरे घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉक्टर तृप्ती दाचावार यांनी केले. ध्यानाने या कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमासाठी निमा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. वर्षा वैद्य, डॉ. शितल जाधव, डॉ. मधुमती सोपा, डॉ. दिपाली कुलकर्णी, डॉ. केतकी तरडे, डॉ. शिवनी पाटील आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचा महाविद्यालयातील विद्यार्थिनी व शिक्षकवृंद यांनी लाभ घेतला. या कामाच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील व डॉ. उषा काळे यांचे सहकार्य लाभले. तेजज्ञान फाउंडेशनच्या वतीने अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून समाजामध्ये हॅपी थॉट्सद्वारे निर्माण करून ज्ञान आणि ध्यान यांचा प्रसार करणे हे या फाउंडेशनचे मुख्य उद्देश आहे. पूर्ण जगभरात संस्थेच्या विविध शाखा कार्यरत आहेत.

### रामप्रसाद बर्डे यांना जीवनगौरव पुरस्कार

**लातूर :** लातूर तालुक्यातील शिराळा येथील सामाजिक कार्यकर्ते रामप्रसाद सतीश बर्डे यांना महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन नाशिकतर्फे देण्यात येणारा नेताजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला आहे. येत्या दि. २९ मार्च रोजी पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. बर्डे यांनी भ्रष्टाचार निर्मूलन, वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, ऊस आंदोलन आदींसह सामाजिक कामे करुन अनेकांना न्याय मिळवून दिला. त्याबद्दल हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले आहे.

### व्हीएस पँथर्सतर्फे मुस्लिम बांधवांना मोफत शीरखुर्मा साहित्य वाटप

**लातूर :** येथील व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वतीने रमजान ईदच्या पार्श्र्वभूमीवर मुस्लिम बांधवांसाठी शीरखुर्मा बनवण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. हा उपक्रम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके आणि प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगर-सेवक सचिन मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत अंतर्गत म्हाडा परिसरातील मुस्लिम बांधवांना शीरखुर्मा साहित्य किटचे वितरण करण्यात आले. सामाजिक सलोखा आणि बंधुभाव जपण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. 'ना जातीचा, ना पातीचा -व्ही. एस. महाराष्ट्राच्या मातीचा' हे संघटनेचे घोषवाक्य असून त्यानुसार विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवले जात असल्याचे संस्थापक विनोद खटके यांनी सांगितले.

मुस्लिम समाजासाठी रमजान ईद हा पवित्र सण असल्याने समाजातील बांधवांना सण आनंदाने साजरा करता यावा यासाठी शीरखुर्मा बनवण्याचे संपूर्ण साहित्य असलेले किट देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे व जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख यांनी बाभळगाव रोडवरील संपर्क कार्यालयात केले होते. यावेळी परिसरातील चांद मामू, अतुल होळकर, शहबाज शेख, युनूस शेख, अल्ताफ शेख, आसिफ शेख, तालुका उपाध्यक्ष नंदिनी गायकवाड, शाखा प्रमुख नौशाद शेख, रवि वाघमारे, कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# रामकथेत विश्वामित्र प्रसंग; शिव-पार्वती विवाहाचे भावपूर्ण वर्णन

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १७ मार्च :** डोंगरशेळकी येथे श्री समर्थ धोंडुतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित संतपीठात सुरू असलेल्या रामकथेचा दुसरा दिवस अत्यंत भक्तिमय वाता-वरणात पार पडला. यावेळी ह.भ.प. रामनाचार्य बंडोपंत महाराज ढाकणे यांनी रामायणातील विश्र्वामित्र ऋषींचा प्रसंग सांगत भाविकांना रसाळ वाणीने मार्गदर्शन केले.



कथेमध्ये महाराजांनी सांगितले की, विश्र्वामित्र ऋषींनी प्रभू श्रीराम आणि लक्ष्मण यांना आपल्या यज्ञरक्षणासाठी सोबत नेले. या प्रसंगातून गुरूचे मार्गदर्शन, संतांचा सहवास आणि धर्मरक्षणाची भावना किती महत्त्वाची आहे, याचा संदेश मिळतो. संतांच्या सान्निध्यात राहिल्याने मनुष्याच्या जी-वनात सद्बुद्धी, संयम आणि योग्य मार्गाची प्रेरणा मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याच वेळी भगवान शंकर व माता पार्वती यांच्या दिव्य विवाहाचा प्रसंगही कथेतून उलगडून सांगण्यात आला. शिव-पार्वती विवाहाचा प्रसंग ऐकताना भाविक भक्त भावविभोर झाले. या प्रसंगातून श्रद्धा, तपस्या आणि भक्तीचे महत्त्व अधोरेखित होत असल्याचे महाराजांनी सांगितले.

संत हे समाजाला योग्य दिशा देणारे दीपस्तंभ असतात. संतांचे विचार आणि उपदेश आचरणात आणल्यास मनुष्याचे जीवन आनंदी, शांत व समाधानकारक होते. प्रभू श्रीरामांनीही संतांचा सन्मान केला आणि त्यांच्या आज्ञेचे पालन केले, त्यामुळेच त्यांचे जीवन आदर्श ठरले, असा भावार्थ महाराजांनी व्यक्त केला.

रामकथा सुरू असताना मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित राहून कथामृताचा लाभ घेत होते. काही भाविक कथा ऐकण्यात तल्लीन झाले होते, तर काही भाविक टाळ-मृदंगाच्या तालावर हरिनाम गात भक्तिरसात दंग झाले होते. संपूर्ण परिसरात रामनामाचा गजर घुमत असल्याने वातावरण अत्यंत भक्तिमय झाले होते.

श्री समर्थ धोंडुतात्या महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुरू असलेल्या या सात दिवसीय रामकथा सोहळ्यामुळे गा-वात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

## मोटरसायकल कार यांच्या अपघातात अंकुश गीते, ओमकार गिते यांचा मृत्यू

### बाप-लेकाचे एकाच चितेवर अंत्यसंस्कार



**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. १७ मार्च :** भरधाव कारच्या धडकेत वडील आणि मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर सोमवारी (दि.१६) सकाळी ११ वाजता हजारो नागरिकांच्या उपस्थितीत बाप-लेकावर एकाच चितेवर अंत्यसंस्कार करण्यात आल्याची हृदयद्रावक घटना जळकोट तालुक्यातील उमरगा रेतू येथे घडली. चितेला मुखाग्नी देताच गिते कुटुंबियांनी हंबरडा फोडल्याने उपस्थित नागरिकांचे डोळे पाणावले.

उमरगा रेतू (ता. जळकोट) येथील शेतकरी अंकुश विश्र्वनाथ गिते आणि त्यांचा मुलगा ओमकार अंकुश गिते हे रविवारी सायंकाळी शेतीचे काम आटोपून शिरूर ताजबंद-मुखेड मार्गावर स्वतःच्या शेताजवळ मोटारसायकलवर बसून आईची वाट पाहत होते. त्याच वेळी मुखेडहून शिरूरकडे भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच-२४-बीएक्स-२२९४ या कारने त्यांना जोराची धडक दिली. या भीषण अपघातात वडील आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. अंकुश गिते यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगी व एक अविवाहित मुलगी असा परिवार आहे. घरा-तील कर्ता पुरुष आणि एकुलता एक मुलगा गमावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ओमकार हा दररोज वडिलांसोबत शेतीत मेहनत करत होता. या दुर्दैवी घटनेमुळे उमरगा रेतू गावावर शोककळा पस-रली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तसेच तालुक्यात वाढत्या अपघातांमुळे भरधाव वाहनांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## गणित, भौतिकशास्त्र, संगणकशास्त्र हे 'विज्ञान कुटुंबा'चे अविभाज्य घटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :**आधुनिक युगात ज्ञानाच्या कक्षा झपाट्याने विस्तारत असताना गणित, भौतिकशास्त्र आणि संगणकशास्त्र या शाखा आता स्वतंत्र न राहता एकाच 'विज्ञान कुटुंबा'चे भक्कम आधारस्तंभ बनल्या आहेत. संशोधन क्षेत्रात या तिन्ही विषयांच्या समन्वयातून मानवी प्रगतीला नवी दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. ज्ञानेश्र्वर पवार यांनी केले. शिवछत्रपती शिक्षण संस्था संचलित राजर्षी शाहू महाविद्यालय येथे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत भौतिकशास्त्र, गणितशास्त्र आणि संगणकशास्त्रातील विकास या विषयावर आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. बी. बी. ठोंबरे होते. मंचावर प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. अभिजित यादव, डॉ. महेश वावरे आणि डॉ. रेणुका लोंढे यांची उपस्थिती होती.

## मंडळाचा काळा निर्णय तात्काळ मागे घेण्याची महाराष्ट्र राज्य वडार समाज संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडून दि. १ जानेव-ारी २०२६ रोजी मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार यांनी निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक म्हणजे श्रमिक बांधकाम कामगारांच्या पोटावर लाथ मारणारा, त्यांच्या मुलांचे शिक्षण उध्वस्त करणारा आणि थेट भारतीय संविधानावर घाला घालणारा काळा निर्णय असल्याची घणाघाती टीका सामाजिक कार्यकर्ते भटक्या विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यभरातील तसेच देशभरातील बांधकाम कामगार हे प्रामुख्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय घटकातील असून हे कामगार स्थलांतरित रोजनदारीवर काम करणारी आणि झोपडपट्ट्यात हाल अपेष्टात जीवन जगण-ारे आहेत अशा कामगारांच्या मुलांसाठी शिक्षण हाच एकमेव अशेचा किरण असताना त्यावरच निर्बंध घालण्याचा हा निर्णय म्हणजे कामगार विरोधी मानसिकतेचा कळस आहे. भारतीय संविधानातील कलम २१ अ, १५ (४) १५(५) व ४६ ही केवळ पुस्तकी कलमे नसून ती बहुजन समाजाच्या उन्नतीची हमी आहेत.

मात्र या परिपत्रकाच्या माध्यमातून श्रमिकांच्या मुलांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा सुनियोजित डाव रचण्यात आला असून हा निर्णय म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांची उघडपणे अडवणूक आहे. विशेष म्हणजे मंडळ स्थापनेपासून १२ डिसेंबर २०२५ पर्यंत अशा प्रकारचा कोणताही निर्बंध कधीही अस्तित्वात नव्हता, मग अच-ानक हा अधिकार कोणाच्या सांगण्यावरून कोणाच्या फायद्यासाठी आणि कोणाच्या दबावाखाली वापरण्यात आला हा प्रश्र्न हा संपूर्ण महाराष्ट्रातील कामगार विचारत आहेत. अत्यंत गंभीर बाब म्हणजे कामगारांकडून आकारण्यात येणाऱ्या १% निधी हा शास-नाचा नसून पूर्णतः कामगारांचा हक्काचा निधी आहे, मात्र त्याच निधीतून कामगार व मालक प्रतिनिधींचा सहभाग डावलून खाजगी कंपन्यांना टेंडर देणे, तथाकथित सामाजिक उपक्रमांच्या नावाखाली कोट्यावधींचा

अपव्यय केल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसा नाही पण खाजगी कंपन्यांसाठी कोट्यावधी खुले हा सरळ सरळ विश्र्वासघात आहे. हे परिपत्रक म्हणजे शब्दांचा खेळ करून श्रमिकांना फसवण्याचा आणि त्यांच्या मुलांचे भवितव्य अंधारात ढकलण्याचा सुनियोजित कट आहे.

दि.१ जानेवारी २०२६ रोजी काढलेले परिपत्रक तात्काळ रद्द करण्यात यावे बांधकाम कामगारांच्या मुलांना पूर्वीप्रमाणे अखंड शैक्षणिक आर्थिक सहाय्य देण्यात यावे, मंडळाचा निधी फक्त कायद्यानुसार कल्याणकारी योजनांसाठीच वापरण्यात यावा आतापर्यंत झालेल्या निधीच्या वापराची एसआयटी मार्फत उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, आता कुठे वडार समाजापर्यंत या योजनांविषयी माहिती झाली होती, कारण अद्यापही या योजनांपासून वडार समाज हा कोसो दूरच आहे आणि अशावेळी घेत-लेला हा निर्णय म्हणजे खऱ्या कामगारांवरती अन्याय करणारा आहे, असेही यावेळी सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. याप्रसंगी रमाकांत मुद्दे, सचिन वाडीकर, कृष्णा धोत्रे, राम आलाकुंटे, बाबासाहेब भांडेकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

## प्रगत शेतीसाठी शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाचा स्वीकार करावा- शिवकांत चव्हाण

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १७ मार्च :** नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध लागत आहे. शेतीपूरक अनेक संसाधने उपलब्ध होत आहेत. याचा वापर केल्यानंतर उत्पादनामध्ये नक्कीच वाढ होते. त्यामुळे प्रगत शेतीसाठी शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाचा स्वीकार करावा असे हिसोवा कंपनीचे फायनान्स मॅनेजर शिवकांत चव्हाण यांनी काढले. ते हिशोवा प्रायव्हेट लिमिटेड पुणे यांच्या सीएसआर फंडातून उर्मी संस्थेच्या माध्यमातून छत्रपती शिव-ाजीराजे महाविद्यालयामध्ये मोफत स्प्रे पंपाच्या वाटप कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून इलेक्ट्रॉनिक प्रायव्हेट लिमिटेड पुणे येथील एच. आर. व्यवस्थापक सोम्या बक्षी, सहाय्यक व्यवस्थापक रोहित वाकळे, उर्मीचे राहुल शेंडे, रा-हुल चुनीदास, प्रज्वल पाटील उपस्थित होते तर किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माधवराव पाटील, सचिव पी.टी. शिंदे,सहसचिव हिरागीर गिरी,कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, कार्यकारी सदस्य रामराव एकंबे, पुंडलिकराव पाटील, पृथ्वीराज अशोकराव पाटील एकंबेकर, प्राचार्य डॉ रामकिशन मांजरे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना चव्हाण म्हणा-ले, ऋतुमान बदलत चाललेले आहे, त्या ऋतुमानाशी आणि नवीन नवीन तंत्रज्ञानाशी शेतकऱ्यांना जुळवून घेणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने आमची कंपनी कार्य करत राहते. या स्प्रे यंत्र वाटपाचा लाभ पाच तालुक्यातील ८९ गावातील ७०० शेतकऱ्यांनी घेतला.

महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. रामकिसन मांजरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले हो-ते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार




प्रा.बालाजी सूर्यवंशी यांनी मानले.

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडीय - विभाग)**
**दि.:-/२०२६ जा.क्र.एमएजी/कावि**
**ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.**

### जाहिर प्रगटन

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. कासीम दावलजी पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे, सदफतहसीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अ. रोजी जि. ला-तूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १२/०६/१९८३ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार कासीम दावलजी पटेल रा. तुरुकवाडी यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे सदफतहसीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १२/०६/१९८३ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे सदफतहसीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत १५दिवसानंतर आदेश देण्यात येईल.

पुढील तारीख १५ दिवसानंतर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडीय - विभाग)**
**दि.:-/२०२६ जा.क्र.एमएजी/कावि**
**ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.**

### जाहिर प्रगटन

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. कासीम दावलजी पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे. वसीम कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अ. रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १२/१२/१९९१ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार कासीम दावलजी पटेल रा. तुरुकवाडी यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे वसीम कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १२/१२/१९९१ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे वसीम कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत १५ दिवसांनंतर आदेश देण्यात येईल.

पुढील तारीख १५ दिवसानंतर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडीय - विभाग)**
**दि.:-/२०२६ जा.क्र.एमएजी/कावि**
**ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.**

### जाहिर प्रगटन

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. कासीम दावलजी पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे, सदफतहसीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अ. रोजी जि. ला-तूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १२/०६/१९८३ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार कासीम दावलजी पटेल रा. तुरुकवाडी यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे सदफतहसीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १२/०६/१९८३ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे सदफतहसीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत १५दिवसानंतर आदेश देण्यात येईल.

पुढील तारीख १५ दिवसानंतर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडीय - विभाग)**
**दि.:-/२०२६ जा.क्र.एमएजी/कावि**
**ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.**

### जाहिर प्रगटन

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. कासीम दावलजी पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे. वसीम कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अ. रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १२/१२/१९९१ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार कासीम दावलजी पटेल रा. तुरुकवाडी यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे वसीम कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १२/१२/१९९१ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे वसीम कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत १५ दिवसांनंतर आदेश देण्यात येईल.

पुढील तारीख १५ दिवसानंतर

**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडीय - विभाग)**
**दि.:-/२०२६ जा.क्र.एमएजी/कावि**
**ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर.**

### जाहिर प्रगटन

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. लक्ष्मण रघुनाथराव जाधव विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बेवनाळ ज्याअर्थी नामे, कृष्णा लक्ष्मण जाधव रा. बेवनाळ ता. शिरूर अ. रोजी जि. ला-तूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. ०८/१०/२००२ मौजे. बेवनाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार लक्ष्मण रघुनाथराव जाधव रा. बेवनाळ यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय बेवनाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे कृष्णा लक्ष्मण जाधव रा. बेवनाळ ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक, ०८/१०/२००२ रा. बेवनाळ रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे कृष्णा लक्ष्मण जाधव रा. बेवनाळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत पुढील १५ दिवसांनंतर आदेश देण्यात येईल.

पुढील तारीख १५ दिवसानंतर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ**

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नळदुर्गातील बंद आरो प्लॅन्ट सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ मार्च -**

ऐन उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नळदुर्ग शहरातील बंद पडलेले थंड पाण्याचे आरो प्लॅन्ट तात्काळ सुरू करावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या निधीतून नळदुर्ग शहरात सुमारे दहा ठिकाणी नगरपालिकेने थंड पाण्याचे आरो प्लॅन्ट उभारले आहेत. या प्लॅन्टमधून नागरिकांना केवळ ५ रुपयांत २० लिटर थंडगार व शुद्ध पाणी उपलब्ध होत असल्याने ते नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरत होते. सध्या शहरात आठ दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने या आरो प्लॅन्टचे महत्त्व अधिक वाढले आहे.

मात्र सध्या शहरातील तीन ते चार ठिकाणचे आरो प्लॅन्ट बंद पडले असून त्यामुळे त्या भागातील नागरिकांना थंड व शुद्ध पाणी मिळणे बंद झाले आहे. नगरपालिकेने या प्लॅन्टची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी काही तरुणांकडे सोपवली असली तरी ऐन उन्हाळ्यातच प्लॅन्ट बंद पडल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

कडक उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेऊन नगरपालिकेने शहरातील बंद पडलेले सर्व आरो प्लॅन्ट तातडीने सुरू करून नागरिकांना थंड व शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# धाराशिव जिल्ह्यासाठी रस्ते व पुलांसाठी ६२ कोटींची तरतूद

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मार्च -**



जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली आहे. जिल्ह्यातील विविध राज्यमार्गांच्या सुधारणा आणि नवीन पुलांच्या बांधकामासाठी तब्बल ६२ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांची स्थिती सुधारून प्रवास अधिक सुखकर होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

या निधीतून २८ कोटी रुपये राज्य महामार्गांसाठी तर ३४ कोटी रुपये जिल्हा मार्गांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. परंडा, कळंब आणि तुळजापूर यांसह सर्व तालुक्यांमध्ये रस्ते सुधारणा आणि पूल बांधकामाची कामे हाती घेतली जाणार आहेत.

राज्यमार्गांच्या विकासाअंतर्गत सहा महत्त्वाच्या मार्गांची सुधारणा केली जाणार असून, परंडा तालुक्यातील महारटाकळी-पाटोदा- भूम- वारदवाडी (राज्यमार्ग ६२) या मार्गावरील मोठ्या पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध झाला आहे. कळंब तालुक्यात राज्यमार्ग-५२ ते कळंब-लातूर (राज्यमार्ग २३६) या सुमारे १४ किलोमीटरच्या रस्त्यासाठी ३ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच धाराशिव तालुक्यातील उपळा-तेर-जागजी (राज्यमार्ग २३९) या मार्गाच्या सुधारणेलाही गती मिळणार आहे. जिल्हा मार्गांसाठी मंजूर करण्यात आलेल्या ३४ कोटी रुपयांतून नऊ प्रमुख कामे हाती घेतली जाणार आहेत.

तेर-डकवाडी-काजळा मार्गावर काजळा आणि कोळेवाडी येथे नवीन पुलांची उभारणी करण्यात येणार आहे. तसेच तुळजापूर-धाराशिवसह तावरजखेडा, बेंबळी, आरणी आणि अणदूर परिसरातील सुमारे ८६ किलोमीटर रस्त्यांच्या दुरुस्तीला वेग मिळणार आहे. भूम तालुक्यातील वालवड येथेही नवीन लहान पूल उभारला जाणार आहे.



या कामांमुळे शेतकऱ्यांच्या मालाच्या वाहतुकीला गती मिळून विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सोयीचा होईल.

ग्रामीण आणि शहरी भागांतील दळणवळण अधिक सुलभ होणार असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्यांच्या समस्या मार्गी लागतील, अशी माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली.

## अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी जागा हस्तांतरित



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मार्च -**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. शासकीय दुग्ध डेअरी परिसरातील एक एकर जागा धाराशिव नगरपरिषदेकडे विनामूल्य हस्तांतरित करण्यात आली आहे. मातंग समाजाची सुमारे ४० वर्षांपासून प्रलंबित असलेली ही मागणी अखेर पूर्ण झाली आहे.

या निर्णयासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश येत देवेंद्र फडणवीस तसेच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सदर जागा स्मारकासाठी विनामूल्य देण्यास मान्यता दिली. या जमिनीची शासकीय किंमत अंदाजे २ कोटी ८ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. जिल्हाधिकारी कार्यालयाने यासंदर्भातील निर्णय घेतला असून, १६ मार्च २०२६ रोजी तहसील कार्यालय, धाराशिव मार्फत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी, नगरपरिषद धाराशिव यांच्याकडे जागेची अधिकृत ताबा पावती सुपूर्द करण्यात आली.

या प्रसंगी नगराध्यक्षा नेहा काकडे, मुख्याधिकारी नीता अंधारे, नगरसेवक राहुल काकडे, बांधकाम सभापती अभिजित काकडे, पाणीपुरवठा सभापती विलास लोंढे तसेच इतर मान्यवर आणि मातंग समाज बांधव उपस्थित होते.

# सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त सोनारी येथे रक्तदान शिबिर



### १०१ जणांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ मार्च -**

तालुक्यातील भैरवनाथ शुगर वर्क्स लि. सोनारी यांचे वतीने महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्यमंत्री, तथा परंडा विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांचे वाढदिवसानिमित्त १६ मार्च रोजी कारखाना साईटवर रक्तदान शिबीराचे आयोजन कारखान्याचे चेअरमन अनिल सावंत व व्हाईस चेअरमन विक्रम सावंत यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या रक्तदान शिबीराचे उद्घाटन अजित भोसले, डिस्टीलरी मॅनेजर यांचे हस्ते करण्यात आले.

आजच्या काळात रक्ताची गरज मोठ्या प्रमाणावर भासत आहे. एका व्यक्तीने केलेले रक्तदान तीन व्यक्तींचे प्राण वाचवू शकते. हाच उदात्त विचार समोर ठेवून आमचे संस्थेने प्रा.डॉ. तानाजीराव सावंत आमदार भूम-परांडा, वाशी यांचे वाढदिवसाचे औचित्य साधुन दरवर्षीप्रमाणे यंदाही या सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले होते. सदर शिबीरामध्ये १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्त संकलन बार्शी येथील भगवंत ब्लड बँक यांनी केले.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर प्रल्हाद ठोंबरे, चिफ केमिस्ट दादासाहेब बोरकर, बापुसाहेब देशमुख, रविकांत सिंग, उदयसिंह गडगे, लांडगे, सुरेश साळुंके, आबा अनवणे, गणेश गरदाडे, संदिप कवठे, बालाजी लोंढे, परमेश्वर घळके, लक्ष्मण ढगे तसेच कारखान्याचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# हिप्परगा (रवा) येथे श्री नृसिंह यात्रा महोत्सवाची धूम

### विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१७ मार्च -**



गुढीपाडव्याच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री नृसिंह यात्रा महोत्सवाचे आयोजन उत्साहात करण्यात आले असून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांसाठी सज्ज झाली आहे.

दि.१८ मार्च रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत हभप पुरुषोत्तम पाटील महाराज यांचे कीर्तन होणार आहे. दि.१९ मार्च रोजी दुपारी श्रींची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून रात्री १० वाजता शिवकरवाडी येथून श्रीच्या घोड्याची वाजतगाजत मिरवणूक हिप्परगा येथे दाखल होईल. त्यानंतर गौतमी पाटील यांचा डीजे शो रंगणार आहे.

दि.२० मार्च रोजी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून रात्री श्रींचा छबिना व आकर्षक आतिषबाजी होणार आहे. दि.२१ मार्च रोजी श्री नृसिंह केसरी २०२६ कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

त्याच दिवशी रात्री ९ वाजता लावणी महोत्सव होणार असून प्रथम बक्षीस १ लाख रुपये, द्वितीय ५१ हजार आणि तृतीय ३१ हजार रुपये असे ठेवण्यात आले आहे.

हिप्परगा (रवा) ग्रामस्थांच्या वतीने या यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**धाराशिव : माजी आरोग्य मंत्री भूम-परंडा-वाशीचे आ.प्रा. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे येथे त्यांचा नगराध्यक्ष जाकीरभाई सौदागर यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी वसीम सौदागर, कैफ सौदागर, अबूतला सौदागर, मुसा कुरेशी, गौस शेख आदी उपस्थित होते.**

## ढोकीत तलवारीने हल्ला; तरुण गंभीर जखमी, चौघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**ढोकी, दि.१७ मार्च -**

ढोकी पोलीस ठाणे हद्दीतील कोळेवाडी येथे किरकोळ वादातून तरुणावर तलवारीने हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी आकाश खोत, सुरेकांत खोत, अनिल आकोसकर व सुदर्शन आकोसकर (सर्व रा. कोळेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सुरज आकोसकर (वय २६) यांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ मार्च रोजी सकाळी महादेव मंदिरासमोर शिवीगाळ का करतोस? या कारणावरून वाद झाला. त्यानंतर आरोपींनी मारहाण करत तलवारीने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले.

## अणदूरमध्ये ‘श्री श्री गुरुकुल’चा स्नेहसंमेलन सोहळा संपन्न

### विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी रंगली दोन दिवसांची मेजवानी



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१७ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील ‘श्री श्री गुरुकुल’ शाळेचे शनिवारी (दि.१४) व रविवारी (दि.१५) मार्च रोजी दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते झाले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे अध्यक्षस्थानी होते. सरपंच रामचंद्र आलुरे, सुनील चव्हाण, डॉ. राजकुमार कानडे, रणवीर चव्हाण, संगप्पा हागलगुंडे, डॉ. नागनाथ कुंभार यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, लोकगीते, कोळीगीते, पारंपरिक गीते, भारुड, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाटिका, भांगडा, गोंधळ, तसेच सामाजिक विषयांवरील नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. नर्सरी ते दहावीच्या सुमारे ११०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनीच प्रभावीपणे केले, तर प्रास्ताविक मुख्याध्यापक लक्ष्मण नरे व शिवराज भुजबळ यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
नियमित वाचा...

# भाविकांसाठी शॉर्टकट ठरणाऱ्या तुळजापूर-इटकळ मार्गाच्या रुंदीकरणाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१७ मार्च -**

तुळजापूर येथून अक्कलकोटकडे जाणारा हंगरगा पाटी-मंगरूळ-इटकळ हा मार्ग भाविकांसाठी सोयीचा आणि कमी अंतराचा ठरत असल्याने या रस्त्याच्या दोन पदरी (रुंदीकरण) करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



सध्या या मार्गावर वाहतुकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून दररोज सुमारे ६ ते ८ हजार भाविकांच्या वाहनांची ये-जा होत असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. तुळजापूरहून नळदुर्गमार्गे अक्कलकोटकडे जाणारा पर्यायी रस्ता उपलब्ध असला, तरी त्या मार्गाने सुमारे १५ किलोमीटर अंतर अधिक पडते. भविष्यात त्या मार्गावर टोल आकारला जाण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने वाहनचालक हंगरगा पाटी-मंगरूळ-इटकळ मार्गालाच अधिक पसंती देत आहेत. हा मार्ग तुळजापूर, पंढरपूर, गाणगापूर आणि अक्कलकोट या प्रमुख तीर्थक्षेत्रांना जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरत आहे. अनेक भाविक तुळजापूर-पंढरपूर-गाणगापूर-अक्कलकोट असा धार्मिक प्रवास करताना या मार्गाचा वापर करत असल्याने या रस्त्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

सध्या तुळजापूर ते हंगरगा पाटी हा रस्ता तुलनेने रुंद आहे. मात्र हंगरगा पाटी-मंगरूळ-इटकळ हा भाग अद्याप अरुंद असल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. या भागाचे दोन पदरी रुंदीकरण झाल्यास प्रवास अधिक सुरक्षित आणि वेगवान होईल, असे वाहनचालकांचे मत आहे. राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) आणि सचिन कल्याण शेट्टी (अक्कलकोट) हे दोघेही भाजपचे आमदार असून अक्कलकोट बाजूने सीमेपर्यंत रस्ता रुंद करण्यात आला आहे.

मात्र तुळजापूर तालुक्यातील उर्वरित भाग अद्याप रुंदीकरणाच्या प्रतीक्षेत असल्याने हा रस्ता तातडीने दोन पदरी करण्यासाठी आमदारांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. तुळजापूर ते अक्कलकोट शॉर्टकट मार्ग तयार होईल. वेळ, इंधन आणि प्रवासखर्चात मोठी बचत होणार आहे. तसेच पर्यटनवाढीमुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी मिळू शकते. इटकळ, टेलरनगर, दिंडेगाव, केशेगाव, निलेगाव, भातंब्री, राखेल, मंगरूळ, नांदुरी, काळेगाव, यमगरवाडी, कसई आदी गावांतील ग्रामस्थांनी तुळजापूर-इटकळ रस्ता तातडीने रुंद करण्याची एकमुखी मागणी केली आहे.

या मार्गाचे रुंदीकरण झाल्यास इटकळ ते अक्कलकोट हा आधीच चांगला व रुंद रस्ता असल्याने भाविकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास स्थानिकांकडून व्यक्त केला जात आहे.

CHANGE IN THE NAME

I Have change my name from TAMBOLI SOHEL LATEEF TO, TAMBOLI SOHEL LATIF Hence for this declaration in future
Old Name :- TAMBOLI SOHEL LATEEF
NEW Name:- TAMBOLI SOHEL LATIF
MOTHER NAME OLD:- YASMEEN
MOTHER NAME NEW:- YASMIN
ADDRESS:- GAVANDI GALLI KALAMB DIST OSMANABAD
MOB.NO.:- 9028467952

CHANGE IN THE NAME

I Have change my name from TAMBOLI KHUSBU LATIF (YASMIN BEGAM) TO, TAMBOLI KHUSHBU LATIF Hence for this declaration in future
Old Name :- TAMBOLI KHUSBU LATIF(YASMIN BEGAM)
NEW Name:- TAMBOLI KHUSHBU LATIF
MOTHER NAME -YASMIN
ADDRESS:- GAVNDI GALLI KALAMB DIST OSMANABAD
MOB.NO.:- 9422467952

CHANGE IN THE NAME

I Have change my name from TAMBOLI UZMA LATEEF TO, TAMBOLI UZMA LATIF Hence for this declaration in future
Old Name :- TAMBOLI UZMA LATEEF
NEW Name:- TAMBOLI UZMA LATIF
MOTHER NAME OLD -YASMEEN
MOTHER NAME NEW -YASMIN
ADDRESS:- GAVNDI GALLI KALAMB DIST.OSMANABAD
MOB.NO.:- 9422467952

## जाहीर प्रगटन

तमाम लोकांना विशेषतः तुळजापूर तालुक्यातील मौजे काक्रंबा ता. तुळजापूर जि.धाराशिव ग्रामपंचायत हद्दीतील लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे अशिल नामे श्री. विजय रावण भोसले रा. तुळजापूर ता. तुळजापूर जि.धाराशिव यांनी दिलेल्या माहितीवरुन व अधिकार पत्रावरुन जाहीर प्रगटन देण्यात येते की, डि व सब डि धाराशिव पैकी तालुका तुळजापूर पैकी येथील जिल्हा परिषद धाराशिव ग्रामपंचायत काक्रंबा येथील जमिन सर्वे नंबर १५३ मधील अनिता सोमनाथ घोगरे यांच्या नावावरील क्षेत्र १ हे. २८आर आकार रू. ०.७९ पैसे पैकी विक्री क्षेत्र १हे. २० आर कारडवाहु शेतजमिन खाजगी मोजनी आधारे देण्याचे ठरले आहे. तसेच सदरील क्षेत्र कमी जास्त झाल्यास गुंठ्या प्रमाणे देण्याचे ठरले आहे. ज्याची चतुसिमा पूर्वेस :- भिमा देवगुंडे यांची शेतजमिन, पश्चिमेस अनुराधा विजय भोसले यांची शेतजमिन, दक्षिणेस :- घोगरे यांची शेतजमिन व उत्तरेस : शिव रस्ता येणेप्रमाणे चतुसिमेच्या आतील संपूर्ण शेतजमिन अनिता सोमनाथ घोगरे रा. तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांच्या नावाची आमचे अशिल विजय रावण भोसले यांनी कायमस्वरूपी खरेदीखत करण्याचे ठरलेले आहे व त्याप्रमाणे आमचे अशिलासोबत व्यवहार झालेला आहे व सदर व्यवहारापोटी आमचे अशिल यांनी इसारापोटी रक्कम दिलेली आहे. सदरील शेतजमिन निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री आमचे अशिलास दिलेली आहे.

सदरील शेतजमिनीमध्ये जर कोणास कोणत्याही व्यक्तीस संस्थेस, बँकेस, पतसंस्थेस वा अन्य कोणासही सदरील मालमत्तेत काही हितसंबंध असतील किंवा हस्तांतरणाचा करार, मदार, गहाणखत, भाडेपट्टा, अधिकारपत्र, वारसा हक्क, पोटगी हक्क वा कोणत्याही प्रकारचा ताबा, मालकी बाबतचा हक्क, उजर असेल तर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाचे आत माझ्याकडे रजिस्टर्ड पोष्टाने किंवा प्रत्यक्ष संबंधित कागदपत्रासह लिखित उजर दाखल करुन त्याची पोच घ्यावी जर कोणाचा उजर आला नाही तर माझे पक्षकार मुदतीनंतर वरील जागेचे खरेदीखत करणार आहेत, त्यानंतर येणाऱ्या उजरास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत व त्याच्या होणाऱ्या परिणामाची व खर्चाची जबाबदारी आमचे अशिलावर राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सबब हे जाहीर प्रगटन दिले असे.**
**दिनांक:- १६/०३/२०२६.**

**जाहीर प्रगटन देणार तर्फे**
**ॲड. दिपक ज. हुंडेकर**

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा
## उमरगा येथील दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांचे न्यायालयात

**सीएनआर क्र.** MHOS0६000३२४२०२६
**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६८/२०२६**
**प्रेमनाथ / निरंक**
**निशाणी क्रमांक :- ७**

ज्यापेक्षा मयत **कै. तुकाराम शिवराम गाडे, रा. मौजे माडज, ता. उमरगा जि. धाराशिव** हे दिनांक १६/०९/२०१२ रोजी किंवा त्यासुमारास मौजे माडज, ता. उमरगा जि. धाराशिव येथे मयत झाले असून अर्जदार क्र. १. प्रेमनाथ तुकाराम गाडे (मुलगा), यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत **कै. तुकाराम शिवराम गाडे** यांच्या नावचे वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे कै. तुकाराम शिवराम गाडे यांचे मृत्यू पश्चात शासकीय व निमशासकीय कामाकरीता व तसेच भुकंपग्रस्त प्रमाणपत्र काढणेकरीता अर्जदारांचे नावे वारसा हक्काने नावे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत **कै. तुकाराम शिवराम गाडे** यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत **कै. तुकाराम शिवराम गाडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

**दिनांक ०७/०३/२०२६ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
**पुढील नेमलेली तारीख १६/०४/२०२६.**

**स्वाक्षरित/-**
**(एस. एन, यमगर)**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(अ.ज. सय्यद)**
**सहा.अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, उमरगा**

## जाहीर प्रसिध्दीकरण

जा.क्र. २८०/२०२६
दि. ११/०३/२०२६
आर.सी.एस. नं. ३९९/२०२१
पुढील नेमलेली तारीख :-०२/०५/२०२६
निशान क्र. १८

**बार्शी येथील तिसरे सह मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**
**(मा. आर.पी. बागडे साहेब)**

**साधना सुदाम घुगे (माहेरकडील नांव)**
**साधना प्रभाकर जायभाय (सासरकडील नांव),**
वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. द्वारा प्रभाकर रावणराव जायभाय, सर्व्हे नं. ६८, प्लॉट नं. ३४, जयभवानी नगर, एन. २ सिडको, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद). — **वादी**

**विरूद्ध**

**१) सिंधुबाई सुदाम घुगे (मयत)**
**२) शोभा प्रमोद घुगे,** वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम,
**३) अक्षय प्रमोद घुगे,** वय- २८ वर्षे, धंदा- नोकरी,
**४) स्नेहा प्रमोद घुगे,** वय- ३० वर्षे, धंदा- नोकरी,
सर्व रा. प्लॉट नं. ३१४/३११, घाटशिळ रोड, जिल्हा परिषद शाळेसमोर, तुळजापुर, जि. धाराशिव, — **प्रतिवादी**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी यातील वादी व प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाईचा हुकुमाचा दावा दाखल केला असून, सदरील वादी यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे रा. प्लॉट नं. ३१४/३११, घाटशिळ रोड, जिल्हा परिषद शाळेसमोर, तुळजापुर, जि. धाराशिव येथेच राहत असून, सदर प्रकरणात मे. न्यायालयाचे समन्स बजावणी होऊन परत आले. परंतु, त्यांचे नातेवाईकांनी प्रतिवादी नं. ३ व ४ राहत नसल्याचा अहवाल मे. कोर्टात दाखल केला आहे. परंतु, सदर प्रकरणी यातील प्रतिवादी क्र. ३ व ४ हे अर्जात नमुद केलेल्या पत्यावर राहत असून देखील सदर अर्जाचे समन्स अदयाप प्रतिवादी नं. ३ व ४ यांना बजावणी न झाल्याने अर्जदार यांनी **दि. ०२/०५/२०२६** रोजी या मे. न्यायालयात प्रतिवादी नं. ३ व ४ यांचे प्रस्तुत प्रकरणाचे समन्स जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे प्रसिध्द करण्याचा अर्ज दाखल केल्याने व सदर प्रकरणाची पुढील तारीख **दि.०२/०५/२०२६** अशी नेमलेली असून, यातील प्रतिवादी नं. ३ व ४ यांनी अर्जदाराचे अर्जास स्वतः अथवा विधीज्ञांमार्फत हजर राहुन म्हणणे दाखल करावे.

अन्यथा, सदर अर्जदाराचे वादाबाबत प्रतिवादी नं. ३ व ४ यांची कोणतीही कसलीही हरकत, तक्रार नाही, असे समजण्यात येऊन प्रतिवादी नं. ३ व ४ विरुध्द योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील. त्यामुळे प्रतिवादी नं. ३ व ४ यांनी सदर प्रकरणातील जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या दि. **०२/०५/२०२६** या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा प्रतिवादी नं. ३ व ४ यांची कसलीही हरकत नाही, असे समजुन सदर दाव्यासंबंधीत मा. न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

**हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ११/०३/२०२६**

**सही /-**
**(कनिष्ठ लिपीक)**

कोर्टाचा शिक्का

**सही /-**
**(सहाय्यक अधिक्षक)**

**तिसरे सह. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी**

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोलार-पवनचक्की प्रकल्पांत स्थानिकांना रोजगार देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ मार्च -**

तुळजापूर तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोलार व पवनचक्की प्रकल्प उभे राहत असताना या प्रकल्पांमध्ये स्थानिक तरुणांना रोजगार देणे बंधनकारक करावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. अनेक कंपन्यांना शेकडो एकर सरकारी तसेच शेतकऱ्यांच्या जमिनी नाममात्र भाड्याने देण्यात आल्या आहेत; मात्र या प्रकल्पांमधून स्थानिक युवकांना किती रोजगार मिळाला, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

नळदुर्ग येथील वसंतनगर परिसरातील सुमारे ३० एकर सरकारी जागा सोलार प्रकल्पासाठी आवादा इलेक्ट्रो लिमिटेड कंपनीला देण्यात आली असून प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र या प्रकल्पातून स्थानिकांना किती नोकऱ्या मिळणार, याबाबत स्पष्टता नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. तालुक्यात उभारलेल्या अनेक पवनचक्की प्रकल्पांमध्येही शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

दरम्यान, युनिटी मल्टीकॉन्स कंपनीकडे देण्यात आलेल्या प्रकल्पामुळे पूर्वी सुमारे २०० स्थानिकांना रोजगार मिळाला होता. मात्र करार संपल्यानंतर किल्ला पुन्हा पुरातत्व विभागाकडे गेल्याने हे सर्व कर्मचारी बेरोजगार झाले आहेत. त्यामुळे किल्ला संगोपन योजना पुन्हा सुरू करून रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### लोहाऱ्यात आई हिंगलाज माता प्रगट दिन साजरा

**लोहारा, दि.१७ मार्च -**

लोहारा शहरात आदी शक्तीच्या ५१ शक्तीपीठांपैकी पहिले शक्तीपीठ म्हणून ओळख असलेल्या कुलस्वामिनी आई हिंगलाज माता देवी यांचा प्रगट दिन दि. १७ मार्च २०२६ रोजी समस्त भावसार समाजाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाआरती करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी बांधकाम सभापती विजयकुमार ढगे, मेडिकल असोसिएशन तालुकाध्यक्ष प्रमोद बंगले, विठ्ठल वचने, भगवान पाटील, माजी अध्यक्ष शिवराज झिंगाडे, उपाध्यक्ष गंगाधर झिंगाडे, सचिव अक्षय माळवदकर यांच्यासह अनेक जेष्ठ नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.



### तुळजापूरमध्ये साडी वॉकथॉनला प्रतिसाद

**तुळजापूर, दि.१७ मार्च -**

रोटरी क्लब तुळजापूर व विठाई हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी प्रथमच आयोजित साडी वॉकथॉन उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. साडी परिधान करून चालण्याच्या या अनोख्या उपक्रमात विविध वयोगटातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि आत्मविश्वास वाढवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमासाठी रोटरी क्लबच्या महिला सदस्यांसह ॲन्स यांचे विशेष योगदान लाभले. ॲड. स्वाती नळेगावकर, रूपाली गुंड, श्रुती लोखंडे, शुभांगी अपराध, डॉ. श्वेता नरवडे आणि निर्मला जाधव यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला तहसीलदार माया माने यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली. सहभागी महिलांनी अशा उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.



### ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांची धावपळ; ५० टक्के मळणी पूर्ण

**वाशी, दि.१७ मार्च -**

वाशी तालुक्यात सध्या हरभरा, गहू आणि ज्वारी पिकांच्या मळणीला वेग आला असून आतापर्यंत सुमारे ५० टक्के मळणी पूर्ण झाल्याची माहिती शेतकरी वर्गातून मिळत आहे. यंदाच्या हंगामात तालुक्यात मोठ्या प्रमाणात ज्वारी, गहू व हरभरा पिकांची पेरणी करण्यात आली होती. सध्या अर्ध्या शेतकऱ्यांची मळणी सुरू असून उर्वरित शेतकऱ्यांची पेरणी उशिरा झाल्यामुळे त्यांच्या पिकांची काढणी अद्याप सुरू आहे. मात्र मागील दोन दिवसांपासून तालुक्यात ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची धावपळ वाढली आहे. पिके सुरक्षित काढून मळणी पूर्ण करण्यासाठी शेतकरी घाईगडबड करताना दिसत आहेत. दरम्यान, वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता असल्याचा इशारा शासनाकडून देण्यात आला आहे. याबाबत शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सूचना देखील पाठविण्यात येत असल्याची माहिती मिळाली आहे.

# पुरवठादार सरकारचे जावई आहेत का? : आ. कैलास पाटील

**धाराशिवमध्ये शालेय पोषण आहारातील भ्रष्टाचाराचा मुद्दा तापला... शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे आणि चौकशी करण्याची ग्वाही...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मार्च -**

शालेय पोषण आहार योजनेतील कथित भ्रष्टाचारावरून विधानसभेत जोरदार चर्चा रंगली. आमदार कैलास पाटील यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना प्रश्न विचारत दोषींवर कठोर कारवाई आणि एसआयटीमार्फत चौकशीची मागणी केली.

पाटील यांनी लक्षवेधीमध्ये सांगितले की, पंतप्रधान शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत हिरवा वाटाणा देण्याऐवजी पांढरा वाटाणा वितरित करण्यात आला. या दोन्ही प्रकारांमध्ये किलोमागे सुमारे १०० रुपयांचा फरक असून, मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप त्यांनी केला.



निविदेमध्ये हिरवा वाटाणा नमूद असताना कार्यारंभ आदेशात केवळ 'वाटाणा' असा उल्लेख करून पुरवठ्यात फेरफार करण्यात आल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. अधिकारी आणि पुरवठादार यांच्या संगनमताने हा प्रकार घडल्याचा आरोप करत पाटील यांनी स्वतः दिलेल्या तक्रारीवर अद्याप कोणती कारवाई झाली याची विचारणा केली. पुरवठादार सरकारचे जावई आहेत का? असा सवाल करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. या प्रश्नांमुळे काही काळ सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

मंत्री भुसे यांनी प्रकाराची दखल घेत सचिव पातळीवर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. सुरुवातीला मोघम उत्तर दिल्यानंतर, वाढत्या दबावामुळे त्यांनी आयुक्त आणि सचिव स्तरावर चौकशी करण्याची ग्वाही दिली. या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत आमदार पाटील यांनी सरकारला चौकशीसाठी भाग पाडल्याचे चित्र दिसून आले.



## श्रुती आगलावे हिचा 'बी.एम. पाठक बेस्ट आर्टवर्क पुरस्कारा'ने गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मार्च -**

पुणे येथील बालगंधर्व कला मंदिर येथे आयोजित तीन दिवसीय कला प्रदर्शनात तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील युवा चित्रकार श्रुती दादाराव आगलावे हिला बी.एम. पाठक बेस्ट आर्टवर्क पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

भारतीय कला प्रसारणी अभिनव कला महाविद्यालयाच्या वतीने सन २०२५-२०२६ या वर्षासाठी आयोजित वार्षिक कला प्रदर्शनादरम्यान हा पुरस्कार श्रुती आगलावे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी प्राचार्य विलास चोरमले, प्राचार्य राहुल बळवंत तसेच रेखा व रंगकला विभाग प्रमुख सतीश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रुती हिला प्राचार्य डॉ. संजय भारती आणि कलाशिक्षक डॉ. समीर आगळे यांचे मार्गदर्शक लाभले.

या प्रदर्शनामध्ये पुण्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशावर आधारित विविध विषयांवरील चित्रकृती सादर करण्यात आल्या. या प्रदर्शनात श्रुती आगलावे हिच्या एकूण ११ चित्रकृतींचा समावेश होता. तिच्या उत्कृष्ट कलाकृतींची दखल घेत तिला हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रुती आगलावे हिच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## गॅस व पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका : जिल्हाधिकारी पुजार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मार्च -**

केंद्र शासन व संबंधित कंपन्यांकडून राज्यात एलपीजी गॅस तसेच पेट्रोल -डिझेलच्या पुरवठ्यात कोणतीही टंचाई नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सी तसेच पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरवठा नियमितपणे सुरू असून पुरेसा साठा उपलब्ध आहे.त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.




नागरिकांनी आवश्यकतेनुसारच गॅस सिलेंडर बुकिंग करावे तसेच पेट्रोल-डिझेल खरेदी करावी.

गॅस एजन्सी व पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करून साठवणूक करण्याचा प्रयत्न करू नये.गॅस सिलेंडरचे वितरण नियमानुसार व बुकिंगनुसार केले जाईल.

त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

## अवैध ताडीसह एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मार्च -**

तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत अवैध ताडी विक्रीप्रकरणी एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परशुराम गणेश गुत्तेदार (वय २७, रा. आंबेजवळगा, ता. जि. धाराशिव) असे आरोपीचे नाव आहे.

१६ मार्च रोजी सायंकाळी नवीन बसस्थानकासमोरील लातूर रोडलगत भोसले खडी क्रेशर पॉईंटजवळ आरोपीकडे अंदाजे १,००० रुपयांची ५० लिटर सिंधी ताडी अवैध विक्रीच्या उद्देशाने आढळून आली. पोलिसांनी ती जप्त केली. या प्रकरणी महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## परंड्यात भरदिवसा वृद्ध महिलेल लुटले

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ मार्च -**

प्रमिला भगवान आगरकर (वय ६३, रा. आगरकर गल्ली, परंडा) या दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सोनगिरी शिवारातील शेताकडे जात असताना धक्कादायक घटना घडली.

अनोळखी तीन इसम मोटारसायकलवर येऊन त्यांनी फिर्यादीचे तोंड दाबून दगड व चाकूचा धाक दाखवत मारहाण करण्याची धमकी दिली. यानंतर गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र व कानातील फुले असे सुमारे ८ ग्रॅम वजनाचे, अंदाजे १६ हजार रुपये किमतीचे दागिने जबरदस्तीने हिसकावून नेले.

या प्रकरणी प्रमिला आगरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



## अघोषित लोडशेडिंगमुळे येरमाळावासिय त्रस्त

**यात्रेपूर्वीच नागरिकांचा संताप...**

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१७ मार्च -**

येरमाळा परिसरात महावितरणकडून सुरू असलेल्या अनियमित व अघोषित लोडशेडिंगमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेत होणाऱ्या वीज खंडितीचा फटका विद्यार्थ्यांसह व्यापारी व व्यावसायिकांना बसत आहे.

सध्या आराध्य दैवत श्री येडेश्वरी देवी यांच्या यात्रेची तयारी सुरू असताना अचानक होणाऱ्या वीज खंडितीमुळे व्यावसायिकांच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. बाजारपेठेतील हालचाली मंदावल्या असून आर्थिक नुकसान होत असल्याची भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. गेल्या दोन दिवसांपासून संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. शेतीपंपांवर ताण नसतानाही वीज खंडित होत



असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मंगळवारी (ता. १७) ग्रामस्थांनी महावितरण कार्यालयात धाव घेत निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली. पूर्वसूचना न देता होणाऱ्या लोडशेडिंगमुळे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असल्याची तक्रार करण्यात आली. दरम्यान, वाढत्या उकाड्यामुळे लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत आहे. या प्रकाराबाबत अधिकृत माहिती न मिळाल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महावितरणने सखोल चौकशी करून अघोषित लोडशेडिंग तात्काळ बंद करावे, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## मातीतल्या माणसांना मोठे करणारे नेतृत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण : डॉ. हंगरगेकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मार्च -**

परंडा येथील ग्लोबल हायस्कूलमध्ये आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात पार पडला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई जिल्हा केंद्र धाराशिव यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात प्रा.डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी मातीतल्या माणसांना मोठे करणारे नेतृत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण असे प्रतिपादन केले.



यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व या विषयावर बोलताना डॉ. हंगरगेकर यांनी विद्यार्थ्यांना चव्हाण यांच्या बालपण, शिक्षण, कौटुंबिक परिस्थिती तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या अशा मोरोजकर यांनी प्रास्ताविकातून संस्थेची ध्येयधोरणे व सामाजिक कार्याची माहिती दिली. त्यानंतर प्राचार्य डॉ. रमेश दापके यांनी चव्हाण यांच्या कार्याचा परिचय करून देत प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष व ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे यांनी अध्यक्षीय समारोपात चव्हाण यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगांचा उल्लेख केला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श ठेवून जीवनात पुढे जावे, असा संदेश त्यांनी दिला.

## कळंबमध्ये १७ वर्षीय मुलाचे अपहरण; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१७ मार्च -**

अमजत जाफर पठाण (वय ४३, रा. फरीदनगर, तांदुळवाडी रोड, डिकसळ ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांच्या १७ वर्षीय मुलाचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

फिर्यादीतील माहितीनुसार, आयान अमजत पठाण (वय १७ वर्षे) यास दि. १४ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातून अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवून नेले.

या प्रकरणी अमजत पठाण यांनी दि.१६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण तयार झाले आहे.

# वीज बिल वसुलीत महावितरणची सक्ती; हप्त्यांना नकार मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली

**'पूर्ण बिल भरा नाहीतर वीज तोडू' : महावितरणच्या सक्तीने उमरग्यातील नागरिक हैराण... गुढीपाडवा, रमजान ईद सण नागरिकांना अंधारात बसण्याची येणार वेळ...**



**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.१७ मार्च -**

मार्च अखेर जवळ येताच महावितरणने वीज बिल वसुलीचा धडाका सुरू केला असून या मोहिमेत नागरिकांवर सक्ती केली जात असल्याचे आरोप समोर येत आहेत. आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांना कोणतीही सवलत न देता संपूर्ण बिल एकाच वेळी भरण्याची अट घातली जात असल्यामुळे सर्वसामान्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

अनेक नागरिकांनी महावितरणकडे हप्त्यांमध्ये बिल भरण्याची तयारी दर्शवली आहे. काहींनी ५० टक्के तर काहींनी ७० टक्के रक्कम तत्काळ भरण्याची तयारी दाखवली. मात्र महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून अशी रक्कम स्वीकारण्यास नकार दिला जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संपूर्ण बिल भरले नाही तर वीज कनेक्शन तात्काळ कट केले जाईल, अशी थेट सूचना दिली जात असल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना अशा प्रकारे वीज कनेक्शन तोडण्याची भाषा केली जात असल्याने नागरिक अधिकच आक्रोश व्यक्त करत आहेत. वीज ही अत्यावश्यक सेवा असताना महावितरणकडून मानवीय भूमिका न घेता केवळ वसुलीवर भर दिला जात असल्याची टीका होत आहे. दरम्यान, काही नागरिकांनी सांगितले की, आम्ही थकबाकी नाकारणार नाही; मात्र परिस्थिती पाहून हप्त्यांमध्ये बिल भरण्याची संधी द्यावी, अशी विनंती करूनही अधिकाऱ्यांकडून दाद मिळत नाही. त्यामुळे हा कारभार मनमानी असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर धाराशिव मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत वाढीव वीजबिलांबाबत दुरुस्ती करून हप्त्यांची सुविधा देण्याची मागणी केली होती. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हप्त्यांची मागणी केल्यास ती मंजूर केली जाईल, असे आश्वासन दिले होते.

मात्र एकीकडे सरकारकडून दिलासा देण्याच्या घोषणा होत असताना दुसरीकडे महावितरणकडून सुरू असलेली कठोर वसुली मोहीम नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेलाही महावितरणकडून केराची टोपली दाखवली जात असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

तू कर मारल्यावाणी आणि मी करतो रडल्यावाणी अशी दुटप्पी भूमिका असल्याचेही नागरिकांमध्ये बोलले जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून महावितरणला स्पष्ट सूचना द्याव्यात व नागरिकांना हप्त्यांमध्ये बिल भरण्याची सवलत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

